# अनुक्रमणिका


**4**
सुरुवातीचे–
**शेतकऱ्यांनो, थोडा धीर धरा...**
– जयंत पाटील

**5**
प्रबंध संपादकीय–
**अभिनंदन! उद्धवजींच्या सरकारचे**
– दिलीप वळसे पाटील

**6**
संपादकीय–
**धर्मांधता व विद्वेश जोपासणारा कायदा**
– डॉ. सुधीर भोंगळे

**20**
खास मुलाखत
**धार्मिक रंग देश ऐक्यासाठी घातक**
– शरद पवार
(राष्ट्रवादीचे मासिकाचे संपादक डॉ. सुधीर भोंगळे यांनी शरद पवार यांची घेतलेली खास मुलाखत)

**34**
श्रद्धांजली
**डी.पी. त्रिपाठी**
– अवलोकितेश्वर

**40**
नवी दिल्ली वार्तापत्र
**अराजक आणि एकाधिकारशाहीकडे**
– आकाश

**50**
थेट लाल किल्ल्यावरून
**सीएए, एनआरसी, एनपीआर, आहे तरी काय?**
– गहिनीनाथ

**60**
शरद पवार यांच्या वाढदिवसानिमित्त मुंबईत झालेला निधी प्रदान समारंभ, भाषणे...
१) **बळीराजाची पिढी सज्ञान व्हावी**
– शरद पवार– ६०
२) **पवारसाहेबांच्या अनुभवाची देशाला गरज**
– प्रफुल पटेल– ६४
३) **महाराष्ट्राचा स्वाभिमान दिल्लीला दाखविला**
– जयंत पाटील– ६८
४) **साहेबांमुळेच माझा राजकीय पुनर्जन्म**
– छगन भुजबळ– ७३
५) **साहेबांना कार्यकर्त्यांची पारख**
– नवाब मलिक– ७७

**82**
शरद पवार यांची पत्रकार परिषद
**आंदोलन शांततेत करा**
– शरद पवार

**84**
राजकीय घडामोडींचा आढावा
**दिल्ली व बिहार होणार काय?**
– आलोक

**92**
फोटो फिचर
**राष्ट्रवादीचा महाराष्ट्र मंत्रिमंडळातला सहभाग**

**94**
हलके–फुलके राजकीय किस्से
**कानोकानी**
– घंटाकर्ण

**102**
शेवटचे पान–**शिल्पकार नव्या परिवर्तनाचे**
– हेमन्त टकले








# राष्ट्रवादी
स्वाभिमानी आचार! राष्ट्रवादी विचार!!


**संचालक**
हेमन्त टकले
**प्रबंध संपादक**
दिलीप वळसे पाटील
**संपादक**
डॉ. सुधीर भोंगळे
या अंकात प्रसिद्ध झालेल्या मतांशी प्रबंध संपादक, संपादक व संचालक सहमत असतीलच असे नाही.

**संपादकीय पत्रव्यवहार**
ठाकरसी हाऊस, जे.एन.हेरेडिया मार्ग, बॅलार्ड इस्टेट, मुंबई–४०० ०३८
०२२–३०२३५५३०/५५/५६
**कला निर्देशन**
धनंजय सस्तकर
**मांडणी**
दिलीप रोडे

**वर्गणीचे दर–**
**वार्षिक रु. ५००/–**
**वर्गणीचा धनादेश**
'हेमन्त मल्टिमीडिया ओपीसी प्रा.लि.'
या नावाने काढावा.
www.ncp.org.in
यावर मासिक उपलब्ध

**मुद्रक, प्रकाशक**
**हेमन्त प्रभाकर टकले** यांनी **'हेमन्त मल्टीमीडिया ओपीसी प्रा.लि.'** च्या वतीने मीडिया आर ॲण्ड डी., १३, अमृत मधुरा, प्लॉट नं. ३, सेक्टर–३,आरएससी–२८, चारकोप, कांदिवली (पश्चिम), मुंबई–४०००६७ येथे छापून ७८, रेशमभवन, ६ वा मजला, वीर नरिमन रोड, चर्चगेट, मुंबई–४०००२० येथून अंक प्रकाशित केले.

# प्रारंभिक



# शेतकऱ्यांनो, थोडा धीर धरा!

**फडणवीस सरकार शेतकऱ्यांच्या विरोधात होते. त्यामुळे शेतकऱ्यांना काहीही मदत करायची म्हटले की त्यांचा हात थरथर कापायचा. बुलेट ट्रेन, मेट्रो, समृद्धी महामार्ग यासाठी पैसे द्यायला मात्र ते आसुसलेले असायचे. सर्वाधिक शेतकऱ्यांच्या आत्महत्त्या भाजप सरकारच्या काळात झाल्या. तरी देखील सरकारला पाझर फुटला नाही. महाआघाडी सरकार मात्र शेतकऱ्याला वाऱ्यावर सोडणार नाही एवढाच शब्द मी तुम्हांला देतो.**

अतिवृष्टी, अवेळी पाऊस, गारपीट, बदलते हवामान, पूर यांसारख्या नैसर्गिक संकटांमुळे शेतकरी अडचणीत आला आहे. खरीप हंगामातील पिके हाताशी लागली नाहीत. जून, जुलै हे पावसाविना गेले. ऑगस्टपासून अतिवृष्टी सुरु झाली आणि भर दिवाळीतही पाऊस पडत राहिला. खरीपाची काढायला आलेली पिके उदा. सोयाबीन, कापूस, ज्वारी, बाजरी पावसाने खराब झाली. ज्वारी, बाजरी काळी पडली. कपाशीची फुले आणि बोंडे गळून गेली तर काही सडली. सोयाबीनच्या शेंगांना जागेवरच कोंब फुटून दाणे व शेंगा कुजल्या. आता रब्बीची पिके तरी भरपूर पाऊस झालेला असल्याने व पुरेसे भूजल उपलब्ध असल्यामुळे चांगली येतील असे वाटत असतानाच ढगाळ हवामान, अवेळी पाऊस, गारपीट यांचा मार बसला आणि रब्बीची पिकेही खराब झाली. शेतकऱ्यांपुढे मोठा प्रश्न कर्ज कसे फेडायचे हा उभा आहे. त्यातून त्याला दिलासा देण्यासाठी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील मंत्रीमंडळाने दोन लाखापर्यंतचे पीककर्ज माफ करण्याचा निर्णय घेतला आहे. मागच्या फडणवीस सरकारने फक्त दीड लाखापर्यंतची कर्जमाफी जाहीर केली होती. पण ती प्रत्यक्षात शेतकऱ्यांना मिळू नये अशी त्या सरकारची इच्छा असल्यामुळे त्यांनी अनेक अटी, शर्ती व नियम लागू करुन शेतकऱ्यांना ऑनलाईन अर्ज करायला लावले. रोज रांगेत उभे केले. पत्नीला बरोबर घेऊन यायला सांगितले. किती म्हणून नाटके केली! प्रत्यक्षात शेतकऱ्याच्या हाती धतुराच पडला. लोकांना कर्जमाफी मिळालीच नाही. बँकेत हेलपाटे मारुन मारुन शेवटी शेतकरी वैतागून गेला. 500-1000 रुपये त्याचे अर्ज भरण्यात गेले पण रुपयाही हाती पडला नाही. शेवटी त्याने कंटाळून कर्जमाफीचा नाद सोडून दिला. 38 हजार कोटी रुपयांची कर्जमाफी द्यावी लागेल असा सुरुवातीला अंदाज होता. प्रत्यक्षात फडणवीस सरकारने अगदी रडून रडून आणि दात कोरुन पोट भरीत फक्त 18 हजार कोटी रुपयांची कर्जमाफी दिली.

उद्धवजींच्या सरकारने मात्र त्याच्या पुढे पाऊल टाकून मनाची अधिक उदारता दाखविली. दोन लाख रुपयांपर्यंतचे कर्ज सरसकट माफ करण्याचा निर्णय महाआघाडी सरकारने घेतला. या निर्णयामुळे सर्व शेतकऱ्यांचे दैन्य दुःख दूर होणार नाही याची सरकारला पूर्ण जाणीव आहे. त्यामुळे दोन लाखापेक्षा ज्यांचे कर्ज अधिक आहे व ज्या शेतकऱ्यांनी कर्जाचे नियमित हप्ते भरलेले आहेत **(पान ३२ वर)**



# प्रबंध संपादकीय



# अभिनंदन! उद्धवजींच्या सरकारचे

**महाराष्ट्रात भाजपला सत्तेपासून दूर ठेवण्याची जी खेळी पवारसाहेबांनी यशस्वी करून दाखविली ती देशभर कौतुकाला पात्र ठरून मोठी चर्चेची गोष्ट बनली आहे. त्याचे अनुकरण लगेच झारखंडच्या निवडणुकीत झाले. आगामी वर्षांत दिल्ली, बिहार विधानसभेच्या निवडणुका आहेत. तिथेही या पद्धतीचे अनुकरण होण्याची शक्यता वर्तविली जात आहे. भाजपला वेगवेगळ्या राज्यातून हद्दपार करण्याची ही मोहिम हे राजकीय बदलाचे शुभचिन्ह आहे.**

शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस आणि काँग्रेस या तीन प्रमुख पक्षांनी एकत्र येऊन महाराष्ट्रात महाआघाडीची सत्ता स्थापन केली आहे. पक्ष वेगवेगळ्या विचारधारेचे असले तरीही समान कार्यक्रम आखून त्याची प्रभावीपणे अंमलबजावणी करत अंतिम लक्ष्यापर्यंत पोहोचता येते हे तीनही पक्ष देशाला दाखवून देणार आहेत. सर्वसामान्य गोरगरिब जनतेचे कल्याण आणि राज्याचा सर्वांगीण विकास हेच ध्येय बाळगल्यामुळे या तीनही आणि समविचारी मित्रपक्षांना एकत्र येण्यात कोणताही अडसर निर्माण झाला नाही. अर्थात यात समतोल साधत समन्वय राखण्याची मुख्य भूमिका काँग्रेस अध्यक्षा श्रीमती सोनिया गांधी, राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार आणि शिवसेनेचे कार्याध्यक्ष उद्धव ठाकरे या तिघांनी घेतली आणि पवार साहेबांच्या सूचनेचा आदर करुन उद्धवजींनी मुख्यमंत्रीपद स्वीकारले याबद्दल सुरुवातीला या तिघांचेही मी मनापासून अभिनंदन करतो. आता मंत्रीमंडळ अस्तित्त्वात येऊन त्याने कामाला सुरुवात केली आहे. मंत्रीपदाची जबाबदारी पक्ष नेतृत्त्वाने ज्यांच्यावर मोठ्या विश्वासाने सोपविली आहे ते सारेजण प्रामाणिकपणे व मनापासून आपली जबाबदारी पार पाडतील अशी आशा व्यक्त करुन सर्व मंत्रीमंडळालाही त्यांच्या हातून उत्कृष्ट काम व्हावे अशा शुभेच्छा देतो. सर्व मंत्र्यांचेही अंतःकरणापासून अभिनंदन करतो. हे मंत्रीमंडळ फार काळ टिकणार नाही अशा वल्गना भारतीय जनता पक्षाचे नेते वारंवार करुन जनतेत संभ्रम पसरवित असले तरीही महाआघाडीतील सर्व आमदार एकजुटीने राहून व खांद्याला खांदा लावून काम करतील आणि प्रभावीपणे जनहिताचे निर्णय करुन राज्याच्या विकासाला नवी दिशा दाखवितील असा विश्वास व्यक्त करतो. महाराष्ट्रात उद्धवजींच्या नेतृत्वाखाली जे नव्याने सरकार स्थापन झाले आहे त्यामुळे देशाच्या राजकारणात नवा संदेश गेला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि गृहमंत्री अमित शहा यांच्या दहशतीला न जुमानता त्यांना अंगावर घेण्याचा व प्रभावीपणे कृतीतून त्यांच्या विरोधात उभे राहण्याचे जे धाडस मा. पवारसाहेबांनी दाखविले आहे त्याबद्दल देशातील सर्व विरोधीपक्षांच्या नेत्यांनी त्यांचे केवळ अभिनंदनच केले आहे असे नाही तर उद्या या जोडगोळीविरुद्ध आणि धर्मांध व जातियवादी असलेल्या भाजपविरुद्ध देशभर जो मोठा संघर्ष करुन लढा उभारावा लागणार आहे त्याचे नेतृत्त्व मा. पवारसाहेबांनी करावे अशी मागणी जोर धरु लागली आहे. पं. बंगालच्या मुख्यमंत्री मा. ममता बॅनर्जी यांनी तर याबाबत पवार साहेबांना लेखी पत्र लिहिले असून **(पान ३२ वर)**



# संपादकीय



# धर्मांधता व विद्वेष जोपासणारा कायदा

**"केवळ मुसलमानांना नागरिकत्व नाकारणे हे भारतीय संविधानाच्या मुलभूत चौकटीत तर बसत नाहीच, पण ते केवळ 'हिंदूराष्ट्र' या संकल्पनेचा पाठपुरावा करणारे आहे. जगभरातील निरनिराळ्या देशांचे नागरिकत्व स्वीकारलेल्या हिंदूंना ते केवळ हिंदू आहेत म्हणून आम्ही नागरिक म्हणून स्वीकारणार आहोत का?**

२०१४ आणि २०१९ च्या निवडणुकांमध्ये भारतीय जनता पक्षाने त्यांच्या जाहिरनाम्यात भारतीय नागरिकत्व कायद्यात दुरुस्ती करणारे विधेयक आणण्यात येईल, असे आश्वासन दिले होते. १६ व्या लोकसभेत (२०१४ ते २०१९) हे विधेयक संमत झाले होते. मात्र ईशान्य भारतात झालेल्या विरोधामुळे राज्यसभेत ते मांडले गेले नव्हते. दरम्यान १६ व्या लोकसभेची मुदत संपल्यामुळे हे विधेयक व्यपगत झाले होते. २४ मार्च २०१९ च्या मतमोजणीनंतर १७ वी लोकसभा अस्तित्त्वात आली. यावेळी भाजपला पुन्हा बहुमत मिळून नरेंद्र मोदी पंतप्रधान आणि अमित शहा गृहमंत्री झाले. श्री. शहा यांनी ९ डिसेंबर, २०१९ रोजी पुन्हा हे दुरूस्ती विधेयक लोकसभेत मांडले. "धार्मिक छळाला कंटाळून पाकिस्तान, बांगलादेश आणि अफगाणिस्तान या देशांतून ३१ डिसेंबर २०१४ पर्यंत भारतात आलेल्या हिंदू, शीख, बौद्ध, जैन, पारशी व ख्रिस्ती धर्माच्या लोकांना बेकायदा स्थलांतरित मानले जाणार नाही आणि त्यांना भारतीय नागरिकत्व दिले जाईल," अशी तरतूद नागरिकत्व (दुरुस्ती) विधेयक २०१९ मध्ये असल्याचे सांगून श्री. शहा यांनी ही दुरुस्ती घटनेच्या सहाव्या अनुसूचित समाविष्ट केलेल्या आसाम, मेघालय, मिझोराम आणि त्रिपुरा या राज्यांतील आदिवासी भागांना, तसेच बंगाल ईस्टर्न फ्रंटियर रेग्युलेशन १८७३ मध्ये अधिसूचित केलेल्या भागांना लागू असणार नाही," असे नमूद करुन 'शरणार्थींसाठी' हे विधेयक आहे असे स्पष्टपणे सांगितले. एवढे सांगून श्री. शहा थांबले नाहीत. ते पुढे म्हणाले, "१९५९ मध्ये नेहरू-लियाकत यांच्यातील करारानुसार, त्या देशातील अल्पसंख्यांकांच्या हक्कांचे संरक्षण होणे अपेक्षित होते. पाकिस्तान तसेच बांगलादेशात कराराची अंमलबजावणी झाली नाही. शेजारी देशांतील अल्पसंख्य समाजावर धर्माच्या आधारावर अत्याचार झाले. काँग्रेसने धर्माच्या आधारे देशाचे विभाजन होऊ दिले, म्हणूनच हे विधेयक मांडण्याची गरज भासली. पाकिस्तान, अफगाणिस्तान आणि बांगलादेशातील मुस्लिमांचा धर्माच्या आधारे छळ होत नाही. त्यामुळे या विधेयकाचा मुस्लिमांना फायदा मिळू शकत नाही; पण शेजारी देशातील मुस्लिमांनी छळ होत असल्याच्या आरोपावरून नागरिकत्व मागितल्यास त्यावर खुल्या मनाने विचार करु."

यावेळी विधेयकाला विरोध करणाऱ्यांनी मूलभूत हक्क प्रदान करणाऱ्या राज्यघटनेतील कलम १४ मधील समानतेच्या तत्त्वाची या विधेयकामुळे पायमल्ली होत असल्याचा आरोप करुन नेपाळ आणि श्रीलंकेतील मुस्लिमांनाही नागरिकत्व देण्याची दुरुस्ती या विधेयकात करण्यात यावी अशी मागणी करीत विरोधकांनी या विधेयकाला कडाडून विरोध केला. ९ डिसेंबरला लोकसभेत सकाळी हे विधेयक मांडण्यासाठी झालेली चर्चादेखील वादळी ठरली. त्यामुळे विधेयक पटलावर मांडण्याच्या अनुमतीसाठी मतदान घ्यावे लागले. २९३ विरुद्ध ८२ मतांनी विधेयक लोकसभेत मांडण्यात आले. काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस, तृणमूल काँग्रेस, द्रमुक, समाजवादी पक्ष, आम आदमी पक्ष, बसप, माकप यांच्यासह केरळ, आसाममधील छोटे पक्ष, डावे पक्ष, एमआयएम आणि आययूएमएल आदी पक्षांनी या विधेयकाला विरोध केला. "या विधेयकामुळे देशाची आणखी एक फाळणी होत आहे. हे विधेयक संविधानविरोधी असून त्यातून स्वातंत्र्यसैनिकांचा अपमान होत आहे," असे सांगत एमआयएमचे प्रमुख खासदार असादुद्दीन ओवेसी यांनी विधेयकाची प्रत लोकसभेत टराटरा फाडली. "मुस्लिमांचा विरोध हा एकमेव उद्देश या विधेयकाचा आहे," असा हल्लाबोल करताना ओवेसी यांनी "तिबेट व अक्साई चीन मधील मुस्लिमांचा यात का उल्लेख नाही," असा सवाल केला.

"हे विधेयक सर्वोच्च न्यायालयात टिकू शकणार नाही. तेव्हा सरकारने

विधेयकाचा फेरविचार करावा," असा इशारा सत्ताधाऱ्यांना देऊन लोकसभेतील राष्ट्रवादी काँग्रेसच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी सरकारचा खरपूस समाचार घेतला. ''भाजपची विचारसरणी आजच्या काळात बाद झाली आहे. महाराष्ट्राच्या विधानसभा निवडणुकीत भाजपने ७५ हून अधिक उमेदवार काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेसमधून घेऊन उभे केले होते. त्यातले ४०-४५ निवडूनही झाले आहेत. त्यामुळे भाजपने विचारसरणीवर न बोललेलेच बरे," असा टोला लगावून सौ. सुळे यांनी "ईशान्येकडील राज्यांना इनर लाइन परमिट दिल्यावरुन एक देश एक कायद्याचे काय झाले," असा सवालही केला. "सरकारची घोषणा 'सबका साथ सबका विकास' अशी असताना देशातील दुसऱ्या क्रमांकाच्या समुदायाला (मुस्लिम) असुरक्षित वाटते आहे याचा सरकारने विचार करायला हवा," या शब्दात सुप्रिया सुळे यांनी सरकारच्या डोळ्यात अंजन घातले.



धर्माच्या नावावर देशाच्या विभाजनासाठी काँग्रेस नव्हे, तर स्वातंत्र्यवीर सावरकरांनी मांडलेला द्विराष्ट्रवादाचा सिद्धांन्त कारणीभूत असल्याचा आरोप करून काँग्रेसचे नेते मनीष तिवारी म्हणाले,"हे विधेयक सरकारला धार्मिक मुद्द्यांवर भेदभाव करण्याचा अधिकार देणारे आहे. शरणागताची जात, धर्म न पाहता मानवतेच्या आधारे आश्रय देण्याची भारतीय परंपरा आहे. तसा व्यापक निर्वासित कायदा आणावा." द्रमुकचे खासदार दयानिधी मारन यांनी "विधेयकात श्रीलंकेचा समावेश का नाही?" असा प्रश्न उपस्थित करुन "भाजपच्या जाहीरनाम्यातील आश्वासनात ख्रिश्चनांचा उल्लेख नव्हता. पाश्चात्य देशांच्या भयामुळे विधेयकात ख्रिश्चनांचा समावेश केला आहे," असा आरोप केला. तृणमूल काँग्रेसचे अभिषेक बॅनर्जी यांनी "हे विधेयक केवळ राजकीय फायद्यासाठी आणले आहे. पश्चिम बंगालशी केंद्र सरकार भेदभाव करीत आहे. बंगालमध्ये एनआरसी कोणत्याही परिस्थितीमध्ये लागू केली जाणार नाही," असे स्पष्टपणे सुनावले.

श्रीलंकेतील तमीळ, म्यानमारमधील मुस्लिम तसेच पाकिस्तानातील मुस्लिमांतील अन्य समुदायातील व्यक्तिंना या विधेयकाचा लाभ मिळणार नाही हे वरील विवेचन व विधेयकातील तरतुदींवरुन स्पष्ट होते. लोकसभेत रात्री उशीरापर्यंत या दुरुस्ती विधेयकावर चर्चा होऊन मतदान झाले. विधेयकाच्या बाजूने ३११ तर विरोधात ८२ मते





नागरिकत्व दुरुस्ती कायद्याला विरोध म्हणून उत्तर प्रदेशात युवकांनी गाड्या जाळून दगडफेक केली.

पडली. शिवसेना, अकाली दल, जनता दल युनायटेड आणि अण्णा द्रमुक या पक्षांनी विधेयकाला पाठिंबा दिला. धर्माच्या आधारावर विचार न करता सर्व बेकायदा स्थलांतरितांना हद्दपार करण्यासाठी २४ मार्च १९७१ ही आधार तारीख (कट-ऑफ-डेट) निश्चित करणारी १९८५ सालच्या आसाम करारातील तरतूद यामुळे निष्प्रभ ठरेल, असे सांगून ईशान्य भारतातील अनेक लोक व संघटनांनी या विधेयकाला मोठा विरोध केला. यावर भाष्य करताना अमित शहा म्हणाले, "पाकिस्तानमध्ये मुस्लिम अल्पसंख्य नाहीत. म्यानमार हे धर्मनिरपेक्ष राष्ट्र असून तेथील रोहिंग्या बांगलादेशातून येतात. त्यांना कधीही निर्वासित म्हणून स्वीकारले जात नाही. मतांच्या राजकारणासाठी घुसखोरांना शरण देण्याच्या कृतीला या विधेयकामुळे आळा बसेल. संविधानातील अनुच्छेद १४ मध्ये समाविष्ट असलेल्या समान हक्कांचे या दुरुस्ती विधेयकामुळे उल्लंघन होत नाही. त्यामुळे हे विधेयक संसदेत मांडणे अवैध ठरत नाही." माकपचे सरचिटणीस सीताराम येचुरी यांनी शहांचे म्हणणे खोडून

नागरिकत्व दुरुस्ती कायद्याला विरोध म्हणून सिलामपूर येथे दगडफेक करून वाहने पेटवून देण्यात आली.



काढीत “या विधेयकाद्वारे सरकारने धार्मिक ध्रुवीकरण अधिक धारदार केले आहे. त्यांना भारतीयांमध्ये फूट पाडून धर्मनिरपेक्ष लोकशाही प्रजासत्ताक देशाला हिंदू राष्ट्रात रूपांतरित करायचे आहे.” असा जळजळीत आरोप केला.

लोकसभेत हे विधेयक संमत होताच निर्वासितांचा वाढता टक्का हीच प्रमुख समस्या बनलेल्या ईशान्येकडील राज्यांमध्ये प्रचंड संताप उफाळून आला. आसाम, त्रिपुरा, अरुणाचल, नागालँड, मेघालय या राज्यांमध्ये ११ तासांचा बंद पाळण्यात आला. या काळात सार्वजनिक वाहतुक व दैनंदिन व्यवहारही अनेक भागात दगडफेक झाली. वाहने पेटवून देण्यात आली. शाळा, महाविद्यालये, कार्यालये, बाजारपेठा बंद ठेवल्या गेल्या. आसामातील नागरिकांनी गुवाहाटीतील मंत्रालय व विधानभवनावर मोर्चा नेण्याचा प्रयत्न केला. तो रोखताना पोलिसांनी लाठीमार केला. अनेक ठिकाणी ‘सीआयएसएफ’ कर्मचारी आणि आंदोलकांमध्ये झटापट झाली. त्यात बरेचजण जखमी झाले. विधेयक मागे घेण्यासाठी चित्रपट कलावंत व गायकही रस्त्यावर उतरले. आगरतळामध्ये महिलांनी मोर्चा काढला. त्रिपुरातील स्थानिकच अल्पसंख्य झाल्याने



नागरिकत्व दुरुस्ती कायद्याला विरोध दर्शविण्यासाठी कोलकाता येथे निघालेली भव्य रॅली.

कोलमडले. तोडफोड, जाळपोळ, दगडफेक, सुरक्षा दलांवर हल्ले, पोलिसांशी चकमक यांसारख्या घटनांनी राज्यांमधील शांततेस धक्का लागला. त्रिपुरात परिस्थिती हाताबाहेर जाऊ लागल्याने ४८ तासांसाठी इंटरनेट सेवा स्थगित करण्यात आली. ऑल आसाम स्टुडंटस् युनियन आणि नॉर्थ ईस्ट स्टुडंटस् ऑर्गनायझेशन या दोन विद्यार्थी संघटनांनी आसाम बंदचे आवाहन केले होते. ‘एसएफआय’, ‘डीवायएफआय’, ‘एडवा’, ‘एआयएसएफ’ आणि ‘आयसा’ या संघटनांनी पाठिंबा दिलेल्या भागात कडकडीत बंद पाळण्यात आला. विरोध अधिकच तीव्र होता. इटानगरच्या राष्ट्रीय महामार्गावर टायर जाळून वाहतूक रोखली. नागालँडमध्ये नागा स्टुडंटस् फेडरेशनच्या विद्यार्थ्यांनी राजभवनासमोर ठिय्या आंदोलन केले. मेघालयात सरकारी कार्यालयात दहा टक्के कर्मचारीसुद्धा कामावर आले नाहीत.

देशभर विधेयकाच्या विरोधात वातावरण पेटलेले आहे हे पाहून महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रीपदाची नव्यानेच सूत्र हाती घेतलेल्या शिवसेनेचे कार्याध्यक्ष उद्धव ठाकरे यांनी विधेयकाला पाठिंबा देण्याची शिवसेनेची भूमिका बदलून घूमजाव केले.

# कडवेपणाच्या दर्शनासाठी योगी व शहात चुरस





हिंदुत्वाबाबत कोण जास्त कडवा आहे हे दाखविण्यासाठी गृहमंत्री अमित शहा आणि उत्तरप्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्यात जबरदस्त चुरस निर्माण झाली आहे. पुढच्या लोकसभा निवडणुकीनंतर मोदींच्या पंतप्रधानपदाची जागा आपल्याला मिळावी आणि हिंदुत्व सांभाळण्याबाबत आपणच जास्त दक्ष व सावध आहोत याची खात्री राष्ट्रीय स्वयंसेवक संघाला पटावी यासाठी दोघांनीही डावपेच आखण्यास सुरुवात केली आहे. काश्मीरातील ३७० कलम आणि नागरिक दुरुस्ती विधेयक आणून अमित शहा यांनी आज तरी बाजी मारून आपण योगींच्या पुढचे आहोत आणि मोदींचे उत्तराधिकारी आपणच होणार आहोत असे चित्र निर्माण केले आहे. त्याला प्रत्युत्तर म्हणून योगींनी नागरिकत्वाच्या प्रश्नावरुन उत्तरप्रदेशात झालेले आंदोलन पोलिसांमार्फत मोडून काढताना गोळीबार करुन १९ आंदोलकांना ठार केले. ही अधिकृत आकडेवारी आहे. ठार व्यक्तींची अनधिकृत व गुपीत संख्या अधिक असण्याची शक्यता व्यक्त होत आहे. देशात सगळीकडे जमावबंदी आदेश लागू करुन आंदोलकांना रोखण्याचा प्रयत्न होत असताना उत्तरप्रदेशातच सर्वाधिक ठिकाणी गोळीबार होऊन आंदोलकांना ठार करण्याची भूमिका पोलिस का घेत आहेत आणि यामागे कोण आहे ? असा प्रश्न आता जाहीरपणे राजकीय वर्तुळात विचारला जाऊ लागला आहे. नरेंद्र मोदींची उपयुक्तताही आता कमी होऊ लागली असल्याची चर्चा संघ व भाजप वर्तुळात सुरु झाली असल्याचे मागील चार महिन्यातील घटनांवरुन लक्षांत येऊ लागले आहे व तशी चर्चा सुरु झाली आहे.

"विधेयकाबाबत स्पष्टता येत नाही, तोपर्यंत पाठिंबा नाही," अशी भूमिका मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी मांडली. दरम्यान नागरिकत्व सुधारणा विधेयक हे धार्मिक निकषांसह संसदेत मंजूर झाल्यास केंद्रीय गृहमंत्री अमित शहा तसेच इतर महत्त्वाच्या भारतीय नेत्यांवर निर्बंध लादण्याची मागणी अमेरिकेतील सरकारी आयोगाने (यूएससीआयआरएफ) केली. आयोग टीका करताना म्हणाला, "हे विधेयक म्हणजे चुकीच्या दिशेचे, धोकादायक वळण आहे. भारताच्या धर्मनिरपेक्ष समृद्ध इतिहास आणि राज्यघटनेच्या हे विरोधात आहे." हा आयोग १९९८ मध्ये स्थापन करण्यात आला असून जगभरातील धार्मिक स्वातंत्र्याच्या उल्लंघनाच्या घटनांचा तो आढावा घेऊन अमेरिकेचे अध्यक्ष, मंत्री आणि काँग्रेसला



नागरिकत्व दुरुस्ती कायद्याला विरोध दर्शविण्यासाठी त्रिपुरा येथे विद्यार्थीनींनी काढलेला मशाल मोर्चा



नागरिकत्व दुरुस्ती कायद्याला विरोध दर्शविण्यासाठी आसामात महिलांनी बैठे आंदोलन केले.

धोरणात्मक शिफारशी करतो. गुजरातमधील २००२ च्या दंगलीनंतर गुजरातचे तत्कालिन मुख्यमंत्री नरेंद्र मोदी यांचा व्हिसा रद्द करण्याची शिफारस या आयोगाने २००५ मध्ये केली होती. त्यामुळे त्यांच्या टीकेकडे सत्ताधाऱ्यांना दुर्लक्ष करता आले नाही. परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रवीश कुमार यांनी तातडीने खुलासा करुन 'भारताचे नागरिकत्व घेण्याचे कोणत्याही समुदायाचे मार्ग हे विधेयक बंद करणार नाही" असे सांगितले.

पाकिस्तानचे पंतप्रधान इम्रान खान यांनीही ट्विट करुन ''नागरिकत्व विधेयक आंतरराष्ट्रीय पातळीवरील मानवाधिकारांचे उल्लंघन करणारे आणि भारत-पाकिस्तानमधील द्विपक्षीय कराराचा भंग करणारे आहे. हे विधेयक राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या हिंदू राष्ट्र संकल्पनेच्या विस्तारवादाचे मॉडेल आहे,'' अशी टीका केली. पाकिस्तानच्या परराष्ट्र मंत्रालयानेही ''भारताने मंजूर केलेले नागरिकत्व सुधारणा विधेयक प्रतिगामी आणि भेदभाव करणारे आहे. शेजारील देशांमध्ये धार्मिक आधारावर हस्तक्षेप करण्याच्या वाईट हेतूने हे विधेयक मंजूर करण्यात आले आहे. या कायद्यामुळे धार्मिक आधारावर भेदभाव केला जाणार असून, हा भेदभाव आंतरराष्ट्रीय पातळीवरील शाश्वत मानवाधिकाराच्या तत्त्वांना पायदळी तुडविणारा असून त्यामुळे भारताचा मुस्लिमांबद्दल असलेला दृष्टीकोन जगाला कळला आहे,'' या शब्दात आपली प्रतिक्रिया व्यक्त केली.

''दुभंगाचे राजकारण करणाऱ्या भाजपने या दुरुस्ती विधेयकाच्या माध्यमातून एका दगडात अनेक पक्षी मारले आहेत. त्यामागील राजकीय हेतू अगदी स्पष्ट आहेत. परंतु, त्यामुळे मूल्यांच्या गाभ्याला धक्का बसला आहे,'' असे मत काही वर्तमानपत्रांनी आपल्या संपादकीयात व्यक्त करून पुढे म्हटले की, नागरिकत्व देताना मुस्लिम समाजाला वगळल्यामुळे साहजिकच वादाचे मोहोळ उठले आहे. मात्र संपूर्णपणे राजकीय तसेच संघपरिवाराच्या पुरातन ध्येयधोरणांना साजेसे हे विधेयक आहे. हे खरे, की काळानुसार घटनेतील तरतुदी बदलाव्या लागतात. मात्र, घटनात्मक मूल्यांचा गाभा अबाधितच ठेवावा लागतो. या विधेयकाच्या बाबतीत मात्र गाभ्यालाच धक्का लागला आहे.'' अनेक घटनातज्ज्ञांनी देखील या मुद्यावर बोट ठेवले.

इतिहास संशोधक रोमिला थापर, चित्रपट निर्मात्या अपर्णा सेन, दिल्ली उच्च न्यायालयाचे माजी मुख्य न्यायाधीश ए.पी.शहा, देशाचे पहिले माहिती आयुक्त वजाहत हबीबुल्लाह, अभिनेत्री नंदिता दास, सामाजिक कार्यकर्ते योगेंद्र यादव, तिस्ता सेटलवाड, अरूणा रॉय, हर्ष मंदेर व असंख्य तज्ज्ञ, माजी नोकरशहा, न्यायाधीश, लेखक, कलाकार, वैज्ञानिक अशा सहाशे जणांनी सरकारला एक खुले पत्र लिहिले असून त्यात हे विधेयक देशाचे विभाजन करणारे आणि राज्यघटनेचे उल्लंघन करणारे असल्यामुळे ते मागे घ्यावे अशी मागणी केली आहे. या विधेयकाचा संघराज्य व्यवस्थेलाच धोका असून, या विधेयकान्वये कायदा अस्तित्वात आला तर लोकशाहीचे वैशिष्ट्यच संपुष्टात येईल, अशी भिती व्यक्त करण्यात आली आहे. विधेयकाला विरोध म्हणून राष्ट्रीय पुरस्कार विजेते चित्रपट निर्माते जाहनू बरूआ यांनी त्यांचा 'भोगाखिरीकी' (ब्रोकन

विंडो) हा चित्रपट आसाम चित्रपट महोत्सवातून माघारी घेतला. या चित्रपटाच्या निर्मात्या अभिनेत्री प्रियंका चोप्रा असून सत्तेच्या राजकारणापासून राजकीय नेते मातृभूमीचे वस्त्रहरण करीत आहेत अशी टीका त्यांनी केली.

९ डिसेंबरला लोकसभेत मंजूर झालेले हे नागरिकत्व दुरुस्ती विधेयक ११ डिसेंबर रोजी मंजुरीसाठी राज्यसभेत मांडण्यात आले. राज्यसभेत हे विधेयक मांडताना गृहमंत्री अमित शहा म्हणाले, "देशाची धर्माच्या आधारावर फाळणी झाली नसती तर हे विधेयक आणायची गरज पडली नसती. बोलून शहा थांबले नाहीत तर विरोधकांना डिवचण्यासाठी ते पुढे म्हणाले, "माझ्या सात पिढ्या याच देशात जन्मल्या आहेत. मी विदेशातून आलेलो नाही. त्यामुळे कोणी मला भारताची कल्पना समजविण्याची गरज नाही. 'सर्जिकल स्ट्राईक', 'कलम ३७०' आणि 'नागरिकत्व विधेयकावर' पाकिस्तानी पंतप्रधान इम्रान खान आणि काँग्रेसच्या नेत्यांची संसदेतली विधाने एकसारखी असतात." त्यामुळे काँग्रेसचे सदस्य भडकले आणि सभागृहात गोंधळ माजला. साडेसहा तास झालेल्या वादळी चर्चेनंतर मतदान घेण्यात आले तेव्हा विधेयकाला



नागरिकत्व दुरुस्ती कायद्याला विरोध दर्शविण्यासाठी गुवाहाटी येथे युवकांनी काढलेल्या मोर्चावर पोलिस लाठीमार करताना.



फाळणीनंतर उद्‌भवलेल्या परिस्थितीवर तोडगा काढण्यासाठी हे विधेयक आणावे लागले. देशापुढच्या समस्या साचत राहिल्या. हे विधेयक ५० वर्षांपूर्वी आणले असते तर परिस्थिती एवढी बिघडली नसती. देशवासीयांचे लक्ष उडविण्यासाठी विधेयक आणलेले नाही. मोदी सरकारच्या काळात ५६६ मुस्लिम नागरिकांना नागरिकत्व देण्यात आले आहे. तुमची धर्मनिरपेक्षतेची व्याख्या मुस्लिमांपुरती मर्यादित आहे." एवढंच जोरदार विरोध करताना ते सिलेक्ट कमिटीकडे पाठविण्याची मागणी विरोधकांनी लावून धरली. या मुद्यावरही मतदान घेण्यात आले. सिलेक्ट कमिटीकडे पाठविण्याचा प्रस्ताव १२४ विरुद्ध ९९ मतांनी फेटाळण्यात आला. राज्यसभेत विधेयक मंजूर झाले त्याच दिवशी (११ डिसेंबर) गुवाहाटीमध्ये नागरिकांनी नग्न व अर्धनग्न मोर्चा काढून केंद्र सरकारचा निषेध केला. आसामचे मुख्यमंत्री सोनोवाल यांना विमानतळावरच अडकून

राहावे लागले. पोलिसांनी अनेक ठिकाणी लाठीमार केला. अश्रूधुराच्या नळकांड्या फोडल्या. रबरी बुलेटचा गोळीबार केला. जम्मू-काश्मिरात तैनात असलेले सीआरपीएफ, बीएसएफ आणि एसएसएफ जवानांच्या ५० कंपन्याना (पाच हजार जवान) ईशान्य भारतातील राज्यात हलविण्यात आले. यातील दोन हजार जवान त्रिपुरात राधानगर आणि धुलाई जिल्ह्यात तैनात केले गेले.

राज्यसभेत मतदानाच्या वेळी शिवसेनेने विधेयकातील तरतुदींवर जोरदार आक्षेप घेत सभात्याग केला. मतदानात भाग न घेता व भाजपकडून देशभक्तीचे प्रमाणपत्र आम्हाला नको असे म्हणत शिवसेना नेते खासदार संजय राऊत म्हणाले, "या विधेयकाचे जो समर्थन करेल तो देशभक्त आणि जो समर्थन करणार नाही तो देशद्रोही, विरोध करणारे पाकिस्तानची भाषा बोलत आहेत, असे आपण वाचले आहे. पण ही पाकिस्तानची असेंम्ब्ली नाही तर भारताची संसद आहे. भाजपने आम्हांला देशभक्ती शिकवायची गरज नाही. आमचा प्रत्येक शिवसैनिक प्रखर देशभक्तच आहे." यावर अमित शहा यांनी शिवसेना नेते राऊत यांना टोला लगावताना, "सत्तेसाठी लोक कसे रंग बदलतात. लोकसभेत सोमवारी (९ डिसेंबर) शिवसेनेने या विधेयकाला पाठिंबा दिला होता. एका रात्रीत असे काय झाले की, शिवसेनेने रंग बदलला? याचे उत्तर महाराष्ट्रातील जनतेला मिळाले पाहिजे." असे म्हटले.

"महात्मा गांधींचे नाव आणि त्यांचा चष्मा केवळ जाहिरातींसाठी नाही. मोदी सरकारने त्यांच्या चष्म्यातून देश, समाज आणि मानवता पाहिली पाहिजे. नागरिकत्व दुरुस्ती विधेयक हे गांधीजींच्या विचारांशी संघर्ष करणारे आहे," अशी टीका करुन राज्यसभेतील काँग्रेसचे उपनेते आनंद शर्मा चर्चेत भाग घेताना पुढे म्हणाले, "आपल्या देशात सर्व देशांच्या संस्कृती शक्यतोवर मुक्त स्वरुपात याव्यात, असे महात्मा गांधींनी म्हटले होते. हे विधेयक आमच्या राज्यघटनेच्या पायाभूत मूल्यांवर, भारताच्या हृदयावर आघात करणारे व लोकशाहीच्या विरोधी आहे. आमच्या धर्मात पुनर्जन्मावर विश्वास आहे. सरदार


नागरिकत्व दुरुस्ती कायद्याला विरोध दर्शविण्यासाठी दुचाकी वाहने पेटवून नागरिकांनी आपला असंतोष व्यक्त केला.



नागरिकत्व दुरुस्ती कायद्याला विरोध दर्शविण्यासाठी केरळातील कोची येथे निघालेली भव्य रॅली.

# भारतात जन्मलो, मरूही भारतातच...

पटेल किंवा महात्मा गांधी जेव्हा केव्हा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना भेटतील तेव्हा ते अतिशय दुःखी होतील." पी. चिदंबरम यांनी, "या विधेयकावरील विधी व न्याय मंत्रालयाचे मत सभागृहाच्या पटलावर मांडण्यात यावे आणि ॲटर्नी जनरलना शंकांचे निराकरण करण्यासाठी सभागृहात पाचारण करण्यात यावे अशी मागणी करुन श्रीलंकेतील हिंदू आणि भूतानमधील ख्रिश्चनांना का वगळण्यात आले," असे प्रश्न उपस्थित केले. तृणमूल काँग्रेसचे नेते डेरेक ओब्रायन यांनी, "भाजप अधिकारांच्या गोष्टी करतो; पण या घुसखोरांनी तुमचे अधिकार हिरावले असा दावा करणाऱ्या सरकारच्या मागील पाच वर्षाच्या काळात देशातील दोन कोटी लोकांनी रोजगार गमावले आहेत. जे देशात आहेत, त्यांची चिंता करु शकत नसेल तर हे सरकार अधिकारांच्या आणि सन्मानाच्या गोष्टी का करीत आहे?" असा सवाल उपस्थित केला.

"अमित शहा यांनी इतिहासाची कोणती पुस्तके वाचली आहेत?" असा प्रश्न उपस्थित करुन नामवंत कायदेतज्ज्ञ कपिल सिब्बल म्हणाले, "हे विधेयक देशाचे विभाजन करणारे आहे. लव्ह जिहाद, एनआरसी, कलम ३७० ते नागरिकत्व दुरुस्ती विधेयकापर्यंत (भाजपचा) अजेंडा आम्हाला २०१४ पासून ठाऊक आहे. द्विराष्ट्र संकल्पना काँग्रेसची नाही, तर वीर सावरकरांची आहे. अशा विचारांवर काँग्रेस विश्वास ठेवत नाही. त्यावरुन केलेले आरोप अमित शहांनी मागे घ्यावेत. हे विधेयक द्विराष्ट्र सिद्धांताला घटनात्मक दर्जा देणारे आहे."

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री व शिवसेना कार्याध्यक्ष उद्धव ठाकरे यांनी सुधारित नागरिकत्व कायदा हा स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या भूमिकेच्या विरोधात आहे असे विधान केले. श्री. ठाकरे पुढे म्हणाले, "भाजपने लागू केलेल्या या कायद्यामुळे देशभर वातावरण पेटले आहे. देश एकसंध ठेवण्याच्या सावरकरांच्या तत्त्वात हे बसते का, याचे उत्तर त्यांचे नाव घेणाऱ्या भाजपने द्यावे. या कायद्याच्या अंमलबजावणीबाबत काय भूमिका घ्यायची याचा निर्णय सर्वोच्च न्यायालयाच्या निकालानंतरच घेऊ." एवढ्यावरच उद्धवजी थांबले नाहीत. ते पुढे म्हणाले,

"देशापुढे अनेक गंभीर प्रश्न आहेत. महिलांवरील अत्याचार, शेतकऱ्यांचे प्रश्न आहेत, रोजगाराचा प्रश्न आहे. हे सर्व बाजूला ठेवून जनतेचं लक्ष केंद्र सरकारकडून विचलित केलं जातंय हे दुर्दैव आहे. स्वातंत्र्यवीर सावरकरांबद्दल आम्हालाही निश्चित आदर आहे आणि शिवसेनेच्या भूमिकेत कदापिही बदल होणार नाही. मात्र, आमच्या विरोधकांना फक्त भांडणे लावायची आहेत. जर त्यांना सावरकरांबद्दल इतकाच आदर वाटत असेल तर त्यांनी सावरकरांच्या स्वप्नातील सिंधू ते सिंधुसागर असा एक देश घडवायला हवा होता. मात्र, तसे न करता आधीच विभक्त झालेल्या देशाच्या भागातून तिथले हिंदू नागरिक आपल्या देशात ते आणून ठेवत आहेत. नागरिकत्व कायदा सावरकरांच्या तत्त्वाविरोधी आहे. शेजारच्या देशातील हिंदूंबद्दल भाजपला इतकीच काळजी होती तर आमच्या पंतप्रधानांनी (नरेंद्र मोदी) त्या देशांच्या प्रमुखांना ठणकवायला हवे होते आणि आपल्या हिंदू बांधवांना तिथेच राहून संरक्षण कसे मिळेल याची व्यवस्था करायला हवी होती. मात्र, तसे न करता त्यांनी तिथल्या हिंदूंनाच इथे आणून ठेवले आहे," अशी टीकाही त्यांनी केली.

संसदेच्या दोन्ही सभागृहात हे विधेयक मंजूर झाल्यानंतर 'हा कायदा भारतीय नागरिकांमध्ये मूलभूत स्वरुपाचा भेदभाव करणारा आहे." अशी प्रतिक्रिया जिनिव्हा येथून संयुक्त राष्ट्रसंघाच्या (युनो) मानवी हक्क समितीने दिली. समितीचे प्रवक्ते जेरेमी लॉरेन्स म्हणाले, "या कायद्यानुसार पाकिस्तान, अफगाणिस्तान आणि बांगलादेशातून भारतात स्थलांतरित झालेल्या बिगर मुस्लिम नागरिकांनाच नागरिकत्व मिळेल. हा कायदा भारतीय संविधानातील समानतेच्या तत्त्वाला सुरुंग लावतो."

राज्यसभेत विधेयक मंजूर झाल्यानंतर त्याच्या दुसऱ्या दिवशी (१२ डिसेंबर) लगेचच राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांनी विधेयकावर स्वाक्षरी केली. त्यामुळे त्याचे कायद्यात रूपांतर झाले. आता हा कायदा नाकारण्याचा अधिकार राज्य सरकारला नाही अशी केंद्र सरकारची भूमिका व म्हणणे आहे. केंद्रीय गृहमंत्रालयाने राज्यांना हा कायदा पाळावाच लागेल असे स्पष्ट केले आहे. मात्र, ही अंमलबजावणी राज्य सरकारांच्या प्रशासन यंत्रणेच्या मदतीने करायची असून, बिगरभाजपशासित राज्यांनी असहकार पुकारल्यास ते अवघड ठरणार आहे. तर पश्चिम बंगाल, पंजाब, केरळ, मध्यप्रदेश आणि छत्तीसगड या पाच राज्यांनी हा कायदा घटनाविरोधी असल्याचा दावा करत त्याची राज्यात अंमलबजावणी करणार नसल्याचे जाहीर केले आहे. त्यामुळे आता देशात केंद्र विरुद्ध राज्य असा संघर्ष निर्माण झाला आहे. छत्तीसगडचे मुख्यमंत्री भूपेश बघेल यांनी "केंद्राचा कायदा घटनाबाह्य असून, काँग्रेस जो निर्णय घेईल, तो आम्ही राज्यामध्ये लागू करु" अशी भूमिका घेतली आहे. पंजाबचे मुख्यमंत्री कॅ. अमरिंदरसिंग यांनी "पंजाबमध्ये आम्ही नागरिकत्व कायद्याची अंमलबजावणी होऊ देणार नाही. विधिमंडळामध्ये आमच्याकडे संख्याबळ असल्याने आम्ही त्याला रोखू" असे जाहीर केले आहे. तर




डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी यांनी लिहिलेल्या घटनेची केंद्र सरकार मोडतोड करीत असून त्याला विरोध करण्यासाठी उत्तर प्रदेशात मुस्लिम नागरिकांनी काढलेला मोर्चा

पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी ''भाजपने त्यांच्या जाहीरनाम्यामध्ये विकासाच्या मुद्याऐवजी देशाचे विभाजन करण्याची बाब मांडली आहे. धर्माच्या आधारावर नागरिकत्व का दिले जात आहे?" असा प्रश्न उपस्थित करुन कायद्याच्या अंमलबजावणीस विरोध केला आहे. "हा कायदा राज्यघटनेच्या कलम १४ च्या तरतुदीविरोधात आहे. त्यामुळे तो महाराष्ट्रात लागू करता कामा नये अशी भूमिका राष्ट्रवादी काँग्रेस व काँग्रेस पक्षाने घेतली असून याबाबतचा निर्णय महाआघाडीतील तिन्ही पक्षांच्या समन्वय समितीत घेतला जाईल," असे राष्ट्रवादी काँग्रेसचे मुख्य प्रवक्ते नवाब मलिक यांनी स्पष्ट केले आहे. दरम्यान काँग्रेसचे नेते जयराम रमेश, त्रिपुरा काँग्रेसचे माजी अध्यक्ष प्रशांत किशोरदेव बर्मन, इंडियन मुस्लिम लीग, तृणमूल काँग्रेसच्या खासदार मोहुआ मोईत्रा, सिम्बायोसिस लॉ स्कूलचे विद्यार्थी, मनोहरलाल शर्मा यांच्यासह अकरा याचिकाकर्त्यांनी या कायद्याच्या वैधतेला सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले आहे.

१८ डिसेंबरला अमेरिकी काँग्रेसच्या 'सीआरएस' संशोधन संस्थेने राष्ट्रीय नागरिक नोंदणी (एनआरसी) आणि सुधारित नागरिकत्व कायदा (सीएए) यामुळे भारतातील २० कोटी मुस्लिमांच्या दर्जावर परिणाम होईल असे भाकीत करुन धर्माच्या आधारावर नागरिकत्व देण्याचा पक्षपातीपणा का करण्यात आला असा प्रश्न उपस्थित केला आहे. पुढे संस्थेने म्हटले आहे की, श्रीलंकेत बौद्ध धर्म अधिकृत असून तेथे तमीळ हिंदूंचा छळ झाला आहे. बर्मात बौद्ध धर्म असून तेथे रोहिंग्या मुस्लिमांचा छळ झाला आहे. पण त्यांना नागरिकत्वातून वगळण्यात आले आहे. पाकिस्तानातील अहमदिया व शिया मुस्लिमांनाही नागरिकत्व देण्याचा प्रस्ताव नाही असे का? भारतीय वंशाच्या अमेरिकी लोकांनी २३ डिसेंबरला देशाच्या एकात्मतेचे समर्थन करीत या कायद्याला विरोध करण्यासाठी वॉशिंग्टनच्या भारतीय दूतावासातील गांधीजींच्या पुतळ्यासमोर निदर्शने केली. भारत सरकारने नागरिकत्व कायदा व नागरिकत्व नोंदणी दोन्ही कायदे रद्द करावेत असा ठराव त्यांनी यावेळी



संमत केला.

नागरिकत्व सुधारणा कायद्याला (सीएए) १२ डिसेंबरपर्यंत ९ राज्यांच्या मुख्यमंत्र्यांनी विरोध केला. या नऊ राज्यांची लोकसंख्या देशाच्या एकूण लोकसंख्येच्या ३० टक्के आहे. तसेच देशाचा एक तृतियांश भूभाग ही राज्ये व्यापतात. बिहार, प. बंगाल, आंध्रप्रदेश, ओडिशा, केरळ आणि छत्तीसगड या राज्यांमध्ये 'एनआरसी'च्या विरोधात प्रचंड उद्रेक झाला. सुधारित नागरिकत्व कायद्याला देशभरातून हिंसाचाराने प्रचंड विरोध होत आहे आणि युवक व विद्यार्थी मोठ्या प्रमाणात रस्त्यावर उतरून केंद्र सरकारच्या विरोधात प्रक्षोभकपणे आंदोलन करीत आहेत हे पाहून पंतप्रधान नरेंद्र मोदी हे एनआरसीवरुन बॅकफूटवर गेले. रविवारी २२ डिसेंबर २०१९ रोजी दिल्लीच्या रामलीला मैदानावर झालेल्या सभेत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी "मी हिंदुस्थानातील १३० कोटी जनतेला सांगू इच्छितो की, २०१४ साली पहिल्यांदा माझे सरकार सत्तेत आले तेव्हापासून आत्तापर्यंत आसाम सोडून






नागरिकत्व दुरुस्ती कायदा रद्द करण्यासाठी केरळ विधानसभेने ठराव केल्यानंतर काढलेला भव्य मोर्चा

इतरत्र एनआरसी लागू करण्याबाबत कुठेही, कसलीही चर्चा झालेली नाही. सर्वोच्च न्यायालयाचा आदेश पाळून आम्हाला फक्त आसाममध्येच याची अंमलबजावणी करायची आहे" असे स्पष्ट केले. "नागरिकत्व कायदा व 'एनआरसी'चा भारतातील मुस्लिमांशी संबंध नाही. त्यांनी चिंता करण्याचे कारण नाही. मुस्लिमांना धरपकड केंद्रांमध्ये पाठवणार, अशी अफवा पसरविली जात असून 'एनआरसी'च्या मुद्द्यावरुन केंद्र सरकारने मंत्रीमंडळ किंवा संसदेतही चर्चा केलेली नाही," असेही मोदी यांनी सांगितले.

मोदी यांच्या या वक्तव्याचा लगेचच समाचार घेताना प. बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी "एनआरसी देशभर लागू होणार असल्याचे गृहमंत्री अमित शहा हेच संसदेत सांगतात तर दुसरीकडे पंतप्रधान जाहीरपणे परस्परविरोधी भूमिका मांडतात," अशी टीका केली. "एनआरसीवरुन देशभर विरोधाचे वातावरण झाल्यानेच मोदींनी दोन पावले मागे घेतली आहेत," असा टोलाही बॅनर्जी यांनी लगावला. २३ डिसेंबरला राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार यांनी मुंबईतील सिल्व्हर ओक या आपल्या निवासस्थानी पत्रकार परिषद घेऊन "एनआरसीबाबत भाजपची दुटप्पी भूमिका जनतेसमोर आली आहे," असे सांगितले. यावेळी शरद पवार म्हणाले, "संसद अधिवेशनातील राष्ट्रपतींच्या अभिभाषणातच राष्ट्रीय नागरिकत्व नोंदणी (एनआरसी) बाबत उल्लेख होता. राष्ट्रपतींचे अभिभाषण ही सरकारची भूमिका असते. देशभरात एनआरसी लागू करण्याचे निर्धार देशाचे गृहमंत्री व्यक्त करतात व पंतप्रधान त्याच्या नेमके उलट सांगतात हे योग्य नाही. ही जनतेची दिशाभूल आहे. सत्तेत बसलेल्या लोकांनी शांततेने पावले टाकायची असतात. परंतु सध्याचे सरकार ज्या पद्धतीने धार्मिक अंतर वाढवण्याचा प्रयत्न करताना दिसत आहे त्यातून देशाच्या एकात्मतेला ठेच पोहोचत आहे."

"एनआरसी, सीएए आणि एनपीआर बाबतच्या

# केंद्र सरकारने फक्त मुस्लिमांनाच ठरविले घुसखोर

१९७१ नंतर बांगलादेशातून जे नागरिक आसाममध्ये आले त्यांचा प्रश्न एनआरसीमध्ये येतो. आसाममध्ये १९ लाख नागरिक बांगला देशातून बेकायदेशीररीत्या आलेले आहेत हे एनआरसीच्या अंतिम यादीतून समोर आले आहे. २४ मार्च १९७१ पासून आसामात राहात असलेले आणि त्यानंतर म्हणजे ३१ डिसेंबर २०१४ पर्यंत भारतात राहात असलेले अल्पसंख्य समाजाचे मुस्लिम सोडून जे अन्य धर्मिय लोक आहेत त्यांना या नागरिकत्व दुरुस्ती विधेयकाचा फायदा होणार आहे. ३१ डिसेंबर २०१४ पूर्वी पाकिस्तान, बांगलादेश व अफगाणिस्तान या देशांतून धार्मिक छळामुळे भारतात आलेल्या बौद्ध, पारशी, हिंदू, ख्रिश्चन, शीख व जैन या निर्वासितांना आता कमी अटींवर भारतीय नागरिकत्व मिळणे शक्य होणार आहे. नागरिकत्व मिळण्याची ११ वर्षे असलेली अट सहा वर्षांवर आणण्यात आली आहे. मात्र वरील तिनही देशातून छळ झाल्याने किंवा अन्य कोणत्याही कारणांनी भारतात आलेल्या मुस्लिमांना घुसखोर ठरविले जाणार असून त्यांना भारताचे नागरिकत्व नाकारण्यात येणार आहे.




आंदोलनातून हिंदू-मुस्लिम ध्रुवीकरण होणे देशहिताचे नाही. या आंदोलनातून तत्कालीन राग, निषेध व्यक्त करण्यापेक्षा हा प्रश्न समजून घ्यावा आणि मानवी प्रतिष्ठा, उपजिविका, समान वागणूक व बंधुभाव वृद्धिंगत करण्याची घटनात्मक जबाबदारी पार पाडावी," असे आवाहन करुन ज्येष्ठ विचारवंत प्रा. सुहास पळशीकर म्हणाले, "राज्यसंस्थेनेही नागरिकांना छळण्याचा हट्ट का धरावा; तसेच देश धर्माच्या पायावर उभा नसताना, नागरिकत्व देताना धर्माचा निकष कसा लावायचा?" असे प्रश्नही त्यांनी विचारले. प्रा. पळशीकर पुढे म्हणाले, "गणना, नियमन आणि वितरण ही राज्यसंस्थेची कामे आहेत. हे गणनेचे धोरण राज्यघटनेतील तत्त्वांशी सुसंगत आहे का, असे धोरण आत्ताच आखण्याची काय गरज होती, हे धोरण राबविणे शक्य आहे का? धोरणांचे प्राधान्यक्रम काय असावेत, त्यातून जनतेला काय फायदे होतील याचा धोरणकर्त्यांनी आधी विचार करायला हवा. भारत हा केवळ हिंदूंचा देश नसून, स्वतःला भारतीय मानणाऱ्या विविध (धर्मिय) नागरिकांचा देश आहे. मात्र नागरिकत्व दुरुस्ती कायद्यामुळे देशाच्या मुलभूत अधिष्ठानालाच आडवळणाने धक्का लावला जात असून, कायद्यात झालेल्या बदलात कायमच विशिष्ट समाज घटकाला दूर ठेवण्याचे प्रयत्न करण्यात आले आहेत (ही खेदाची गोष्ट आहे). "

भारताचे माजी केंद्रीय गृह व न्यायसचिव माधव गोडबोले यांनी दै. लोकसत्ताच्या ७ डिसेंबर, २०१९ च्या अंकात 'सुधारित नागरिकत्व कायदा-फेरविचाराची गरज' या शीर्षकाखाली एक लेख लिहिला आहे. त्यात त्यांनी "बेकायदेशीर स्थलांतरित व घुसखोरांच्या प्रश्नाची सांगड नवीन कायद्यामध्ये धर्माशी घातल्यामुळे त्याचे राजकीयीकरण झाले आहे. तसे करताना सरकारने देशाच्या फाळणीचा जो संदर्भ दिला आहे तो सर्वस्वी चुकीचा म्हणावा लागेल," असे स्पष्टपणे नमूद केले आहे. डॉ. गोडबोले पुढे लिहितात, "केवळ मुसलमानांना नागरिकत्व नाकारणे हे भारतीय संविधानाच्या मुलभूत चौकटीत तर बसत नाहीच, पण ते केवळ 'हिंदूराष्ट्र' या संकल्पनेचा पाठपुरावा करणारे आहे. जगभरातील निरनिराळ्या देशांचे नागरिकत्व स्वीकारलेल्या हिंदूंना ते केवळ हिंदू आहेत म्हणून आम्ही नागरिक म्हणून स्वीकारणार आहोत का?....



नागरिकत्व दुरुस्ती कायद्याला विरोध म्हणून आंदोलकांनी कोलकात्याच्या हावडा भागात बस पेटवून दिली.

या घुसखोरांना कोणताही देश परत घेण्यास तयार होणार नाही आणि शेवटी त्यांच्यापासून भारताची सुटका नाही, ही काळ्या दगडावरची रेघ आहे. त्यामुळे नागरिकत्व नाकारुन काय साध्य होणार आहे? त्यांना दुय्यम नागरिक करण्याने प्रश्न अधिक गंभीर तर होणार नाही ना? या सर्व पार्श्वभूमीवर भारताने एक स्वतंत्र कायदा करुन या प्रश्नाच्या सर्व बाबींची उत्तरे शोधली पाहिजेत आणि ती सर्वसंमतीने राष्ट्रीय ध्येयधोरण म्हणून मान्य करवून घेतली पाहिजेत. हा वाद सर्वोच्च न्यायालयावर न सोडता तो संसदेने धसास लावावा. त्या दृष्टीने केंद्र शासनाने कोणताही प्रश्न प्रतिष्ठेचा न करता नागरिकत्व दुरुस्ती कायदा प्रलंबित ठेवावा."

वरील सर्व विवेचन आणि देशातील सद्यस्थिती व सत्ताधारी नेते यांची दररोजची बदलणारी विधाने या सर्वांवरुन आपल्या लक्षांत येईल की देशात अस्वस्थता व गोंधळाची परिस्थिती निर्माण झालेली आहे. अराजकता वाढते आहे. देशातले मूळ प्रश्न उदा. बेरोजगारी, आर्थिक विकास, शेतकऱ्यांच्या आत्महत्या, मंदी, उद्योगांना लागणारे टाळे, उद्योजकांची दिवाळखोरी, बँकांची बुडणारी वाढती कर्जे वगैरे. कळत-नकळत वा जाणीवपूर्वक बाजूला सारले जात आहेत. पंतप्रधान मोदींनी सारवासारव केली तरी गृहमंत्री अमित शहा हे आपला हटवादीपणा सोडायला तयार नाहीत.

नागरिकत्व दुरुस्ती कायद्याला (सीएए) पाठिंबा मिळविण्यासाठी ५ जानेवारीपासून १० दिवसांकरिता भाजपच्या वतीने घरोघरी जाण्याची व्यापक मोहीम व अभियान राबविण्यात येणार आहे. आक्रमक पद्धतीने पावले उचलण्याच्या भाजपच्या या धोरणामुळे त्यांचा हिंदूराष्ट्र करण्याचा अजेंडा आता छुपा राहिलेला नाही.




देशाला विकृत वळण लावून, संकटांच्या आणखीन खोल गर्तेत ढकलून, जगभर भारताची बदनामी करुन, विश्वासार्हता व नावलौकिक संपुष्टात आणून, त्याला काळिमा फासण्याचे काम भाजप सरकारच्या चुकीच्या धोरणांनी व अट्टाहासामुळे होणार आहे. चुकीचे अविचारी व धर्मांध सरकार निवडून दिल्याची चूक जी जनतेने केली आहे त्याची फळे आता जनतेलाच भोगावी लागणार आहेत असे दिसते. काळ कठीण आहे. रात्र वैऱ्याची आहे. सावध राहा!

◆

## भारतीय नागरिकत्व कायद्यात आत्तापर्यंत पाच वेळा दुरुस्ती

स्वातंत्र्यानंतर भारतामध्ये नागरिकत्व कायदा अंमलात आला. त्यामध्ये विदेशी नागरिकांना भारताचे नागरिकत्व हवे असल्यास ते देण्याबाबत काही निकष, नियम व अटी घालण्यात आल्या. आत्तापर्यंत १९८६, १९९२, २००३, २००५ आणि २०१५ अशा पाच वेळा या नागरिकत्व कायद्यात दुरुस्त्या करण्यात आल्या आहेत. २०१९ ला मोदी सरकारने केलेली दुरुस्ती ही सहावी दुरुस्ती आहे. यामध्ये भारताचे नागरिकत्व तीन कारणांमुळे रद्द होऊ शकते - १) एखाद्या व्यक्तीने आपण होऊन त्याचा त्याग केला. २) एखाद्या व्यक्तीने दुसऱ्या देशाचे नागरिकत्व स्वीकारले आणि ३) सरकारने काही कारणास्तव रद्द केले तर. पाचवी दुरुस्ती लोकसभेत मंजूर झाली होती पण त्यावेळेस नॉर्थ ईस्ट (पूर्वांचलातील सेव्हन सिस्टर्स राज्यात) मध्ये मोठा विरोध सुरु झाला आणि राज्यसभेत भाजपला बहुमत नसल्यामुळे त्यांना हे दुरुस्ती विधेयक राज्यसभेत मांडता आले नाही.



# शरद पवार यांची डॉ. सुधीर भोंगळे यांनी घेतलेली खास मुलाखत



# धार्मिक रंग देश ऐक्यासाठी घातक

**शरद पवार यांचे विचार**



**प्रश्न– एनआरसी कायद्याबाबत आपली काय भूमिका आहे?**

**शरद पवार–** याच्यामध्ये दोन भाग आहेत, हे जे दोन शब्द आहेत, त्यामध्ये एक मतदारांची नोंदणी हा एक भाग आणि दुसरं कालच्या पार्लमेंटच्या अधिवेशनामध्ये पाकिस्तान, बांग्लादेश आणि अफगाणिस्तान या तीन देशांतून भारतात येणारे जे लोक आहेत, त्यांच्यामध्ये हिंदू, शीख, जैन, ख्रिश्चन आदी मुस्लीम वगळता त्यांना भारतात प्रवेश देण्यात येईल. त्यांना नागरिकत्व देता येईल, अशा पद्धतीचा निर्णय घेण्यात येईल. या तीन देशातील जे मुस्लीम भारतात येऊ इच्छितात किंवा स्वातंत्र्यानंतर तिकडे राहिले, ज्यांना इथे यायचे आहे, अशांना या ठिकाणी येण्यासाठी बंदी केलेली आहे. आता नागरिकांना वाटते की एखादा भारतीय किंवा मूळ भारतीय या देशात यायचे असेल; तर त्याला अडवायचे काही कारण नाही. अशी शंका येण्याचे कारण नाही, पण हा निर्णय या तीन देशांपुरता सिमीत का? आपल्या देशामध्ये श्रीलंकेतून येणारा तमीळ हा एक वर्ग दुर्लक्षित करून चालणार नाही. यापूर्वी श्रीलंका आणि त्यांच्यामध्ये संघर्ष होता. त्यातले लोकं परराष्ट्र मंत्रालयाकडे आले, आपण त्यांचे पुनर्वसनही केले. पाकिस्तान, बांग्लादेश आणि अफगाणिस्तान येथून येणाऱ्यांना तुम्ही मर्यादा घालता आणि श्रीलंकेसंबंधीचा हा निर्णय का नाही. नेपाळमधून या ठिकाणी येणाऱ्या लोकांसंबधिची काय भूमिका आहे. बर्मामधून या ठिकाणी काही लोकं येत असतात, त्यांच्यासंबंधी काय भूमिका आहे. असे अनेक प्रश्न संसदेत उपस्थित केले गेले. मूळ भारतीयांसंबंधीचा जर विचार केला असता तर याच्यामध्ये कोणी फारशी तक्रार केली नसती. पण मूळ व्याख्येमध्ये एकच वर्ग वगैरे आहे. याचा अर्थ धर्मावर आधारित प्रवेश घेण्याची भूमिका तुम्ही घेता, याला संसदेमध्ये विरोध केला गेला. आणि हा संसदेतच विरोध आहे, असं नाही तर आपण बघतोय की आता देशभर ठिकठिकाणी आंदोलने सुरू झाली आहेत. या आंदोलनांमध्ये मुस्लीमच आहेत, असं नाही तर विविध प्रकारचे घटक आहेत.

या शिवाय भारतामध्ये असलेल्या नागरिकांच्या नोंदणीसंदर्भातील जो प्रश्न आहे, त्याच्यामध्ये त्यांचा जन्म, त्यांचे निवासस्थान भारतामध्ये एखाद्या शहरामध्ये कायम राहात आहे, हे सिद्ध करण्याची जबाबदारी त्यांच्यावर येते. आपल्या देशामध्ये भटक्या विमुक्तांचा मोठा वर्ग आहे. जे एका ठिकाणी राहात नाहीत. एका ठिकाणी त्यांचा मुक्काम नसतो. एखाद्या गावामध्ये त्यांची नोंद नसते. या गावाहून त्या गावाला व्यवसायासाठी, पोटाचा प्रश्न सोडविण्यासाठी ते जात असतात. त्यांनी या अटीची पूर्तता कशी करायची. ते भारतीय नाहीत का, त्यांना आपण कोठे पाठवणार.


नागरिकत्व दुरुस्ती कायद्याला विरोध म्हणून पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांच्या नेतृत्वाखाली कोलकाता येथे निघालेला भव्य मोर्चा.

काही ठिकाणी निर्वासितांच्या छावण्या केलेल्या आहेत. या संबंधी सरकारच्या वतीने नाही सांगण्यात येते. आसाममध्ये संसदेतील सहकारी सांगतात की, तुम्ही या, आम्ही दाखवतो. त्यांना काय भीषण परिस्थितीत रहावं लागतं, हे आपल्याला तिथे पाहिल्यानंतर लक्षात येईल. या भटक्या विमुक्तांना आपण उद्या छावण्यांत पाठवणार आहोत का. एकेकाळी भारतामध्येही भटक्या विमुक्तांना गुन्हेगार म्हणून त्यांना तारेच्या कुंपनात ठेवले जायचे. त्याला सेटलमेंट म्हणायचे, असे सेटलमेंटचे कॅम्प महाराष्ट्रपुरते बोलायचे झाले तर सोलापूरला होते. उल्हासनगरला होते, बारामतीला होते. सोलापूरमध्ये पंडित जवाहरलाल नेहरू यांनी अशा प्रकारच्या भटक्या विमुक्तांचा मेळावा आयोजित केल्यानंतर त्या सेटलमेंटमधील काटेरी तारा त्यांनी स्वतः कापल्या आणि त्यांना विमुक्त केले. तेव्हापासून भटके विमुक्त अशी संज्ञा पडली. एकेकाळी या जमातींकडे गुन्हेगारी म्हणून बघितले जायचे.



या दोन कायद्यांमुळे आपण त्या वर्गांना पुन्हा त्या मार्गाकडे नेणार आहोत का? याची शंका लोकांच्या मनामध्ये आहे, त्यामुळे संबंध देशभर आंदोलन सुरू झाले आहे. हे फक्त मुस्लीमांचे नाही. दुर्दैवाने शासनामधील लोक धार्मिक वृत्तीचे आहेत. आणि देशाच्या प्रमुख पदावर असलेल्या लोकांनी या आंदोलनाचे वर्णन करताना, ते कोणत्या वेशात आहेत, त्यावरून तुमच्या लक्षात येईन, असं वाक्य बोलले. याचा अर्थ काय? याला एक धार्मिक स्वरूप देण्याचा प्रयत्न केला जातोय. देशाच्या ऐक्याच्या दृष्टीने ते अत्यंत घातक आहे. म्हणून राष्ट्रवादी आणि आम्ही लोकांनी संसदेमध्ये याच्याविरूद्ध मतदान केले आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने राज्यसभेमध्ये प्रफुल पटेल आणि





राष्ट्रवादी मासिकाचे संपादक डॉ. सुधीर भोंगळे हे शरद पवार यांच्या पुण्याच्या मोदी बागेतील निवासस्थानी मुलाखत घेताना.






लोकसभेमध्ये सुप्रिया सुळे यांनी भूमिका त्या ठिकाणी मांडली. परंतु आजचे राज्यकर्ते या निर्णयाच्या अंमलबजावणीसाठी आग्रही आहेत. आणि देशात दुसऱ्या बाजूला, जवळपास आठ राज्यांनी या कायद्यासंबंधी तीव्र स्वरूपाची नापसंती व्यक्त केली आहे. आणि विरोध व्यक्त केलेला आहे. देशाच्या ऐक्याच्या दृष्टीने केंद्र सरकारमधील नेतृत्वाने नागरिकत्वाच्या प्रश्नांसंदर्भात अशी हटवादीपणाची व धर्मांध भूमिका घेऊ नये. केंद्र सरकारने विविध घटकांशी, राज्यांशी सुसंवाद साधून यातून मार्ग काढणे, देशासाठी हितकारक आहे.

**प्रश्न– देशातील आज जे सगळे वातावरण आहे, मोदी व शहा यांच्या वागण्याचा विरोधी पक्षांना फायदा कसा उठवता येईल?**

**शरद पवार–** मी आता जे पहिल्या प्रश्नाला उत्तर दिले, ते मोदी व शहा यांच्या वागण्याचे लक्षण आहे. त्याच्यातून विरोधी पक्षाला लाभ व्हावा, हा विचारच आमच्या मनात येत नाही. देशाचे ऐक्य कसे टिकवायचे, हे महत्त्वाचे आहे. याच्यात राजकीय फायदा, लाभ, कोणाच्याही मनात नाही. तसा विचारही नाही. याबद्दल धार्मिक विषयावरून समाजाच्या ऐक्यावर विपरित परिणाम होईल, याची चिंता आहे.

**प्रश्न– कोरेगाव भीमाच्या प्रश्नात तुम्ही म्हणाले की, पोलिसांची चौकशी वगैरे केली पाहिजे...**

**शरद पवार–** तो प्रश्न एल्गार परिषदेच्या संदर्भात होता. एल्गार परिषद ही पुण्यामध्ये आयोजित केली होती. त्यांच्याबरोबर सुप्रिम कोर्टाचे माजी न्यायमूर्ती पी. बी. सावंत, मुंबई हायकोर्टाचे माजी न्यायाधीश बी. जी. कोळसे पाटील यांच्यासह विविध संघटना त्यामध्ये सहभागी झालेल्या होत्या. त्यांच्यामध्ये काही संघटना व तरुण अन्यायाबाबत तीव्र भाषा व्यक्त करत होते. त्यातील काहींनी भाषणांमध्ये मराठी साहित्यकांची वाक्ये व काही




कविता यांचा संदर्भ दिला. उदाहरणार्थ नामदेव ढसाळ यांचा गोलपीठा नावाचा कवितासंग्रह आहे. या कवितासंग्रहाला मराठी शासनाने सन्मानित केले. राज्य पुरस्कार दिला आणि ढसाळांना पद्मश्री पुरस्कार देऊन त्यांचा सन्मान केला. आता ही शाहू, फुले, आंबेडकरांची परंपरा त्या कवितेत दिसते. आणि त्या कवितेत अन्याय आणि अत्याचाराबद्दलचा तो राग आहे.

ढसाळ त्या कवितेत काय म्हणतात,

**रक्ताने पेटलेल्या अगणित सूर्यानो**
**तुमची आय बहिण**
**आजही विटंबली जाते हाटाहाटातून**
**मवाल्यासारखे माजलेले उन्मत्त निरो**
**आजही मेणबत्तीसारखी जाळतात माणसे**
**चौकाचौकातून**
**कोरभर भाकरी, पसाभर पाणी यांचा**
**अट्टाहास केलाच तर**
**फिरवला जातो नांगर**
**आजही घरादारावरून**
**चिंदकातले हात सळसळलेच तर**
**छाटले जातात**
**आजही नगरानगरातून**
**रक्तात पेटलेल्या अगणित सूर्यांनो,**
**किती दिवस सोसायची ही घोर नाकेबंदी?**
**मरेपर्यंत राहायचे का असंच युद्धकैदी?**
**ती पहा रे ती पहा,**
**मातीची अस्मिता आभाळभर झालीय**
**माझ्या आत्म्याने झिंदाबादची गर्जना केलीय**
**रक्तात पेटलेल्या अगणित सुर्यांनो,**
**आता या शहराशहराला आग लावत चला...**

यातले शेवटचे वाक्य शहराला आग लावत चला. यात कवी ढसाळ यांना नेमके काय म्हणायचे आहे याचा अर्थ समजून



३१ डिसेंबर २०१७ रोजी पुण्याच्या शनिवार वाड्यावर झालेली एल्गार परिषद



**३१ डिसेंबर २०१७ रोजी पुण्याच्या शनिवारवाड्यावर झालेल्या एल्गार परिषदेत जातीची उतरंड दाखवून कबीर कलामंचाच्या कलावंतांनी पथनाट्य सादर केले.**

न घेता एल्गार परिषदेत भाषणे करणारी माणसे जणू काही शहराला आग लावायलाच निघाली आहेत, असे गृहीत धरून त्यांना देशद्रोही, नक्षलवादी ठरविण्याची भूमिका जी सरकारने घेतली आहे ती अत्यंत चुकीची व सामाजिक कार्यकर्त्यांवर प्रचंड अन्याय करणारी आहे.

ढसाळांच्या कवितेचे पुस्तक घरात सापडले म्हणून तुम्ही देशद्रोही आहात, म्हणून तुमच्यावर खटले भरले. असा जो दावा सरकार करते आहे तो अत्यंत चुकीचा व हास्यास्पद आहे.

सुधीर ढवळे हे दलित अधिकारासाठी घरदार सोडून संपूर्ण आयुष्य खर्ची घालणारे लेखक, संपादक, आंबेडकरी साहित्याचे गाढे अभ्यासक व जातीअंताच्या चळवळीचे प्रमुख कार्यकर्ते आहेत. त्यांनी एल्गार परिषदेमध्ये बर्तोल्त ब्रेख्त या जर्मन कवीची पुढील अनुवादित कविता वाचली. म्हणून त्यांना देशद्रोही व नक्षलवादी ठरविण्यात आले आहे. या कवितेमध्ये बर्तोल्त ब्रेख्त उद्विग्न होऊन म्हणतात की, जेथे अन्यायाविरुद्ध कोणी काही बोलत नाही, अशा शहराचा काय फायदा? त्या कवितेचा आधार घेऊन हिंसेला आव्हान दिल्याच्या आरोपाखाली सुधीर ढवळे यांना तुरुंगात डांबून महाराष्ट्राच्या थोर आणि अगाध परंपरेला काळीमा फासण्याचे काम भाजप, संघ परिवार आणि महाराष्ट्र सरकारे संगनमताने केले. ती कविता खालीलप्रमाणे :

**जब जुल्म हो, तो बगावत होनी चाहिए शहर में**
**और अगर बगावत ना हो**
**तो बेहतर है की रात ढलने से पहले**
**ये शहर जलकर राख हो जाये**

३१ डिसेंबर २०१७ रोजी ही एल्गार परिषद पुण्याच्या शनिवारवाड्यावर झाली. सर्वोच्च न्यायालयाचे माजी न्यायमूर्ती पी. बी. सावंत आणि उच्च न्यायालयाचे माजी न्यायमूर्ती बी.






३१ डिसेंबर २०१७ रोजी पुण्याच्या शनिवारवाड्यावर झालेल्या एल्गार परिषदेत जातीची उतरंड दाखवून ती फोडताना, जिग्नेश मेवानी, प्रकाश आंबेडकर व इतर

जी. कोळसे पाटील यांच्या संकल्पनेतून दलित, बहुजन आणि अल्पसंख्याक वर्गाने ही एल्गार परिषद आयोजित केली होती. कार्यक्रमाच्या एक दिवस आधीच न्यायमूर्ती सावंत यांना हॉस्पिटलमध्ये दाखल करावे लागल्याने त्यांनी वक्ते म्हणून आमंत्रित असलेल्या प्रकाश आंबेडकरांना कार्यक्रमाचे अध्यक्षपद भूषविण्यास सांगितले. या कार्यक्रमाने महाराष्ट्रभर बहुजन ऐक्याची भावना निर्माण झाली. ज्याची परिणती ३ जानेवारी २०१८ च्या  महाराष्ट्र बंदमध्ये पाहायला मिळाली. यात सर्वात जास्त



धोका हा भाजप आणि संघ यांच्या ध्येय व धोरणाला पोहोचत होता. तसेच कोरेगाव-भीमा येथे दलितांवर झालेल्या हल्ल्याचे सूत्रधार मिलिंद एकबोटे व संभाजी भिडे गुरूजी हेच असल्याचे जनतेसमोर स्पष्ट होऊ लागल्यामुळे व यासोबतच भाजप व राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे खरे स्वरूप जनतेसमोर उघड होऊ लागल्याने हा देशद्रोहाचा खटला रचण्यात आला आहे, असा आरोप अटक केलेल्या व्यक्तींकडून करण्यात येत आहे. यातले सत्य नेमके काय आहे ते जनतेसमोर येण्याची आवश्यकता आहे, त्यासाठी या प्रकरणाची व पोलिसांची एसआयटी नेमून चौकशी झाली पाहिजे, अशी मागणी मी केली आहे.

या एल्गार परिषेदत ज्यांनी भाग घेतला व ज्या कार्यकर्त्यांना सरकार आज जाणीवपूर्वक व हेतूतः शहरी नक्षलवादी ठरवून त्रास देत आहे त्या ॲड. सुरेंद्र गडलिंग, सुधीर ढवळे, महेश राऊ, शोभा सेन, रोना विल्सन, वर वरा राव, ॲड. सुधा भारद्वाज, ॲड. अरुण फरेरा, वर्नन गोन्सल्वीस, डॉ. आनंद तेलतुंबडे आणि गौतम  नवलखा या सर्वांची पार्श्वभूमी तपासली तर समाजाच्या विकासासाठी आयुष्यभर काम केलेले ध्येयवादी, निःस्वार्थी व अभ्यासू असे हे लोक आहेत. ते केवळ धर्मांध व जातीयवादी असलेल्या सरकारच्या बाजूने बोलत नाहीत व सत्य परिस्थिती

जनतेला सांगून तिचे वैचारिक प्रबोधन करतात म्हणून त्यांना देशद्रोही ठरविले जात आहे. हे केंद्र सरकारचे वर्तन अत्यंत चुकीचे व लोकांच्या स्वातंत्र्यावर घाला घालणारे आहे.

वरील लोकांपैकी काही जणांना अटक केली आहे तर काहींना अटक करणार आहेत. त्यांच्याबद्दलची ही यादी आणि पार्श्वभूमी आहे. याच्यामध्ये संबंध पुणे पोलिसांची जी कारवाई आहे, ती देशद्रोही आहे, असं समजून ती केली जाते. ती योग्य नाही. तो सत्तेचा सरळसरळ गैरवापर आहे. माझं म्हणणं आहे की याची चौकशी झाली पाहिजे. मी एसआयटीला मागणी केली आहे. कारण, हा पोलिसांचा पूर्णपणाने अधिकारांचा गैरवापर आहे. यासंबंधी कोर्टाने एसआयटीची मान्यता दिली नाही. पण सर्वोच्च न्यायालयातील एक न्यायाधीश न्यायमूर्ती धनंजय चंद्रचूड यांनी आपल्या निकाल पत्रात ही चौकशी करण्याची आवश्यकता आपल्याला दिसते, असे मत स्पष्टपणे व्यक्त केले होते.

अशा एल्गार परिषदा होतात, त्याच्यात टोकाची मते मांडली जातात. एल्गार परिषदेत आम्ही अशी अनेक भाषणे ऐकली आहेत की, ज्याच्यात आम्हा लोकांवर शाब्दिक हल्ले झालेले आहेत. याचा अर्थ त्यांच्या मतांशी सहमत असेल, असे नाही. पण, म्हणून त्यांना देशद्रोही म्हणण्याचा आग्रह धरणार नाही. या पद्धतीने हा सरळसरळ सत्तेचा गैरवापर आहे. आणि तो भाजपचे सरकार करत आहे. त्याची चौकशी झालीच पाहिजे. त्या अधिकाऱ्यांची चौकशी झाली पाहिजे. त्यांची चौकशी करताना जे अधिकारी त्या कालखंडात त्या जागेवर असतील, जे आजही तिथेच असतील तर त्यांना अन्य ठिकाणी टाकावे आणि त्या ठिकाणी दुसऱ्या अधिकाऱ्यांची नियुक्ती करून चौकशी करावी म्हणजे ती निःपक्ष चौकशी होईल. ही फेरचौकशी सरकारने तातडीने करण्याची आवश्यकता आहे.

**प्रश्न – देशाच्या अर्थव्यवस्थेसंबंधी आपले मत काय आहे.**

**शरद पवार–** हे जे मोदी सरकार आहे, या संबंध अर्थव्यवस्थेबाबत अपयशी झालेले आहे. देशातील मोठा वर्ग शेती आणि शेतकरी आर्थिकदृष्ट्या संकटात आहे. कारखानदारीमध्ये आणि उद्योगधंद्यांमध्येही घसरण आहे. आणि नवीन गुंतवणूक त्या ठिकाणी होते, असं दिसत नाही. या विविध क्षेत्रांमध्ये केंद्र सरकारने मोठी भांडवली गुंतवणूक करण्याची आवश्यकता आहे. मध्यंतरी अर्थमंत्र्यांनी भांडवली गुंतवणूक कार्पोरेट क्षेत्रामध्ये केली जाईल, असं जाहीर केले. हे आर्थिक संकट फक्त कार्पोरेट क्षेत्रापुरते मर्यादित नाही. वेगवेगळे क्षेत्र आहेत. शेती असेल, छोटे व्यवसाय असतील, या सगळ्या ठिकाणी आणि इन्फ्रा स्ट्रक्चर, जसे पायाभूत सुविधा असतील,

१ जानेवारी २०१७ रोजी कोरेगाव–भीमा येथे झालेली दंगल.









बांधकाम, घरे, रस्ते, असतील, धरणे असतील, अशा गोष्टींवर मोठ्या प्रमाणात गुंतवणूक करून सामान्य माणसाची क्रयशक्ती वाढवली पाहिजे. म्हणजे तो बाजारात जाऊन त्याने खरेदी केले पाहिजे. आज ते होत नाही. त्यामुळे ती घसरण आणखी होत चाललेली आहे. रिअल इस्टेट त्यामध्ये आली आहे. असं संकट ज्यावेळी येतं, त्यावेळी केंद्र सरकारमधील नेतृत्वाची जबाबदारी आहे, की त्यांनी विविध घटकांशी संवाद करायचा. विविध घटक सोडा, संसदेच्या सदस्यांशीही संवाद नाहीये. या संबंध प्रश्नांची जबाबदारी ज्यांच्यावर आहे, त्या अर्थमंत्र्यांना या संबंध प्रश्नांची जाण कितपत आहे, याचीच शंका आज यायला लागलेली









आहे. रिझर्व बँकेचे माजी गव्हर्नर रघुराम राजन, डॉ. मनमोहन सिंग, अमर्त्य सेन, उर्जित पटेल, अरविंद पानगरीया किंवा अन्य जाणकारांनी, अरविंद सुब्रमन्यम, अभिजीत बॅनर्जी यांनी तीव्र मते व्यक्त केलेली आहेत. याची नोंद घ्यायची की नाही? सरकारची आजची धोरणे आर्थिक परिस्थिती सुधारण्यासाठी अजिबात




अनुकल नाहीत.

**प्रश्न– मोदी, शहांचे बहुसंख्य वादाचे धोरण यशस्वी होईल का.**

**शरद पवार–** त्यांना सरळसरळ देशामध्ये एका विशिष्ठ विचार आणि धर्म, अशा प्रकारची जनभावना निर्माण करून ऐक्यालाच सुरुंग लावण्याचे काम करायचे आहे. ही स्थिती देशाला फार संकटाच्या रस्त्याला नेईल. नेतच आली आहे. उदा. एनआरसीच्या प्रश्नांसंबधीची आंदोलने, बंद पडलेल्या कारखान्यांमुळे कामगार वर्गात निर्माण झालेले नैराश्य. नोटाबंदी, जीएसटीसारखे निर्णय घेऊन आर्थिक कुचंबना झाली आहे. या सगळ्यांचा एकत्रितपणे देशावर विपरित परिणाम होत आहे. देशामध्ये दोनच लोक सगळे निर्णय घेत आहेत. संसदीय लोकशाहीमधील आपल्या सहकाऱ्यांनासुद्धा याच्यामध्ये कितपत विश्वासात घेतले जाते, याबाबत शंका येणारी परिस्थिती आहे.

याची जबाबदारी प्रधानमंत्री आणि गृहमंत्री यांना टाळता येणार नाही.

**प्रश्न– महाराष्ट्रात आपण भाजपला सत्तेपासून दूर ठेवण्यात जे यश मिळविले आहे, त्याचे मुस्लीमांनीही या आघाडीचे स्वागत केले आहे. आता हा प्रयोग आपल्याला राष्ट्रीय पातळीवरही करता येईल का?**

**शरद पवार–** त्याची चर्चा चालू आहे. महाराष्ट्रात जे काही घडलं, त्याची चर्चा चालू आहे, झारखंडमध्ये जे काल सरकार आलं, तिथे मुख्यमंत्री झालेल्या गृहस्थांनी सांगितले की, आम्हाला प्रेरणा महाराष्ट्रातून शरद पवार यांच्याकडून मिळाली. पी. चिदंबरम यांनीही त्यांच्या लेखात याचा उल्लेख केला आहे. ममता बॅनर्जी या आम्हाला नेहमी सांगतात, त्यांनी मला पत्र लिहिले की, तुम्ही यामध्ये पुढाकार घ्या. भाजपसोडून इतर पक्षात याबाबत चर्चा सुरू झालेली आहे. आणि भाजपचे जे मित्रपक्ष म्हणून ओळखले जातात, तेही आता वेगळ्या विचारात आहेत. उदा. शिवसेना बाहेर पडली. अकाली दल असो किंवा नितीशकुमार असो, आज विविध धोरणांवरून वेगळी मते व्यक्त करत आहेत, हे आपल्याला जाणवत आहे. त्यामुळे ती प्रक्रिया सुरू झालेली आहे. महाराष्ट्रात आपण जे काही केले, त्यानुसार देशपातळीवर पावले टाकावीत, अशी भावना दिसत आहे. आम्ही लोकांनी त्या दृष्टीने आणखी काही काम करायला सुरुवात केलेली नाही. पण आम्ही संवाद सुरू केलेला आहे. आम्ही चर्चा करतो. आणि त्या चर्चेतून काही चांगले निघावे, अशी अपेक्षा आहे.

**प्रश्न– या सगळ्या निवडणुकीमध्ये तरुण वर्ग फार मोठ्या प्रमाणात तुमच्या पाठिशी आशेने उभा राहिलेला आहे. त्यांना या नवीन वर्षात आपण काय संदेश देऊ शकतो.**

**शरद पवार–** गेली सहा महिने मी बघतोय की, महाराष्ट्रात हा जो मोदी मोदी म्हणणारा तरुण वर्ग होता, पण, मोदी आणि शहा यांच्याबद्दलची तीव्र नाराजी त्यांच्या मनात निर्माण झालेली आहे. आज तो आम्हा लोकांच्या पाठिशी उभा राहतोय, असं दिसतंय. आमच्याकडून अपेक्षा ठेवून आहे, असं दिसतंय. जाईल त्या ठिकाणी तरुण वर्ग पाठिंबा देतायेत, जमतायेत, याचा अर्थ या तरुणाईची सांघिक शक्ती आता एकत्रित केली पाहिजे, आणि ती राष्ट्र उभारणीच्या कामाला लावली पाहिजे. माझा तरुण पिढीला एकच सांगणे आहे की, तुमची सामूहिक शक्ती ही विद्धवंसाच्या रस्त्याला आपल्या न्यायची नाही. आपल्याला हात उगारण्यासाठी नाही तर उभारण्यासाठी, देश उभारण्यासाठी वापरायचे आहेत. ही तरुण पिढी ते करू शकते आणि आपल्याला त्या रस्त्याने जायचे आहे.

◆

**नागरिकत्व दुरुस्ती कायद्याला विरोध म्हणून कोलकाता येथे नागरिकांनी काढलेला मशाल मोर्चा.**



# शेतकऱ्यांनो, थोडा धीर धरा!

**(पान ४ वरून)** त्यांच्यासाठी काही विशेष योजना आखण्याचा विचार सुरु झाला आहे. ही कर्जमाफी देताना महाआघाडी सरकारने कोणत्याही अटी, शर्ती घातल्या नाहीत. नियम लावले नाहीत. शेतकऱ्यांना अर्ज करायला सांगून रांगेत उभे केले नाही. शेवटी शेतकऱ्याच्या चेहऱ्यावरचा आनंद हेच आमचे सुख आहे असे महाआघाडी सरकार मनापासून मानते. या महाआघाडीचे शिल्पकार आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मा. शरदरावजी पवार हे शेतकऱ्यांचे 'देवदूत' वा 'मसिहा' म्हणूनच ओळखले जातात. त्यांना शेतकऱ्याची नाडी अचूक माहिती आहे. पण पैशाचे नाटक करता येत नाही आणि केंद्र सरकार तर पूर्ण विरोधात असल्यामुळे महाराष्ट्राला मदत करायला अजिबात तयार नाही. मोदी सरकार हे मागील पाच वर्षात देखील महाराष्ट्राच्या विरोधातच राहिले. संकटकाळी




कधीही पूर्ण मदत केंद्राने महाराष्ट्राला दिली नाही. अर्थात केंद्राने कायमच महाराष्ट्राला सावत्रपणाची वागणूक देऊन मोकळ्या मनाने भरभरुन निधी दिलेला नाही. आता तर केंद्राच्या मदतीवर आपल्याला अजिबात अवलंबून राहता येणार नाही. मोदी-शहा ही जोडगोळी महाराष्ट्राला कायम त्रास देण्याचाच प्रयत्न करणार. या पार्श्वभूमीवर महाआघाडीतल्या सर्व घटकांना कायम एकदिलाने व संघटितपणे राहून काम करावे लागेल. जनतेचे दुःख मोठे आहे. ते सोडविण्यासाठी लागणारी रक्कमही मोठीच आहे पण तिजोरीत खडखडाट आणि कर्जाचा बोजा फडणवीस सरकारने करुन ठेवला आहे. त्यातूनही आपण मार्ग काढू. फक्त तुम्ही थोडा संयम व धीर ठेवा.

◆

# अभिनंदन ! उद्धवजींच्या सरकारचे

**(पान ५ वरून)** माजी केंद्रीय अर्थमंत्री व देशातील नामवंत कायदेतज्ज्ञ पी. चिदंबरम यांनी त्यांच्या 'इंडियन एक्सप्रेस' मधील लेखातही याचा आवर्जून उल्लेख केला आहे. पवार साहेबांनी आता सर्व विरोधी पक्षांची मोट बांधून देशात नवीन राजकारण सुरु करावे अशी जनतेची देखील अपेक्षा आहे. या कामासाठीही पवार साहेबांनी पुढाकार घ्यावा अशी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या सर्व कार्यकर्त्यांच्या वतीने मी विनंती करतो. सत्तेची सूत्रे हाती घेतल्याबरोबर मंत्रीमंडळाने शेतकऱ्यांना दिलासा देण्याच्या दृष्टीने दोन लाखापर्यंतचे कर्ज सरसकट माफ केले आहे. ते करताना कोणत्याही अटी, नियम, निकष लावलेले नाहीत याबद्दलही सरकारचे मी अभिनंदन करतो. कोणतीही एखादी गोष्ट चांगली केली, की आपण त्याचे अभिनंदन करतो. अभिनंदन करायला मन मोठे लागते. ज्याचे अभिनंदन करायचे, तो आवडावा लागतो. आवडत्या गोष्टीला उभारी देण्याचे उद्‌गार म्हणजे अभिनंदन ! जे आपल्याला जमले नाही, ते त्याने करुन दाखविले म्हणून उत्स्फुर्त उद्‌गार जो बाहेर पडतो, ते 'अभिनंदन' हाच असतो. काही वेळा आपण मनापासून अभिनंदन करतो, तर काही वेळा आता तोंडावर तोंड पडतेच आहे, उपचार म्हणून करुन टाका एकदाचे अभिनंदन ! तर, केव्हा 'ठीक' आहे, तुझे कर्तृत्व मी ध्यानात घेतले आहे; पुढच्या निवडणुकीच्या वेळी पाहून घेईन, अशा दराऱ्यातूनही कधी हातात हात दाबून राजकीय पुढारी अभिनंदन करतात. बोलण्याचा रोख आणि हात दाबण्याचा प्रकार यावरुन अभिनंदनातला खरा-खोटेपणा लगेच लक्षात येतो. अभिनंदन आवडले की नावडले, हा प्रश्न गौण असतो. पण शुद्ध अंतःकरणापासून व खुल्या दिलाने केलेल्या अभिनंदनात मनामनाचा खुला संवाद असतो. कर्तृत्त्वाला नेमकी मनापासून दाद देण्याची मानसिक तयारी अभिनंदनात सामावलेली असते. अभिनंदनाने मनाची उदारता वाढते. आपापसातला स्नेह घट्ट होतो. जगण्यातल्या नवनवीन गोष्टी सहज जवळ करता येतात. संवादातला भाव उपदेशात येतो. ही भाग्याची गोष्ट लाभायचे सामर्थ्य अभिनंदनात असते. महाराष्ट्रात नव्याने स्थापन झालेल्या महाआघाडी सरकारपुढेही अनंत समस्या आहेत. मुख्य अडचण आर्थिक आहे. देशभर मंदीची मोठी लाट आहे. केंद्रातले मोदी सरकार आर्थिक प्रश्नावर पूर्णपणे अपयशी ठरलेले आहे. ते महाराष्ट्र द्वेषी आहे. त्यामुळे आपल्या ताकदीवरच आपल्याला प्रश्न सोडवावे लागणार आहेत.

◆

Best Compliments



# श्रध्दांजली

## देवीप्रसाद त्रिपाठी 'डीपीटी'

**अचूक, नेमकी आणि आकर्षक व चुरचुरीत–खमंग शब्दरचना, मोजक्याच शब्दांचा वापर आणि पक्षाची भूमिका थेट लोकांपर्यंत पोहोचविण्याचे कसब डी. पी. त्रिपाठी यांना आत्मसात होते. माध्यमांना लांबण लावणारे प्रवक्ते फारसे आवडत नाहीत. मोजक्या, मर्यादित शब्दात अधिकाधिक अर्थपूर्ण अशी पक्षाची भूमिका मांडणारे किंवा एखाद्या मुद्यावर प्रतिक्रिया देणारे प्रवक्ते सर्वात माध्यमप्रिय असतात. डी. पी. त्रिपाठी त्याच श्रेणीत समाविष्ट होते.**

देवीप्रसाद त्रिपाठी हे त्यांचे पूर्ण नाव! डी.पी.त्रिपाठी म्हणून ते सर्वसाधारणपणे ओळखले जात. मित्रांमध्ये त्यांचे नाव 'डीपीटी' असे!

राष्ट्रवादी काँग्रेसचे सरचिटणीस आणि प्रवक्ते असलेले 'डीपीटी' दिल्लीच्या माध्यम वर्तुळातले एक पत्रकार-प्रिय प्रवक्ते होते. एकेकाळी विठ्ठलराव गाडगीळ, जयपाल रेड्डी यांनी त्यांच्या पक्षांचे प्रवक्ते म्हणून आपले विशिष्ट्यपूर्ण स्थान निर्माण केले होते. त्याच मालिकेत त्रिपाठी यांचाही समावेश होतो. अचूक, नेमकी आणि आकर्षक व चुरचुरीत-खमंग शब्दरचना, मोजक्याच शब्दांचा वापर आणि पक्षाची भूमिका थेट लोकांपर्यंत पोहोचविण्याचे कसब त्यांना आत्मसात होते. माध्यमांना लांबण लावणारे प्रवक्ते फारसे आवडत नाहीत. मोजक्या, मर्यादित शब्दात अधिकाधिक अर्थपूर्ण अशी पक्षाची भूमिका मांडणारे किंवा एखाद्या मुद्यावर प्रतिक्रिया देणारे प्रवक्ते सर्वात माध्यमप्रिय असतात. त्रिपाठी त्याच श्रेणीत समाविष्ट होते.

राष्ट्रवादी काँग्रेस हा पक्ष प्रामुख्याने महाराष्ट्र केंद्रित असला तरी या पक्षाच्या नेतृत्वाला राष्ट्रीय पातळीवर गांभीर्याने घेतले जाते. पक्षाची ही प्रतिमा निर्माण होण्यात पक्षाध्यक्ष शरद पवार यांची प्रमुख भूमिका आहेच परंतु विविध विषय व मुद्यांवर पक्षाची भूमिका चतुराईने मांडली जाणे व त्याची दखल राष्ट्रीय पातळीवरही घेतली जाणे याचे एक वेगळे महत्व असते आणि या दोन पक्षांच्या संबंधा संदर्भात पत्रकारांकडून त्यांना नेहमीच प्रश्न विचारले जात आणि कधीकधी त्याचे रुपांतर सरबत्तीत देखील होत असे. पण त्रिपाठी कधीही त्यामुळे विचलित होत नसत. उलट हसून आणि एखादी कोटि किंवा विनोद करुन त्या पत्रकाराच्या प्रश्नातील डंख किंवा हवा काढून घेत असत. काही पक्षांच्या प्रवक्त्यांना पत्रकारांच्या एखाद्या अडचणीत आणणाऱ्या किंवा आक्रमकपणे, तिरकसपणे विचारल्या गेलेल्या प्रश्नावर लगेच संतप्त होण्याची सवय असते. पण त्रिपाठी यांनी कधीही त्यांचा संयम व शांतपणा सोडला नाही आणि तेच त्यांच्या कार्यक्षमतेचे मुख्य लक्षण होते.

राष्ट्रवादी काँग्रेस आणि काँग्रेस या दोन्ही पक्षांचा पिंड एकच आहे. त्यामुळे अनेकवेळेस पत्रकार दोन्ही पक्षांच्या विलीनीकरणाबाबत नेहमी प्रश्न विचारुन त्रिपाठी यांना सतावत असत. पण त्रिपाठी यांचे उत्तर तयार असायचे................ 'एनसीपी वुइल नॉट मर्ज बट इमर्ज'! लगेचच त्याचे हिंदीत रुपांतर करताना ते म्हणत, 'हमारी लय रहेगी विलय नही होगा!' या एका उदाहरणावरुन त्रिपाठी यांची शब्द व भाषा यावरील हुकमत लक्षात यावी, हिंदी व इंग्रजी भाषेतून ते सहजपणे पत्रकारांच्या प्रश्नांना उत्तरे देत असत. त्यामध्ये शाब्दिक-भाषिक चतुराई देखील असे आणि त्यामुळेच त्यांच्या पत्रकार परिषदेच्या बातम्या सर्वत्र प्रसिध्द होत असत.



त्रिपाठी यांनी राष्ट्रवादी काँग्रेसच्या माध्यमातून ती कामगिरी चोख बजावली. राष्ट्रवादी काँग्रेस आणि काँग्रेस या दोन पक्षांमध्ये महाराष्ट्रात आघाडी असल्याने तसेच केंद्रात स्थापन युपीए सरकारमध्येही राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष सामील असल्याने

त्रिपाठी यांचे भाषा प्रभुत्व केवळ हिंदी किंवा इंग्रजीपुरते मर्यादित नव्हते. ते बहुभाषिक होते. हिंदी, इंग्रजी प्रमाणेच ते ओडिया, बंगाली, असमिया, उर्दू या भाषा लीलया बोलत आणि त्या भाषेत जाहीर सभाही करीत. नेपाळी भाषा व संस्कृति

तसेच नेपाळचे राजकारण यांच्याशी त्यांची निकटता वैशिष्ट्यपूर्ण होती. नेपाळमधील डाव्या व लोकशाहीवादी चळवळीला त्यांचे समर्थन असे. नेपाळी काँग्रेस किंवा नेपाळमधील कम्युनिस्ट पक्षाचे नेते यांच्याशी त्यांची केवळ निकटची मैत्रीच नव्हती तर एका अर्थाने ते त्यांचे मार्गदर्शक होते. नेपाळचे प्रसिध्द कम्युनिस्ट नेते आणि ज्यांनी अनेक वर्षे नेपाळमध्ये लोकनियुक्त शासनासाठी प्रसंगी भूमिगत राहून लढे दिले ते पुष्पकमल दहल उर्फ प्रचंड, बाबूराम भट्टाराय ही सर्व मंडळी त्यांच्या नियमित संपर्कात असत. त्यांच्याकडे विविध मुद्यांवर सल्लामसलतीसाठी येत असत. त्यामुळेच नेपाळमधील राजेशाहीची अखेर होऊन तेथे लोकनियुक्त लोकशाहीची स्थापना झाल्यानंतर त्रिपाठी यांना नेपाळी संसदेच्या उद्‍घाटनपर अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी पटलावर आमंत्रित करुन विशेष सन्मानाने गौरवान्वित करण्यात आले होते. त्यांना मिळालेल्या या सन्मानाने ते भारावून गेले होते व नेहमी त्याचा उल्लेख करीत असत. नेपाळमध्ये राजेशाही जाऊन लोकशाहीची स्थापना करण्यातील त्यांची भूमिका नेपाळी साम्यवादी व लोकशाही नेत्यांच्या व नेपाळी लोकांच्या देखील कायम स्मरणात राहणारी होती.

त्रिपाठी यांचा जन्म उत्तर प्रदेशातील सुलतानपूर जिल्ह्यात झाला होता. सुरुवातीच्या शिक्षणानंतर ते दिल्लीच्या जवाहरलाल नेहरू विद्यापीठात शिक्षणासाठी दाखल झाले आणि तेथे त्यांची सक्रिय राजकीय कारकिर्द सुरु झाली. साधारणपणे 1970च्या दशकाच्या प्रारंभी ते या विद्यापीठात दाखल झाले. 1972-73 पासून देशातील विद्यार्थ्यांमध्ये वेगवेगळ्या कारणांवरुन असंतोष सुरु झालेला होता. भ्रष्टाचार व भ्रष्ट राजकीय नेते यांच्या विरोधात विद्यार्थी आंदोलने करीत होते.

जवाहरलाल नेहरू विद्यापीठ किंवा 'जेएनयू' हा सुरुवातीपासून डाव्या, पुरोगामी चळवळींचा स्रोत आणि अड्डा होता. विद्यार्थी चळवळीचे ते एक प्रमुख केंद्र होते. त्रिपाठी हे मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष प्रणित विद्यार्थी संघटना 'एसएफआय' (स्टुडंट्स फेडरेशन ऑफ इंडिया) मध्ये सामील झाले नाहीत परंतु ते त्यांच्या सन्निध्यात राहिले होते. याच काळात ते स्वतंत्रपणे उभे राहून तेथील विद्यार्थी संघटनेचे अध्यक्षही झाले. मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे दोन नेते प्रकाश कारत आणि सीताराम येचुरी हे दोघेही येथील संघटनेचे अध्यक्ष झालेले होते. पण या पाठोपाठच देशात आणीबाणी लागू झाली.

त्रिपाठी हे नितांत लोकशाहीवादी होते. लोकशाहीवरील या आघाताच्या विरोधात ते उभे राहिले. विद्यार्थ्यांनी त्यांच्या नेतृत्वाखाली आणीबाणी लादण्यास विरोध केला होता. त्यामुळे पोलिस त्रिपाठी यांना पकडण्यासाठी विद्यापीठात दाखल झाले. त्यांनी विद्यार्थ्यांच्या होस्टेलमधील प्रत्येक खोली तपासली पण त्रिपाठी केव्हाच अदृष्य झाले होते. त्यानंतर ते मंडी हाऊस जवळच्या धोब्यांच्या वसाहतीत जाऊन राहिले. हे धोबी मुख्यतः सुलतानपूर जिल्ह्यातले होते आणि त्यामुळे त्रिपाठी त्यांच्या सतत संपर्कात असत व त्यांची त्यांच्याशी मैत्रीही होती. त्यामुळे त्या वसाहतीत राहून त्यांनी भूमिगत रीतीने आणीबाणीच्या विरोधात काम करण्यास सुरुवात केली. याच काळात संजय गांधी यांच्या पत्नी मनेका गांधी या विद्यापीठात वर्गात उपस्थित झाल्या होत्या. त्या तेथे काही विषय शिकण्यासाठी येत. त्रिपाठी अचानक तेथे अवतीर्ण झाले आणि त्यांनी मनेका गांधी यांना आणीबाणीच्या



संरक्षणमंत्री राजनाथ सिंग यांनी दिल्लीतील त्रिपाठी यांच्या निवासस्थानी जाऊन अंत्यदर्शन घेतले.





विरोधात त्यांची मते ऐकवली आणि त्या विरोधात सुरु झालेले विद्यार्थी आंदोलन कसे योग्य आहे हे समजावण्याचा प्रयत्न केला. यामुळे मनेका गांधी संतापल्या होत्या पण त्यांनी काही हालचाल करण्यापूर्वी त्रिपाठी पुन्हा तेथून गायब झाले. अखेर 1975च्या नोव्हेंबर महिन्यात त्यांना अटक करण्यात पोलिसांना यश मिळाले.

आणीबाणीत त्रिपाठी यांना अटक करुन तिहार तुरुंगात हलविण्यात आले. तेथे अरुण जेटली वगैरे तरुण नेते आधीच अटकेत होते. त्यांनी त्रिपाठी यांचे स्वागत करताना, 'या आम्ही तुमची वाटच पहात होतो' असे म्हटल्याची आठवण ते नेहमी सांगत. या तुरुंगवासातच त्यांची भाजपसह अनेक विरोधी पक्षांच्या नेत्यांशी ओळख झाली व त्यांच्या संपर्कात ते आले. त्यातूनच त्यांचे मित्रवर्तुळ विस्तारत गेले ते कायमस्वरुपी! आणीबाणीच्या तुरुंगवासाने त्रिपाठी यांची लोकशाहीवरील श्रध्दा आणि बांधिलकी आणखी घट्ट व पक्की झाली. त्याच प्रेरणेने त्यांनी नेपाळमधील माओवादी-कम्युनिस्ट नेत्यांना लोकशाहीसाठी लढण्याचा आग्रह केला. भूमिगत नेत्यांनी शस्त्रे टाकून निवडणुकीचा मार्ग स्वीकारला आणि अनुसरला व आज नेपाळमध्ये लोकशाही स्थिरावताना आढळते त्यात त्रिपाठी यांच्यासारख्या लोकशाहीशी बांधिलकी मानणाऱ्या नेत्यांची कामगिरी व योगदान बहुमोल आहे. भारतातल्या कम्युनिस्ट नेत्यांची नेपाळी माओवादी नेत्यांशी ओळख व परिचय करुन देण्यात त्रिपाठी यांनी विशेष पुढाकार घेतला होता.

त्रिपाठी यांचा संपर्क आणि मित्रांचे व संबंधांचे वर्तुळ अत्यंत व्यापक व विशाल होते. त्यामध्ये सर्व विचाराच्या आणि अगदी परस्परविरोधी विचाराच्या लोकांचा देखील समावेश होता. मार्क्सवादी नेत्यांप्रमाणेच भाजपचे अरुण जेटली यांच्यासारख्यांशी देखील त्यांची तेवढी समान मैत्री होती. त्यामुळेच ज्या इंदिरा गांधी यांना त्यांनी आणीबाणीत विरोध केला त्यांचे चिरंजीव राजीव गांधी यांचे ते अत्यंत निकटचे मित्र व सल्लागारही तेवढ्याच सहजतेने झाले. परंतु राजीव गांधी यांच्यानंतर काँग्रेसची धुरा सोनिया गांधी यांच्याकडे गेल्यानंतर त्यांचा काँग्रेसशी दुरावा निर्माण झाला. त्यानंतर त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश केला आणि अखेरपर्यंत या पक्षाबरोबर राहिले. या पक्षातर्फे ते राज्यसभेवरही निवडून गेले होते. राज्यसभेतही त्यांनी त्यांच्या भाषणांची छाप पाडली होती. त्रिपाठी यांची कुशाग्र बुध्दीमत्ता लक्षात घेऊनच त्यांना राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांनी राज्यसभेत संधी दिली होती आणि त्यांनीही त्या संधीचे सोने केले.

त्रिपाठी यांच्यावर मार्क्सवादी व समाजवादी विचारांचा प्रभाव होता. डाव्या व पुरोगामी आणि प्रगतीशील शक्तींच्या एकजुटीसाठी ते नेहमी प्रयत्नशील राहिले. प्रकाश कारत आणि सीताराम येचुरी यांच्याशी त्यांची घनिष्ठ मैत्री त्याचेच प्रमाण होती. कारत हे एकलकोंडे राजकारणी मानले जातात पण त्रिपाठी यांच्याशी त्यांची निकटची मैत्री होती व प्रसंगी ते सल्लामसलत देखील करीत असत. त्रिपाठी यांच्या चतुरस्त्र व अष्टपैलू व्यक्तिमत्वातील राजकारण हा एक भाग होता. ते अलाहाबाद विद्यापीठात प्राध्यापक होते. अध्यापनाचे काम त्यांनी अनेक वर्षे केले. त्यामुळे विद्यार्थीवर्गात देखील त्यांचा व्यापक चाहता वर्ग होता. राजकारणात त्यांचा सर्वव्यापी संचार असे. एवढेच नव्हे तर साहित्यिक वर्तुळातही त्यांचे विशेष वजन होते.


एकाच माणसाला एवढ्या गोष्टी कशा शक्य होऊ शकतात हा प्रश्न त्यांच्यासंदर्भात नेहमी पडत असे. त्रिपाठी यांना डोळ्यांनी कमी दिसत असे. परंतु त्यावर त्यांच्या तल्लक स्मरणशक्तीने मात केलेली होती. त्यांना स्मरणशक्तीची विलक्षण आश्चर्यकारक देणगी होती. असंख्य मित्रांचे मोबाईल नंबर त्यांना पाठ असत आणि ते त्यांच्या सहाय्यकाला भराभर ते नंबर लावून द्यायला सांगत असत. मित्रांना आवाजावरुन ओळखत असत. काहीवेळेस आम्ही काही मित्र त्यांची मजा करण्यासाठी नाव न सांगताच बोलायला सुरुवात करीत असू. पण नुसत्या

आवाजावरुन ओळखून पुढच्या क्षणी आमच्या नावाचा उच्चार करुन ते संभाषणाला सुरुवात करुन आम्हाला चीत करत असत. नजरेची क्षमता नसताना देखील या माणसाचे इतके अफाट वाचन कसे होते? एखाद्या विषयावर ते घडाघडा अनेक संदर्भ देत असत. ती माहिती त्यांनी कधी आणि कशी आणि कुठे वाचली असेल असे आश्चर्य आमच्यासारख्यांनी नेहमीच वाटत आले होते. संस्कृत भाषेवरही त्यांचे प्रभुत्व होते आणि भाजपच्या अनेक नेत्यांना ते हिंदू पुराण, वेद, उपनिषदे यांतील संदर्भ देऊन अक्षरशः चूप करीत असत. त्यांचा लोकसंग्रह एवढा अफाट होताच पण एखाद्या सामान्यातल्या सामान्य माणसासाठी एखाद्या बड्या नेत्याला फोन करण्यासही ते मागेपुढे पहात नसत. विशेष म्हणजे त्यांची नोकरशाही, राजनैतिक वर्तुळ, राजकारण, सामाजिक क्षेत्र, यातील ऊठबस मोठी होती. त्यामुळे कोणाला कोणते काम सांगितल्यास ते होऊ शकते याचा अचूक अंदाज त्यांना असे आणि त्यामुळेच ते अनेकांची कामे करीत असत.

त्रिपाठी यांच्या व्यक्तिमत्वातील एक महत्वाचा पैलू म्हणजे मित्रांबरोबर मनसोक्त गप्पा मारणे. या गप्पांबरोबर अर्थातच यथासांग व साग्रसंगीत भोजन हमखास असे. मधूनमधून ते त्यांच्या मित्रांसाठी इंडिया इंटरनॅशनल सेंटर येथे मेजवान्या करीत असत. त्या मेजवान्यांना जाणे हा एक वेगळा अनुभव व आनंद असे कारण त्या एका मेजवानीच्या प्रसंगी विविध क्षेत्रातील मान्यवर व नामवंतांना भेटण्याची ती पर्वणी असे. त्यांच्या काही मेजवान्यांना न गेल्याने ते काहीसे नाराज होऊन, 'तुम तो आते ही नही हो' म्हणत. परंतु जेव्हा जेव्हा उपस्थित राहण्याचा प्रसंग येई तेव्हा त्यांच्या जवळ जाऊन आल्याचे सांगता क्षणी ते मनापासून हस्तांदोलन करुन, 'तुम आये, अच्छा लगा' म्हणून स्वागत करीत. या मेजवान्या म्हणजे केवळ खाणेपिणे नसे. तेथे त्रिपाठींचा दरबार असे. तेथे अनुभव, नवनवे वाचन, नवनवी पुस्तके, ताज्या घडामोडी यावर मुक्त चर्चा होत असे आणि खाण्यापिण्याबरोबरच मुक्त चिंतनाचा विलक्षण आनंदही मिळत असे. त्रिपाठी 'थिंक इंडिया' नावाचे त्रैमासिक चालवायचे. त्यात वैचारिक मेजवानी असे. त्याचे अंक ते आवर्जुन पाठवत असत.

महाराष्ट्रातून राज्यसभेवर आल्यानंतर त्यांना, 'आता मराठीपण शिकणार काय' असे विचारल्यावर त्यांनी होय असे उत्तर दिले आणि त्या कामाला ते लागले. त्रिपाठी यांना दुर्धर आजाराने ग्रासले होते. त्यांनी स्वतःच्या प्रकृतीची कधी तमा बाळगली नाही. काहीसा कलंदर असा हा माणूस होता. त्यांच्या विद्वत्तेमुळे त्यांच्या संगतीचा आनंद द्विगुणित होत असे. त्यांच्याशी मधूनमधून गप्पा मारण्याचा कार्यक्रम झाल्यानंतर समृध्द झाल्यासारखे वाटत असे. अशी माणसे विरळ असतात आणि सहजपणे भेटत नसतात. एकाच व्यक्तीच्या अंगी किती विविधता असू शकते याचे जिवंत उदाहरण 'डीपीटी' हे होते. त्रिपाठी यांचा मृत्यु अकालीच आहे. पण हे मस्त कलंदर व हरफन मौला व्यक्तिमत्व सर्वसाधारण मापदंड आणि फूटपट्टीच्या आवाक्यातले नव्हते. त्यामुळेच त्यांचा अकाली मृत्यु सलणारा आहे. त्यांची कमी सतत राहणार आहे!

◆





## लोकशाही विचारांचे खंदे पुरस्कर्ते पवारांची 'डीपीटीं'ना श्रद्धांजली

**देश आणि आंतरराष्ट्रीय राजकारणाचा डी. पी. त्रिपाठी यांचा गाढा अभ्यास होता. ते आमच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे सरचिटणीस व प्रवक्ते होते. चपखल, मोजक्या व नेमक्या शब्दात विषय मांडण्याची त्यांची हातोटी होती. नवी दिल्लीतील जवाहरलाल नेहरू विद्यापीठातून राजकारणाचे धडे घेतलेल्या त्रिपाठी यांनी राज्यसभेत अभ्यासपूर्ण भाषणे करून वेगळी चुणूक दाखविली. लोकशाही विचारांचे ते खंदे पुरस्कर्ते होते. आणीबाणीत काही काळ त्यांनी तुरुंगवासही भोगला होता. राजीव गांधी पंतप्रधान झाल्यानंतर त्रिपाठी यांनी त्यांचे राजकीय सल्लागार म्हणूनही काम केले. नेपाळमध्ये लोकशाही राज्य आणण्यासाठी त्यांनी तिथल्या सहकाऱ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले. त्यांच्या जाण्याने माझे व्यक्तीशः व माझ्या पक्षाचे मोठे नुकसान झाले आहे.'' या शब्दात शरद पवार यांनी कै. त्रिपाठी यांना श्रद्धांजली वाहिली आहे.**


Nanded City, Pune
Sinhagad Road, Pune
प्रत्येक घराला एक मन असतं.
प्रत्येक शहराला एक व्यक्तिमत्त्व असतं.
आनंदी संकुल
CBSE व ICSE शाळा
• CBSE व ICSE
Call: 020-67275800 / 1 / 2
www.nandedcitypune.com
info@nandedcitypune.com
MAGARPATTA CITY


**नागरिकत्व दुरुस्ती कायद्याने सध्याच्या राज्यकर्त्यांचे खरे रंग जनतेसमोर उघडे झाले आहेत. त्यातून निर्माण झालेल्या असंतोषाला तोंड देताना या राज्यकर्त्यांना दमछाक होणार आहे हे स्पष्ट होत आहे. उत्तर प्रदेशात या सरकारने पोलिसांच्या बळाचा जबरी वापर करुन आंदोलनाला हिंसक वळण देण्याचा प्रयत्न केला परंतु तो देखील फारसा यशस्वी झाला नाही आणि त्यातही सरकारचे मनसुबे उघडकीस आले व सरकारची बदनामीच अधिक झाली. परंतु बळाच्या जोरावर आंदोलन मोडून काढण्याची सरकारची तयारी यानिमित्ताने स्पष्ट झाली. त्यामुळेच आता दिल्लीसह ठिकठिकाणी आंदोलनांनी वेगळे स्वरुप धारण केले आहे.**



# अराजक आणि एकाधिकारशाहीकडे

**आकाश**, नवी दिल्ली




कालचक्र सुसंगत आणि सातत्यशील असते. वर्ष -२०१९ आता इतिहासजमा झाले असले तरी त्या वर्षाच्या पार्श्वभूमीवर आणि त्या वर्षाच्या छायेतच वर्ष -२०२०चे आगमन झाले आहे. म्हणूनच २०१९मधील घटनांचा प्रभाव २०२०वर देखील राहणार आहे. २०१९च्या पहिल्या सहामाहीत लोकसभेच्या निवडणुका पार पडल्या. नरेंद्र मोदी यांना निर्विवाद आणि निर्णायक बहुमत मिळाले. भाजपची एकहाती सत्ता निर्माण करण्यात मोदींना यश मिळाले. भाजप आणि संघ-परिवाराचा हिंदुत्वाचा अजेंडा अमलात आणण्याचा पाया या सरकारच्या सत्तारूढ होण्याने घालण्यात आला असे म्हटल्यास वावगे होणार नाही. बहुसंख्यक वर्चस्व प्रस्थापित करण्याच्या दिशेने या सरकारने वाटचाल सुरु करुन त्यानुसार निर्णय करण्यास सुरुवात केली. हे











निरीक्षण आहे व ते वस्तुनिष्ठ अशासाठी की सरकारने त्यांच्या कृतीने ते सिध्द केले आहे. मुळात 'मोदी-०२' सरकार सत्तेत येण्यासाठी काही विशिष्ट घटक कारणीभूत ठरले. या घटकांमध्ये पुलवामा येथे सीआरपीएफ जवानांवर हल्ला करुन त्यांची हत्या करण्याचा प्रकार व त्याच्या प्रत्युत्तरादाखल बालाकोट परिसरात करण्यात आलेले हल्ले यांची प्रमुख भूमिका होती. या घटनेचा निवडणुकीत मते पदरात पाडून घेण्यासाठी वापर करण्यात आला. एकीकडे हा हल्ला पाकिस्तानी दहशतवाद्यांनी केल्याच्या प्रचाराबरोबर त्यामध्ये या देशातील अल्पसंख्यक व विशेषतः मुस्लिमांविरुध्द पध्दतशीर वातावरणनिर्मिती करण्यात आली. त्याच्याच जोडीला बहुसंख्यक हिंदू व हिंदुत्व आणि राष्ट्रवाद यांचाही जोरदार पुरस्कार करण्यात आला. यातून २०१९ची निवडणूक जिंकण्यात मोदी-शहा जोडगोळीला यश मिळाले. यामध्ये वाढती बेकारी, नोकऱ्या, उद्योगांमधील घसरण, शेतीची खालावलेली स्थिती हे प्रमुख प्रश्न मागे पडले. केवळ भावनाप्रधान मुद्यांवर ही निवडणूक लढविण्यात आली व जिंकण्यात आली.

लोकसभा निवडणुकीच्या वेळी देशाची आर्थिक स्थिती काय होती ? फार आकडेवारीत जाण्याची आवश्यकता नाही. त्यावेळी सरकारच्याच संख्याशास्त्र विभागाने दिलेल्या आकडेवारीनुसार पंचेचाळीस वर्षातील सर्वात नीचांकी बेकारी या सरकारच्या पाच वर्षाच्या काळात नोंदली गेली होती. परंतु ही राजवट व या राजवटीचे नेते एवढे लज्जाहीन आणि विधिनिषेधशून्य

आहेत की त्यांनी त्या संख्याशास्त्र विभागाला खोटे ठरविले. हा खोटेपणाचा आरोप साधार आणि खरा अशासाठी आहे की निवडणूक पार पडल्यानंतर आणि भाजपला निर्विवाद बहुमत मिळाल्यानंतर हीच आकडेवारी गुपचूपपणे अधिकृत म्हणून सार्वजनिक करण्यात आली. म्हणजेच निवडणुकीत आणि आपल्या यशात या आकडेवारीने बाधा येऊ नये यासाठी भाजपने आणि त्यांच्या नेतृत्वाने योजनापूर्वक ही आकडेवारी










निवडणुकीपूर्वी खोटी ठरवली होती. या एका उदाहरणाने भाजपने आणि त्यांच्या नेतृत्वाने निवडणूक आणि तिचे निकाल कसे नियोजनपूर्वक आपल्या बाजुने लागतील याची खबरदारी घेतली हे सिध्द होते.


२०१९च्या निवडणुकातले निर्विवाद यश, त्यानंतर लगेचच जम्मू-काश्मीरचे दोन तुकडे आणि कलम ३७० व ३५(अ) रद्द करण्याची शस्त्रक्रिया, अयोध्येत राम मंदिर उभारणीसाठी परवानगी देणारा आणि भाजप-संघ परिवाराला हवाहवासा वाटणारा सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय आणि नुकता संमत करण्यात आलेला नागरिकत्व दुरुस्ती कायदा! डिसेंबर-२०१९ अखेर भाजपच्या दृष्टीने विलक्षण सुखावह असा हा काळ ठरावा कारण याच काळात बहुसंख्यकवादाची मुहुर्तमेढ रोवणारे हे निर्णय यशस्वीपणे झाले. पण नागरिकत्व दुरुस्ती कायद्याच्या विरोधात अनपेक्षितपणे असंतोषाची एक मोठी लाटच तयार झाली आणि ती भाजपवर चाल करुन जातानाचे चित्र पाहण्यास मिळते. पाहता पाहता २०१९ मधील सुखाचे रुपांतर २०२० या नवीन वर्षाची सुरुवात होताहोता चिंता आणि त्रासात होऊ लागले. विशेष म्हणजे हा असंतोष सामान्यांच्या पातळीवर होता. त्याचे नेतृत्व कुणी मोठा नेता करीत नव्हता आणि विद्यार्थ्यांनी याचे नेतृत्व केले. त्यामुळेच भाजपचे नेतृत्व काहीसे धास्तावून गेले आणि त्यांनी या आंदोलनाला बदनाम करण्यासाठी ते विरोधी पक्षांच्या चिथावणीने सुरु झाल्याचे, त्यात शहरी

नक्षलवादी असल्याचे, देशाचे तुकडे करु पाहणाऱ्या 'तुकडे तुकडे गँग'चे असल्याचे आरोप त्यांनी सुरु केले. परंतु त्या आरोपांची दखलही कुणी घेतली नाही. आंदोलन चालू राहिले आणि त्याची व्याप्ती वाढत गेली.

आसाममध्ये भाजपचे सरकार आहे तेथेच सर्वप्रथम या कायद्याला सुरुंग लागला. ती भाजपची आणखी एक डोकेदुखी ठरत आहे. त्यामुळेच हा पसरत चाललेला असंतोष आटोक्यात आणायचा कसा याच्या चिंतेत भाजप नेतृत्व पडले आहे. या असंतोषाचा प्रतिकार करण्यासाठी भाजपने प्रतिमोहिम सुरु करण्याचे ठरविले आहे. त्यानुसार पक्षाध्यक्ष आणि गृहमंत्री अमित शहा यांनी राजस्थानातील जोधपूर येथे पहिली जाहीर सभा घेतली आणि अत्यंत आक्रमकपणे त्यांनी काँग्रेसवर व राहूल गांधी यांच्यावर तोंडसुख घेतले. मुळात राजस्थानात या कायद्याच्या विरोधात फार मोठा असंतोष किंवा आंदोलन झालेले नाही. त्यामुळे आधुनिक चाणक्य मानल्या जाणाऱ्या अमितभाईंनी जोधपूरची निवड का केली हा एक प्रश्नच आहे. परंतु राजस्थानात पाकिस्तानातून कथित धार्मिक छळामुळे आलेल्या एका कुटुंबाला ते भेटले. त्याचा फार मोठा गवगवा करण्याचा प्रयत्न भाजपने केला पण त्यास फारशी प्रसिध्दी मिळू शकली नाही. दिल्लीत कार्यकारी अध्यक्ष जगतप्रकाश नड्डा यांनी अफगाणिस्तानातून म्हणे भारतात आलेल्या २५ निर्वासितांची भेट घेतली. हे सर्व निर्वासित गेली पंचवीस वर्षे दिल्लीत राहतात. ते उद्योग व्यवसाय करीत आहेत आणि चांगले स्थिरस्थावर झालेले आहेत व सुस्थितीत आहेत. भाजपचा हा प्रचारही फोल गेला.

दुसरीकडे अमित शहांनी संसदेत या नागरिकत्व दुरुस्ती विधेयकावर बोलताना अफगाणिस्तान, पाकिस्तान, बांगला देश या तीन देशात धार्मिक छळामुळे भारतात येणाऱ्या हिंदू-शीख, जैन-बौध्द व पारशी लोकांना नागरिकत्व देणारा हा















कायदा आहे असे सांगताना आतापर्यंत असे कितीजण भारतात आले आहेत याचे आकडे देण्यात असमर्थता व्यक्त केली. परंतु गेल्या तीस वर्षात म्हणे सुमारे पस्तीस हजार लोक आल्याचा दावा करण्यात आला. म्हणजेच सरासरी वर्षाला बाराशे लोक भारतात आले असा याचा अर्थ होतो. ही संख्या म्हणजे निर्वासितांचे लोंढे नव्हेत. मग त्यासाठी एवढा आटापिटा कशासाठी व एवढा कायदा घाईने करण्याची आवश्यकता काय असे प्रश्न निर्माण होतात व त्याची कोणतीही समर्पक व चोख उत्तरे शहा देऊ शकले नाहीत. आसामचे एक सदस्य रिपुन बोरा यांनी तर त्यांनी यासंदर्भात संसदेत विचारलेल्या प्रश्नांना गृहमंत्रालयाने दिलेली उत्तरेच वाचून दाखवली आणि त्यामध्ये कुठेही निर्वासितांची अधिकृत आकडेवारी उपलब्ध नसल्याचे नमूद केले असल्याचे दाखवून दिले. थोडक्यात हा कायदा एवढ्या घाईघाईने संमत करण्याची कोणतीही आवश्यकता नव्हती. त्यामुळेच सरकारची या कायदा मंजूर करण्याची लगबग, गडबड आणि घाई यामागील हेतु साफ-स्वच्छ नसल्याचा निष्कर्ष काढणे गैर ठरणार नाही. हा कायदा वादग्रस्त ठरणार याची पूर्ण कल्पना सरकारला होती. परंतु सरकारला बहुसंख्यकवादाची मुहुर्तमेढ रोवण्याची घाई झालेली असल्याने त्यांनी हा कायदा तत्काळ आणला. यामुळे ज्वलंत आर्थिक मुद्यांकडे आपोआपच दुर्लक्ष झाले आणि देशात हिंदुत्वाचे वारे वाहण्यास प्रारंभ झाला. असे असले तरी सरकारची आगामी वाटचाल फारशी सुरळीत असेल असे दिसत नाही. कारण या मुद्यावरुन उफाळलेला असंतोष कमी होण्याची चिन्हे दिसत नाहीत. यामध्ये आता विद्यार्थ्यांच्या जोडीला महिलाही उतरल्या आहेत. ती बाब सरकारला अडचणीची ठरत आहे. उत्तर प्रदेशात पोलिसांच्या एकतर्फी व अतिरेकी बळाच्या वापराने हिंसा घडवून आणण्याचा प्रयोग यशस्वीपणे राबविण्यात आला. परंतु दिल्लीत व इतरत्र आता आंदोलनाने वेगळ्या पध्दतीने निषेध प्रकट करण्यास सुरुवात केली आहे. ही पध्दत लोकशाही आणि शांततापूर्ण असल्याने सरकारची आणखी अडचण होणार आहे हे स्पष्ट आहे.

या मुद्यावर भाजप व संघ परिवाराला दोन आघाड्यांवर


लढावे लागण्याची चिन्हे आहेत. देशात विविध राज्यांमध्ये या मुद्यावरुन आंदोलने पेटली आहेत. केरळमधील सरकारने हा कायदा रद्द करावा अशा आशयाचा ठरावच संमत केला आहे. ही बाब वरवर दिसायला साधी दिसत असली तरी तिचे परिणाम दूरगामी आहेत. कारण एखाद्या विधानसभेने ठराव संमत करणे याचा अर्थ त्या राज्यातील बहुसंख्या जनतेच्या इच्छाशक्तीचे ते सामूहिक प्रतिबिंब मानले जाते. त्या अर्थाने त्याचे महत्व असते. त्यामुळेच तेथील राज्यपाल व भाजपचे नेते अरिफ महंमद खान यांनी तांत्रिकदृष्ट्या या ठरावाला फारसे महत्व नसल्याचे वक्तव्य झाडले. केरळचे मुख्यमंत्री पिन्नराई विजयन यांनी इतर विरोधी पक्षांना त्यांची सरकारे असलेल्या राज्यांमध्येही असेच ठराव करुन हा कायदा रद्द करण्याची मागणी केली जावी असे आवाहन केले आहे. परंतु प्रमुख विरोधी पक्ष काँग्रेसने पुन्हा एकदा आपले 'तळ्यात-मळ्यात'ले राजकारण दाखवून याबाबत मौन पाळण्याची सोयीस्कर भूमिका घेतली आहे. काँग्रेसचा कणाहीन व दुबळा विरोध भाजपच्या पथ्यावर पडतो आहे. परंतु विविध राज्यांनी असे ठराव संमत केल्यास केंद्र-राज्य संबंधातील संघर्षपूर्ण तसेच अभूतपूर्व व ऐतिहासिक अशी ती बाब ठरणार आहे. त्यामुळे खरोखर या मुद्यावर विरोधी पक्ष एकजूट राहिल्यास एक तीव्र असा विरोध तयार होऊ शकतो. विशेष म्हणजे आसाममध्ये भाजपचे सरकार असूनही तेथील विविध संघटनांनी भाजप सरकारवर केरळच्या धर्तीवर हा कायदा रद्द करणारा ठराव संमत करण्यासाठी दबाव आणण्यास प्रारंभ केला आहे. ही देखील भाजपच्या चिंतेची प्रमुख बाब आहे.

भाजपला या वाढत्या असंतोषाच्या वणव्याला तोंड देण्यासाठी देशांतर्गत पातळीवर कंबर कसावी लागत आहे. नुकतीच पक्षाध्यक्ष आणि गृहमंत्री अमित शहा यांनी यासंदर्भातील योजना आखणीसाठी बैठक बोलावली होती. परंतु त्यामध्ये मोजक्याच नेत्यांना समाविष्ट करण्यात आले होते. सध्याच्या चित्रानुसार या प्रतिकार मोहिमेचे नेतृत्व पंतप्रधान नरेंद्र मोदी, गृहमंत्री अमित शहा करणार असून त्यांच्या साथीला कायदामंत्री रविशंकर प्रसाद आणि काही प्रमाणात माहिती व प्रसारणमंत्री प्रकाश जावडेकर यांचा समावेश आहे. विशेष म्हणजे संरक्षण मंत्री राजनाथसिंग आणि

















परिवहनमंत्री नितिन गडकरी यांच्यासारख्या वरिष्ठ नेत्यात गणना होणाऱ्या तसेच माजी राष्ट्रीय अध्यक्ष असलेल्या नेत्यांचा सहभाग कुठेच आढळून येत नाही. त्यांना का वगळण्यात आले हे एक गूढच आहे. म्हणजेच भाजपमध्ये सर्व काही सुरळीत आहे असे म्हणता येणार नाही. कुठेतरी गडबड आहे.

देशांतर्गत पातळीवर याला प्रतिकार करण्याबरोबरच भाजपला व विशेषतः मोदी सरकारला आंतरराष्ट्रीय पातळीवरही भारतविरोधी मतप्रवाहाला तोंड देण्याची पाळी आली आहे. जम्मू-काश्मीरचे तुकडे आणि नागरिकत्व दुरुस्ती कायदा या दोन्ही मुद्यांवर भारताला आंतरराष्ट्रीय समुदायाला तोंड देणे अवघड जात आहे. माजी परराष्ट्रसचिव तसेच माजी राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार शिवशंकर मेनन यांनी या दोन मुद्यांवर भारत आंतरराष्ट्रीय पातळीवर एकाकी पडत चालल्याचे निरीक्षण नोंदविले आहे. मेनन हे परराष्ट्र संबंध विषयक केवळ तज्ञच नाहीत तर त्यांचे मत हे गांभीर्याने विचारात घेतले जाते. ते मोजकेच बोलतात परंतु नेमके व अचूक बोलत असल्याने त्यांच्या बोलण्याला वजन प्राप्त झाले आहे. त्यांच्या या टिप्पणीचा सरकारकडून प्रतिवाद झालेला नाही. उलट परराष्ट्र मंत्रालयाच्या पातळीवर अनधिकृतपणे किंवा खासगीत दबक्या आवाजात मेनन यांच्या मताला दुजोरा दिला जात असल्याचे चित्र आहे. जम्मू-काश्मीरचे दोन भाग करणे किंवा संबंधित कलमे रद्द करणे ही भारताची अंतर्गत बाब असल्याचे आंतरराष्ट्रीय पातळीवर मानले जात असले तरी तेथील राजकीय नेत्यांना दीर्घकाळ स्थानबध्द करणे तसेच संपर्काचे सर्व दुवे तोडणे(इंटरनेट, मोबाईल, सोशल मीडिया इ.) या दोन विषयांवर आंतरराष्ट्रीय स्तरावर तीव्र प्रतिक्रिया आहेत.

त्याचप्रमाणे नागरिकत्व दुरुस्ती कायद्यातून मुस्लिम समाजाला वगळण्याच्या निर्णयाचे समर्थन करणे भारताला अवघड जात आहे. ही बाब परराष्ट्र मंत्रालयाचे अधिकारी खासगीत मान्य करताना आढळतात. परंतु जाहीरपणे कुणी ते बोलताना दिसत नाहीत. यामुळे गेल्या सत्तर वर्षात भारतातील विविध नेत्यांनी एक उदारमतवादी – सहिष्णु – सर्वसमावेशक लोकशाही देश म्हणून भारताची जी गौरवशाली प्रतिमा जगभरात निर्माण केली व प्रस्थापित केली होती तिला वर्तमान राज्यकर्त्यांनी एका झटक्यात तडे घालवले आहेत. त्यात दुरुस्ती अवघड आहे.

थोडक्यातच सांगायचे झाल्यास नागरिकत्व दुरुस्ती कायद्याने सध्याच्या राज्यकर्त्यांचे खरे रंग जनतेसमोर उघडे झाले आहेत. त्यातून निर्माण झालेल्या असंतोषाला तोंड देताना या राज्यकर्त्यांना दमछाक होणार आहे हे स्पष्ट होत आहे. उत्तर प्रदेशात या सरकारने पोलिसांच्या बळाचा जबरी वापर करुन आंदोलनाला हिंसक वळण देण्याचा प्रयत्न केला परंतु तो देखील फारसा यशस्वी झाला नाही आणि त्यातही सरकारचे मनसुबे उघडकीस आले व सरकारची बदनामीच अधिक झाली. परंतु बळाच्या जोरावर आंदोलन मोडून काढण्याची सरकारची तयारी यानिमित्ताने स्पष्ट झाली. त्यामुळेच आता दिल्लीसह ठिकठिकाणी आंदोलनांनी वेगळे स्वरुप धारण केले आहे. त्यामध्ये महिला व विद्यार्थ्यांचा अधिक पुढाकार असल्याने त्याविरुध्द पोलिस बळाचा पुन्हा अतिरेकी वापर करण्याचे सरकारतर्फे टाळले जात आहे. त्याचबरोबर पूर्णपणे शांततामय आणि अभिनव पध्दतीने हे आंदोलन सुरु ठेवण्यात आले असल्याने सरकारचीही पंचाईत होताना दिसते.

एकीकडे ही परिस्थिती असतानाच आर्थिक आघाडीवरच्या चिंता कमी होण्याऐवजी वाढताना आढळत आहेत. अमेरिका आणि इराणमधील वाढत्या संघर्षाबरोबरच कच्च्या खनिज तेलाच्या किमतींनी उंच उडी मारलेली आहे. ताज्या घडामोडींनुसार खनिज तेलाच्या किमती येत्या काळात चढ्या राहण्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे. त्याचा अटळ परिणाम भारतावरही होणार आहे. आधीच आर्थिक पेचप्रसंग आणि त्यात हा खनिज तेलसंकटाचा फटका यामुळे सरकारपुढील आव्हानांमध्ये वाढ झालेली आहे. हा फटका जीवघेणा ठरू नये म्हणजे मिळवली. परंतु याच्याच जोडीला भारत व इराण आणि भारत व अमेरिका यांच्या संबंधांमध्ये देखील बदल संभवतात. अमेरिका आणि इराणबरोबरचे आपले संबंध समतोलपणे कसे राखायचे याची कसरत भारतीय नेतृत्वाला करायला लागणार आहे. त्यादृष्टीने किती परिपक्वता दाखवली जाते हे पहावे लागणार आहे. त्यामुळे आखाती देशांपेक्षा वेगळ्या देशांकडून खनिज तेल आयातीची शक्यता पडताळून पाहण्यास सरकारने प्रारंभ केला आहे. थोडक्यात देशापुढील आर्थिक संकटातून दिलासा मिळण्याऐवजी ती चिघळत चाललेली दिसतात.

लोकांना आर्थिक दुखण्यांचा त्रास लक्षात येऊ नये यासाठी सरकारतर्फे बधिरतेची इंजेक्शने दिली जात आहेत. अर्थमंत्री निर्मला सीतारमन यांनी पुढील पाच वर्षांमध्ये देशात १०२ लाख कोटि रुपयांचे पायाभूत प्रकल्प येण्याची घोषणा केली आहे. येथे येणाऱ्या दिवसाची शाश्वती नसताना अर्थमंत्री आणि हे सरकार लोकांना अशा गगनभेदी घोषणा करुन भारावून टाकण्याचा अत्यंत हास्यास्पद व वेडगळ प्रयत्न करताना आढळत आहेत. सध्याच्या आर्थिक पेचप्रसंगातून बाहेर येण्याचा कोणताही ठोस





व त्वरित मार्ग किंवा उपाययोजना या सरकारकडे नसल्याने या असल्या पुढच्या पाच वर्षांचा हवाला देणाऱ्या भंपक घोषणा केल्या जात आहेत. आर्थिक धोरण आखणीमध्ये दीर्घकालीन योजना आणि अल्पकालीन उपाययोजना यांची सांगड घातली जात असते. एखाद्या आर्थिक पेचप्रसंगावर कोणत्याही सरकारला तात्कालिक उपाययोजना कराव्या लागत असतात आणि त्याद्वारे अर्थव्यवस्थेला काहीशी स्थिरता आल्यानंतर मध्यमकालीन आणि त्यानंतर दीर्घकालीन योजनांवर अंमलबजावणी केली जात असते. परंतु या सरकारमध्ये त्या पध्दतीने कामकाज होताना आढळत नसल्याने राज्यकारभार असो किंवा अर्थव्यवस्थेचे व्यवस्थापन असो याबाबत स्पष्टता व पारदर्शकतेचा अभाव आहे. अनेक मंत्रालयांचे निर्णय हे मंत्रालयांऐवजी पंतप्रधान कार्यालयात(पीएमओ) केले जात असल्याच्या तक्रारी वाढत आहेत. कॅबिनेटच्या बैठकीत अचानक संबंधित मंत्र्याला त्याच्या खात्याबाबत करण्यात आलेल्या निर्णयाची माहिती मिळते व तो देखील चकित होतो असे प्रकार होत असल्याचे सांगितले जाते. जवळपास प्रत्येक मंत्रालयात पंतप्रधान कार्यालयाचा हस्तक्षेप असतो आणि मंत्रालयाच्या कामकाजाची दिशा ठरविण्याचे









आदेशही पंतप्रधान कार्यालयातर्फेच जारी केले जात असल्याच्या तक्रारी कुजबुजत्या आवाजात ऐकायला येत असतात.

सारांशाने येत्या वर्षातील संभाव्य दिशेचा मागोवा घेण्याचा प्रयत्न केल्यास काय आढळते ? १ फेब्रुवारीला केंद्रीय अर्थसंकल्प सादर केला जाईल. त्यामध्ये अर्थव्यवस्था किती सुदृढ आहे हे लोकांना पटविण्याचा प्रयत्न केला जाईल. रेल्वेची भाडेवाढ झालेलीच आहे व ती नववर्षाची भेट लोकांना मिळालेलीच आहे. फेब्रुवारीच्या पहिल्या आठवड्यात दिल्ली विधानसभेची निवडणूक असेल. वर्षाच्या अखेरीला बिहार विधानसभेची निवडणूक अपेक्षित आहे. त्यामुळे केंद्र सरकार व भाजपच्या दृष्टीने या दोन्ही निवडणुका जिंकण्याच्या दृष्टीने ज्या काही युक्त्या, चलाख्या करता येणे शक्य आहे त्या केल्या जाणे अपेक्षित आहे. हिंदुत्व, राष्ट्रवाद, देशभक्ति आणि धार्मिक ध्रुवीकरण व मुस्लिम विरोध या आधारावरच या निवडणुका जिंकण्याचे प्रयत्न होणार आहेत हे उघड आहे. थोडक्यात या देशात बहुसंख्यकवादाची मुहुर्तमेढ रोवण्यात आली आहे. आर्थिक परिस्थिती अराजकाकडे चालली आहे तर राज्यकर्ते आपल्या हातात सत्ता एकवटण्यात गर्क आहेत. ही सर्व लक्षणे एकाधिकारशाहीकडे देशाची वाटचाल होत असल्याचे दर्शवितात!

◆

नागरिकत्व दुरुस्ती कायदा हा केंद्र सरकारच्या अंगाशी येताना दिसत आहे. अविवेकी आणि अविचाराने केलेल्या या कायद्याचे परिणाम सरकारलाच नव्हे तर देशाला आणि सर्वसामान्य माणसाला भोगावे लागणार आहेत. उत्तर प्रदेशात तर पोलिसांना या कायद्याला विरोध करणाऱ्यांच्या विरोधात मुक्त व जबरी बळ वापरण्याचे आदेश दिले असावेत असे वाटू लागले आहे.

# सीएए एनआरसी एनपीआर आहे तरी काय?

गहिनीनाथ







REJECT CAA NRC
NO TO TWO NATION THEORY! NO TO CITIZENSHIP BASED ON RELIGION!
Solidarity with
CAA
RELIGIOUS INJUSTICE
NRC
INDIA AGAINST CAA & NRC
WITHDRAW CAA
INQUILAB ZINDABAD
REJECT CAA NRC
READY TO DIE BUT NOT READY TO ACCEPT CAA / NRC
SABKA HAI KISI KE BAAP KA NAHIN
NWF
REJECT CAA NRC & NPR
HINDU MUSLIM
CAA NRC BYE BYE
DON'T DIVIDE INDIA
RESIST

# सिटिझनशिप ॲमेंडमेंट ॲक्ट - सीएए -नागरिकत्व दुरुस्ती कायदा
# नॅशनल रजिस्टर ऑफ सिटिझन्स -- एनआरसी -- नागरिक राष्ट्रीय नोंदणीपुस्तक
# नॅशनल पीपल्स रजिस्टर -- एनपीआर -- राष्ट्रीय जन नोंदणीपुस्तक

भारतात बहुसंख्यकवादाची मुहुर्तमेढ रोवण्याचे हे तीन मार्ग आहेत. त्यांच्याद्वारे या देशात बहुसंख्यक समाजाच्या निर्णायक स्थानावर शिक्कामोर्तब करण्याचा प्रयत्न सुरु आहे. यामध्ये भारतातील विविधतेला 'राम राम' करण्याचा प्रयत्न आहे. भारतात विविध भाषा, बहुविध संस्कृती असूनही त्यामध्ये असलेल्या भारतीय एकतेच्या सूत्राचे गुणगान कथा-कवितांमधून झाले आहे. 'विविधतेत एकता' ही भारताची वैशिष्ट्यपूर्ण ओळख जगाला करुन देणारी ही भारतीय संस्कृति आतापर्यंत अस्तित्वात होती. परंतु आता भारताची बहुसंख्यक एकधर्मीय ओळख तयार करण्यासाठी पावले टाकली जात आहेत. वामनाने बळीराजाकडे जमीनीचे दान मागितले. पहिल्या दोन पावलातच वामनाने पृथ्वी, आकाश पादाक्रांत करुन तिसरे पाऊल कुठे ठेवू










असे विचारल्यावर काहीच शिल्लक न राहिलेल्या बळीराजाने आपले मस्तक वामनापुढे केले आणि त्याने त्यास पाताळात ढकलले ही पुराणकथा सर्वच भारतीय जाणतात. आताही या तीन पावलांच्या द्वारे भारताची बहुविध संस्कृति पाताळात गाडण्याचे काम सुरु आहे.

## सीएए उर्फ सिटिझन्स अँमेंडमेंट ॲक्ट उर्फ नागरिकत्व दुरुस्ती कायदा.

भारतात 1955 मध्ये नागरिकत्व विषयक कायदा करण्यात आला होता. या कायद्यानुसार जन्म, वारसा, नोंदणी, प्रादेशिक समावेशकता(टेरिटोरिअल इनकॉर्पोरेशन) आणि नैसर्गिकीकरण (नॅचरलायझेशन) या पाच प्रक्रियांद्वारा एखाद्या व्यक्तीला भारतीय नागरिकत्व प्राप्तीचा अधिकार देऊ करण्यात आला होता. राज्यघटनेने नागरिकत्वाची जी व्याख्या केली त्याच्या अनुषंगानेच हा कायदा करण्यात आला होता. राज्यघटनेने आणि नंतरच्या कायद्यानेही नागरिकत्वासाठी धर्म हा आधार मानला नव्हता. धर्म, जात, लिंग, वर्ग या आधारे नागरिकत्वाबाबत भेदभाव करण्याच्या संकल्पनाही यात नाकारण्यात आलेली होती.

नरेंद्र मोदी सरकारने या नागरिकत्व कायद्यात दुरुस्ती केली आहे. बेकायदेशीर स्थलांतरितांशी निगडित पोटकलम 1(ब) मध्ये त्यांनी बदल केलेला आहे. बेकायदेशीर स्थलांतरित ही श्रेणी 2003 मध्ये वाजपेयी सरकारने या कायद्यात समाविष्ट केलेली होती. परंतु त्यावेळीही त्यांनी त्यात धर्माचा आधार ठेवलेला नव्हता. मोदी सरकारने त्यात बदल केलेला आहे.






'डिसेंबर-2014 पूर्वी पाकिस्तान, अफगाणिस्तान व बांगला देशातून भारतात आलेल्या हिंदू, शीख, जैन, बौध्द, पारशी व ख्रिश्चन लोकांना बेकायदेशीर स्थलांतरित मानले जाणार नाही' अशी दुरुस्ती यामध्ये करण्यात आलेली आहे. या लोकांना आपोआप भारतीय नागरिकत्व देण्याची तरतूदही करण्यात आली आहे.

याचा सरळ अर्थ हा होतो की स्वतंत्र भारताच्या इतिहासात प्रथमच नागरिकत्वासाठी धर्म हा आधार मानला जाणार आहे. त्याच अर्थाची ही दुरुस्ती आहे. राज्यघटनेच्या कलम 14 नुसार कायद्यासमोर सर्व नागरिक समान मानले गेले आहेत. त्यांचा धर्म, जात, लिंग, वर्ग आधारभूत मानण्यात आलेले नाहीत. याचाच अर्थ ही नवी दुरुस्ती किंवा हा नवा 'सीएए'कायदा हा राज्यघटनेच्या मूलभूत तत्वाच्या विरोधात जाणारा आहे. राज्यघटनेशी विसंगत असा हा कायदा आहे. या नव्या दुरुस्तीने समाजात भेदभाव निर्माण होणार आहे. समजा एखाद्या बिगर-मुस्लिम स्थलांतरित व्यक्तीकडे जुजबी निवासी दस्तावेज आणि पूर्वजांबाबतची कागदपत्रे असतील तर तो भारताचा नागरिक होऊ शकतो. पण मुस्लिम असल्यास तो तशाच प्रकारचे दस्तावेज असूनही बेकायदेशीर स्थलांतरित घोषित होऊ शकतो. म्हणजेच धार्मिक आधारावर दोन व्यक्तींमध्ये भेदभाव करण्याची ही नीती आहे आणि तिच्यावर या कायद्याने शिक्कामोर्तब केले आहे.

आता प्रश्न उपस्थित होतो की यातून मुस्लिमांना वगळण्याचे कारण काय ? आणि दुसरा तेवढाच महत्वाचा प्रश्न म्हणजे फक्त या तीन देशांचाच उल्लेख का ? नेपाळ, म्यानमार,







भूतान, श्रीलंका या देशातून देखील अनेकजण भारतात प्रवेश करीत असतात. त्यांचा उल्लेख का नाही ? पाकिस्तानात अहमदिया समाजाच्या मुस्लिमांचाही छळ होतो आणि तेही भारतात येत असतात. पण आता ते येऊ शकणार नाहीत. पाकिस्तानात शिया मुस्लिमांनाही हल्ल्याचे लक्ष्य केले जाते पण तेही भारतात येऊ शकणार नाहीत. श्रीलंकेत तमीळ लोकांवर अत्याचार झाल्यास ते हिंदू असूनही भारताच्या आश्रयाला येऊ शकणार नाहीत.

हा कायदा करताना देशाच्या केंद्रीय गृहमंत्र्यांनी सतत पं.नेहरू व पाकिस्तानचे तत्कालीन पंतप्रधान लियाकत अलि खान यांच्यात 1950 मध्ये झालेल्या समझोत्याचा संदर्भ दिला आणि त्या करारात अर्धवट राहिलेले काम त्यांचे सरकार पूर्ण करीत असल्याचा दावा केला. नेहरू व लियाकत अलि यांच्यात झालेल्या करारानुसार दोन्ही देशांनी आपापल्या देशातल्या अल्पसंख्यक नागरिकांना संपूर्ण व समान नागरिकत्व प्रदान करण्याची बाब मान्य केलेली आहे. या करारात देखील धर्माचा उल्लेख करण्यात आलेला नाही याची दखल येथे घेण्याची आवश्यकता आहे. त्यावरुनच वर्तमान गृहमंत्र्यांच्या निवेदनातील पोकळपणा व फोलपणा लक्षात येईल. या करारात नागरिकत्व देताना धर्माचा आधार मानलेला नाही(इरिस्पेक्टिव्ह ऑफ रिलिजन) अशी स्पष्ट शब्दरचना आहे. भारताच्या वर्तमान विद्वान गृहमंत्र्यांनी मुस्लिमांना या दुरुस्तीतून वगळण्याचे समर्थन करताना आणखी एक अतिशय निरागस युक्तिवाद केला. अफगाणिस्तान, पाकिस्तान किंवा बांगला देश हे मुस्लिम बहुसंख्यक देश आहेत





त्यामुळे तेथे मुस्लिमांवर अत्याचार किंवा छळाला तोंड देण्याची वेळच कशी येईल ? वरच मुस्लिमांमधील शिया आणि अहमदिया पंथाच्या मुस्लिमांना पाकिस्तानात कसे 'टार्गेट' केले जात आहे याचा संदर्भ दिला आहे. बांगला देशातील धर्मांध मुस्लिमांच्या छळाला कंटाळून बंडखोर लेखिका तस्लीमा नसरीन यांनी गेली अनेक वर्षे भारतात आश्रय घेतला आहे. आता त्यांचे काय होणार हा प्रश्न आहे आणि गृहमंत्र्यांनी त्याचे उत्तरही देण्याची वेळ आली आहे. भारतात हिंदू समाजाचा भाग असलेल्या दलितांवर अनन्वित अत्याचार केले जातात आणि कंटाळून ते धर्मांतर करतात. तमीळनाडूत मीनाक्षीपुरम मधील दलितांनी सामूहिक इस्लाम धर्म स्वीकारण्याचा इतिहास केंद्रीय गृहमंत्री विसरले असावेत.

या कायद्यावर हिंसक प्रतिक्रिया होणे स्वाभाविक होते. एका हिंदू सामाजिक कार्यकर्त्याने यावर बोलताना म्हटले की तत्काळ तिहेरी तलाक असो, अयोध्येतील राम मंदिर असो या प्रश्नांवर भारतातल्या मुस्लिमांनी मुकाट्याने माघारीची भूमिका घेतली. परंतु आता हा कायदा करुन मुस्लिमांना भारताबाहेरच काढण्याचा प्रयत्न सुरु झाल्यानंतर मुस्लिमांनी करायचे काय ? आताही माघार घ्यायची काय?

आसामचे उदाहरण वैशिष्ट्यपूर्ण आहे. आसाममध्ये परकी नागरिकांच्या विरोधात झालेले आंदोलन हे मुस्लिमांच्या विरोधात नव्हते. तर आसामवर बंगाली भाषा व संस्कृतीच्या आक्रमणाच्या विरोधात होते. त्याला हिंदू विरुध्द मुस्लिम असे स्वरुप कधीच नव्हते. परंतु जिथेतिथे हिंदू-मुस्लिम पाहण्याची सवय लागलेल्या संघ परिवाराने या आंदोलनाचा चुकीचा अर्थ लावण्याच प्रकार केला आणि मार खाल्ला. या कायद्याला सर्वात हिंसक विरोध व प्रतिकार आसाममध्ये होत आहे. आसाममध्ये भाजपचे सरकार आहे आणि आता तेथील हिंसक प्रतिक्रिया आटोक्यात आणता आणता भाजपच्या नाकीनऊ आले आहे. केवळ आसामच नव्हे तर संपूर्ण ईशान्य भारतात या कायद्याच्या विरोधात प्रतिक्रिया आहे आणि भाजपला हे प्रकरण आता जड जाऊ लागले आहे.

पश्चिम बंगालमध्ये नागरिकत्व दुरुस्ती कायद्यांचा उपयोग होऊन आपल्याला बंगाली लोक मते देतील आणि ममता बॅनर्जी यांचा अभेद्य किल्ला जिंकण्याची ईर्षाही यामागे होते. परंतु फासे उलटले. ईशान्य भारतातील









आदिवासी बहुल राज्यांनीही विरोध सुरु केला आणि ममता बॅनर्जी यांना या कायद्याने संजीवनी मिळाली. या कायद्यामुळे आता लोकांना जन्मदाखले व संबंधित पुरावे दाखवावे लागणार म्हटल्यावर ग्रामीण भागातले लोक इतके चिडले की त्यांनी भाजपच्या कार्यकर्ते व नेत्यांना पकडून दम दिला की पुन्हा दिसलात तर याद राखा ! दुसरीकडे ममता बॅनर्जी यांनी हा कायदा बंगाली लोकांच्या विरोधात असल्याचे लोकांच्या मनात बरोबर रुजवले आणि आता तर त्या रोजच्या रोज सभा घेऊन लोकांशी संवाद साधत आहेत व त्यांनी पुन्हा आपली पकड प्रस्थापित केली आहे.

नागरिकत्व दुरुस्ती कायदा हा केंद्र सरकारच्या अंगाशी येताना दिसत आहे. अविवेकी आणि अविचाराने केलेल्या या कायद्याचे परिणाम सरकारलाच नव्हे तर देशाला आणि सर्वसामान्य माणसाला भोगावे लागणार आहेत. उत्तर प्रदेशात तर पोलिसांना या कायद्याला विरोध करणाऱ्यांच्या विरोधात मुक्त व जबरी बळ वापरण्याचे आदेश दिले असावेत असे वाटू लागले आहे. एका राष्ट्रीय वृत्तपत्राने तर काही मुस्लिम आंदोलनकर्त्यांचा मृत्यु गोळीबारात झाल्याचे पोलिसांनी सांगितल्यावर प्रत्यक्षात त्यांच्या शरीरात एक गोळीही सापडली नसल्याची बातमी दिली आहे. याचा अर्थ या कायद्याच्या विरोधातील आंदोलन अतिशय अमानुषपणे, निर्घृण पध्दतीने चिरडण्याची तयारी उत्तर प्रदेशातील नेतृत्वाने केलेली दिसते. ही चिन्हे वाईट आहेत.याचे रुपांतर उद्रेकात व्हावे यासाठी मुस्लिमांना चिथावण्याचे हे प्रकार आहेत. तसे उद्रेक किंवा विस्फोट होऊ नये हीच अपेक्षा!

## एनआरसी -- नॅशनल रजिस्टर ऑफ सिटिझन्स आणि एनपीआर -- नॅशनल पीपल्स रजिस्टर

नागरिकत्व दुरुस्ती कायदा आणि एनआरसी यांचा काही संबंध नसल्याचे पंतप्रधान व केंद्रीय गृहमंत्री वारंवार सांगत आहेत. पंतप्रधानांनी एका भाषणात एनआरसीची चर्चा देखील नाही असे वक्तव्य केल्यानंतर देशभरातील माध्यमांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांचे संसदेच्या पटलावर केलेले निवेदनच प्रसारित केले. यामध्ये अमितभाई शहा हे लवकरच देशभरात एनआरसी लागू करण्याचे सांगताना दिसतात. आता यात खोटे कोण ठरले ? त्याचबरोबर एनपीआर हे एनआरसीचे पहिले पाऊल असल्याने त्याची प्रक्रिया सुरु करण्यात आल्याचेही आता सांगण्यात आले आहे. बिहारमध्ये मुख्यमंत्री नीतीशकुमार यांनी एनआरसीला विरोध केला आहे. पण त्यांचे उपमुख्यमंत्री व भाजपनेते सुशील

मोदी यांनी बिहारमध्ये 'नॅशनल पीपल्स रजिस्टर'ची प्रक्रिया सुरु करण्याची घोषणाही करुन टाकली. नीतीशकुमार यांनी माघारीचे व बोटचेपीचे धोरण स्वीकारले आहे. यामध्ये जे सरकारी अधिकारी हे पीपल्स रजिस्टर तयार करण्यासाठीच्या कामात सहभागी होण्याचे नाकारतील त्यांना तीन वर्षे तुरुंगवास आणि जबरी दंड आकारण्याच्या शिक्षेची घोषणाही त्यांनी केली आहे.

नागरिकत्व कायदा आणि एनआरसीचा संबंध जवळचा आहे. नागरिकत्व दुरुस्ती कायद्यानुसार अफगाणिस्तान, पाकिस्तान व बांगला देशातून आलेल्या बिगर मुस्लिमांना नागरिकत्व दिल्यानंतर त्याची पुढची पायरी म्हणून 'एनआरसी' विचारात घ्यावे लागेल. कारण 'नॅशनल रजिस्टर ऑफ सिटिझन्स' कायद्याखाली घुसखोर, बेकायदेशीर स्थलांतरित यांचा शोध सुरु करण्यात येईल. आता मुस्लिम असल्याने या तीन देशातील मुस्लिमांना नागरिकत्व मिळालेले नसल्याने त्यांची गणना आपोआपच घुसखोर, बेकायदेशीर स्थलांतरित यांच्या श्रेणीत केली जाऊन त्यांची हकालपट्टी केली जाईल. हा एक मर्यादित परिणाम या तीन देशांमधून आलेल्या मुस्लिमांपुरता असेल. परंतु नॅशनल रजिस्टर ऑफ सिटिझन्स हे संपूर्ण देशासाठी लागू होणार आहे. अमित शहा यांनी याबद्दलची घोषणा करताना या रजिस्टरमुळे एकही घुसखोर भारतात शिल्लक राहणार नाही अशी गगनभेदी घोषणा केली आहे. परंतु हा संभाव्य किंवा प्रस्तावित कायदा लागू करताना तो केवळ मुस्लिमच नव्हे तर हिंदूंना देखील डोकेदुखीचा ठरणार आहे. दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांनी यावर अतिशय मार्मिक टिप्पणी केली. ते दिल्लीतील एका 'मिश्रा' नावाच्या व्यक्तीकडे जनसंपर्क मोहिमेअंतर्गत गेले होते. त्यांनी त्यांना एनआरसीबद्दल प्रश्न विचारला आणि तुम्ही तुमचे जन्मदाखले आणि इतर कागदपत्रे जमा केली आहेत काय अशी विचारणा केली. परंतु त्यांनी त्यांच्याकडे जन्मदाखला नसल्याचे सांगितले. मग केजरीवाल यांनी त्यांच्या अईवडिलांकडे तरी आहे काय असे विचारले पण आपल्याकडेच नाही तर आई-वडिलांचे दाखले कसे असणार म्हणून त्यांनी सांगितले. त्यावर केजरीवाल यांनी त्यांना काहीसे विनोदाने, 'मग भारताबाहेर जाण्याची तयारी करा' असे म्हटले. त्यावर त्या गृहस्थांनी ते हिंदू असल्याने त्यांना का जावे लागेल असे विचारले. त्यावर 'एनआरसी' मध्ये तुमच्याकडे कागदपत्रे नसली तर तुम्हाला नागरिक मानले जाणार नाही अशी तरतूद आहे असे त्यांनी निदर्शनाला आणल्यावर ते गृहस्थ चक्रावून गेल्याचा अनुभव नुकताच सांगितला.

एनआरसीची सुरुवात 2003 मध्ये वाजपेयी सरकारच्या काळात तत्कालीन गृहमंत्री लालकृष्ण अडवानी यांनी प्रथम मांडली. देशात नागरिकांचे एक रजिस्टर तयार करण्यात येईल, त्याचे संचालन एका प्राधिकरणाद्वारे केले जाईल आणि रजिस्ट्रार जनरल त्याचे प्रमुख राहतील आणि त्या अंतर्गतच भारतीय नागरिकांना ओळखपत्रे देण्यात येतील असाही प्रस्ताव करण्यात आला होता. वाजपेयी सरकारनेच या योजनेच्या अंमलबजावणीची नियमावलीही तयार केली होती.

एनआरसीच्या दिशेने पहिले पाऊल म्हणून 'नॅशनल पीपल्स रजिस्टर' तयार करण्याची प्रक्रिया सुरु करण्यात येईल. यामध्ये लोकांच्या घरोघरी जाऊन त्यांच्याकडून माहिती गोळा करण्यात येऊन त्याचा समावेश या पीपल्स रजिस्टरमध्ये केला जाईल असे त्यावेळी सांगण्यात आले होते.

मुंबईवरील हल्ल्यांनंतर(26 नोव्हेंबर) किनारपट्टी सुरक्षित करण्याच्या दृष्टीने तेथील नागरिकांची नोंदणी करणे आणि त्यांना ओळखपत्रे देण्याची योजना आखण्यात आली होती. ती काही प्रमाणात पूर्णही झाली. 2010मध्ये तत्कालीन गृहमंत्री




पी.चिदंबरम यांनी ती मांडलेली होती. परंतु त्यानंतर युनिक आयडेंटिटि किंवा 'आधार कार्ड' योजनेच्या संकल्पनेचा जन्म झाल्याने या योजना मागे पडल्या होत्या. परंतु त्यावेळी देखील लोकांची नोंदणी नागरिकत्वाच्या आधारे न करता निवासी दर्जा(रेसिडेन्शियल) लक्षात घेऊन करण्यात आले होते.

यात तांत्रिक मुद्दे बरेच आहेत. ते सर्वसामान्यांच्या डोक्यावरुनही जाऊ शकतात. परंतु मूळ नॅशनल पीपल्स रजिस्टरमध्ये लोकांना नोंदणी करताना 15 प्रश्नांची उत्तरे देणे

आवश्यक मानले होते. आता मोदी सरकारने त्यात आणखी सहा प्रश्नांची भर टाकून संख्या 21 केली आहे. या सहा नव्या प्रश्नांतच खरी अडचण आहे. यामध्ये व्यक्तीला आई-वडिलांचे नाव, त्यांचे गाव, त्यांच्या जन्माचे स्थान व तारीख, आधार कार्डाचे तपशील ही माहिती अनिवार्य करण्यात आली आहे. ही माहिती नसेल तर त्या व्यक्तीला काय करणार हे अद्याप अनिश्चित व अनुत्तरित आहे.

ज्या व्यक्ती दस्तावेज किंवा कागदपत्रे सादर करु शकणार नाहीत त्यांना 'डिटेन्शन कँप्स' मध्ये ठेवणार काय असाही एक प्रश्न यानिमित्ताने चर्चेत आलेला आहे. मोदींनी असे डिटेन्शन कँप्सची अजुन चर्चाही झाली नसल्याचे म्हटले होते. परंतु राज्यसभेत यासंदर्भात विचारण्यात आलेल्या एका प्रश्नाच्या उत्तरात गृहराज्यमंत्र्यांनी (11 डिसेंबर 2019) सर्व राज्यांना डिटेन्शन सेंटर्स उघडण्याच्या सूचना जारी करण्यात आल्याचे म्हटले आहे. यापूर्वी देखील उपलब्ध नोंदीनुसार एप्रिल-2014च्या अखेरच्या आठवड्यात व सप्टेंबर-2014मध्येही याच प्रकारच्या सूचना राज्य सरकारांना देण्यात आल्या आहेत. कर्नाटकातील भाजप सरकारने असे कँप्स किंवा छावण्या उभारण्यास प्रारंभही केल्याची माहिती मिळते.








या विषयाचे आणखीही तांत्रिक तपशील भरपूर आहेत. परंतु या सर्व माहितीचा सारांश एवढाच आहे की विशिष्ट अशा समूहांना भारतातून बहिष्कृत करण्याच्या दिशेने तर ही वाटचाल नाहीना अशी शंका यावी. भारतात हिंदू व मुस्लिमांमध्ये काही कारणांवरुन तत्कालिक तणाव निर्माण होतही असतील. परंतु आज शेकडो वर्षे हे दोन समाज भारतात तुलनेने सलोख्याने व सामोपचारानेच राहिले आहेत. भारतीय राज्यघटना शांततामय सहजीवनाचा पुरस्कार करते. आज त्या घटनेच्या मूलभूत तत्वावरच आघात करण्याची तयारी सुरु झालेली आढळते. त्यामुळे वर्तमान सरकार, राज्यकर्ते यांच्या मनात काय आहे याबद्दल असंख्य शंका निर्माण होतात. त्या शंकांचे निरसन करण्याऐवजी सरकारतर्फे अनुत्तरित प्रश्न जनतेपुढे उभे केले जात आहेत. ही अनिश्चितता अस्वस्थ करणारी आहे. या अस्वस्थतेचा उद्रेक किंवा स्फोट होणे हे अराजकाला निमंत्रण दिल्यासारखे होईल. मुळात हे सर्व प्रयोग करण्याची ही वेळ आहे काय हा प्रश्नही असाच अनुत्तरित आहे. देशापुढे ज्वलंत आर्थिक प्रश्न असताना हे भावनिक मुद्दे उकरुन काढण्याचे प्रयोजन एकच आहे की देशाला आग लागली तरी चालेल पण एका पक्षाची आणि त्या पक्षातील दोन व्यक्तींची सत्ता व आसने कायम राहिली पाहिजेत! ही ती अतिरेकी आकांक्षा यामागे आहे!

◆



राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांचा वाढदिवस बळीराजा कृतज्ञता दिन म्हणून साजरा झाला. त्यानिमित्त मुंबईत झालेल्या कार्यक्रमात त्यांनी केलेले मार्गदर्शन...

# बळीराजाची पिढी सज्ञान व्हावी...

शरद पवार



जयंतरावांचा मला फोन आला. त्यांनी सांगितले की, 12 डिसेंबरनिमित्त कार्यकर्त्यांना तुम्हाला भेटायचे आहे. आणि त्यासाठी तुम्ही वेळ द्यावा. आमचं ठरलं होतं की, समारंभाचं स्वरूप त्याला द्यायचे नाही. भेटीगाठी आपण नक्की घेऊ. पण, आपण पाहतोय की, गेली तास दोन तास आपण त्याला एक आगळं वेगळं स्वरूप दिलं.

आजचा हा दिवस माझ्या लक्षात राहतो, त्याचे काही कारण आहे. जन्मदिवस म्हणून राहत नाही, तर माझ्या आईचाही जन्मदिवस 12 डिसेंबर आहे. आणि माझ्या बायकोचा जन्म



13 डिसेंबरला झाला. तसंच माझे काही मित्र आहेत, त्यांचा जन्म 11, 12 या दरम्यान झालेला आहे. एकेकाळी देशाची चित्रपटसृष्टी ज्यांनी गाजविली, ते आता वयस्कर झालेत. ज्यांना दिलीपकुमार म्हणून ओळखलं जातं, ते माझे घनिष्ठ मित्र आहेत. त्यांचा जन्मदिवस हा 11 डिसेंबर आहे. त्यामुळे 11, 12, 13 डिसेंबर हे दिवस गेली अनेक वर्षे आम्ही खासगीत कोणाच्या तरी घरी एकत्र जमत असतो आणि एकमेकांचे अभिष्ठचिंतन करण्याचा प्रयत्न करत असतो. त्याच्यात आणखी एक महत्त्वाची गोष्ट आहे की, माझ्या जन्मदिवसापेक्षा आईचा जन्मदिवस तोच आहे. आणि आमच्या मातोश्रीने आम्हा सगळ्यांना अत्यंत कष्टाने वाढवले आणि शिकवले. ती स्वतः शेती करायची. वडिल नोकरीला असायचे सहकारी संस्थेमध्ये. आणि शेतामध्ये जे काही पिकेल, ते बाजारामध्ये पोचविण्याचे काम सुद्धा करायची. सार्वजनिक जीवनाची तिला आवड होती. त्यामुळे 1936 साली ती लोकल बोर्डाला पहिल्यांदा निवडून आली. आणि महिलांच्या वतीने महिलांसाठी काम करता येतं, या प्रकारचा आदर्श त्यांनी त्यावेळी लोकल बोर्डात दाखविलेला होता. विशेषतः मुलींचे शिक्षण. मुलींनी आत्मविश्वासाने परिस्थितीला तोंड देण्यासाठी उभे राहिले पाहिजे, हा त्यांचा आयुष्यभर आग्रह होता. अनेक गोष्टी तिच्या सांगण्यासारख्या आहेत, मी खूपदा असा विचार करतो, सार्वजनिक जिवनात काम करत असताना अनेक वेळा यश मिळतं, सन्मान मिळतो. कधी कधी संकटेही मोठी येत असतात. पण, त्या संकटांवर मात करण्यासाठी एक आत्मशक्ती असते, ती कोठून येते, याचा विचार जेव्हा मी करतो, त्यावेळी दोन वर्ग माझ्या डोळ्यासमोर येतात. एक स्वतःची मातोश्री आणि दुसरा महाराष्ट्रातील सर्वसामान्य माणूस. महाराष्ट्रातील सर्वसामान्य माणसांनी तुम्हाला मला प्रचंड साथ दिली. शक्ती दिली.

सत्तेत असताना आपल्याला अनेक धोरण राबवता येतात. अनेक कार्यक्रम राबवता येतात. पण, ते ज्यांच्यासाठी राबवायचे असतात, त्यांच्यापर्यंत ते पोचले की नाही, हे तुम्ही सत्तेच्या बाहेर असता तेव्हा सांगत असता. आणि ज्या माणसांसाठी आपण समाजकारण करण्याचा निर्णय घेतला, तिथं जाऊन आपण पोचलो आणि तशी शक्ती तुम्हाला मिळाली, तर तुम्हाला

आयुष्यात कशाची कमतरता पडत नाही. म्हणून माझी तुम्हाला माझ्या सहकाऱ्यांना आग्रहाची विनंती, सूचना ही आहे की, आपली बांधिलकी शेवटच्या सामान्य माणसाशी आहे. आपली बांधिलकी समाजातील नव्या पिढीशी आहे. या नव्या पिढीला सोबत घेऊन एक वेगळं राज्य, एक वेगळा समाज आणि नुसता महाराष्ट्रच नाही, तर पर्यायाने देशाच्या पातळीवर पोहोचण्याचा प्रयत्न आपल्या सगळ्यांना करावा लागेल. ते करण्यासाठी वेळ घालवणे, हीच खऱ्या अर्थाने गरज आहे.

आज तुम्ही या ठिकाणी ८० लाखांचा धनादेश दिला. मी रक्कम वापरावी, हा निकाल घेतला. प्रांताध्यक्षांनी आताच मला सांगितले, ही रक्कम आपण फिक्स डिपाझिट ठेवू आणि त्यातील एक लाखातील 50 हजार रुपये रक्कम ट्रस्टमध्येच ठेवायची आणि 50 हजार रुपये रक्कम ज्या मुलाच्या वडिलांनी आत्महत्या केली, त्याच्या आईच्या नावाने त्या त्या जिल्ह्यातील बँकेमध्ये फिक्स डिपॉझीट ठेवायची, आणि त्याच्या व्याजातून त्याचे शिक्षण व्हावे, ही कल्पना आहे. ही 50 हजारांची रक्कम फार नाही, पण त्यांनी हा जो कोष करण्याचा निर्णय घेतला आहे, त्याच्यात जशा पद्धतीने रक्कम वाढले, त्यातून या मुलांना अधिकची मदत करण्याची



**राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष खासदार शरद पवार यांचा ८० वा वाढदिवस १२ डिसेंबर २०१९ रोजी मुंबईतील यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानमध्ये साजरा करण्यात आला. याप्रसंगी राष्ट्रवादीच्या महाराष्ट्रातील सर्व कार्यकर्ते व पदाधिकाऱ्यांनी संकलित केलेला ८० लाख रुपयांचा निधी राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांच्या हस्ते श्री. पवार यांना प्रदान करण्यात आला. हा निधी आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या मुलांच्या शिक्षणासाठी वापरण्याचे निश्चित झाले असून, त्याकरिता श्रीमती शारदाबाई पवार यांच्या नावाने शिष्यवृत्ती योजना जाहीर करण्यात आली आहे. याप्रसंगी व्यासपीठावर पोपटराव गावडे, नवाब मलिक, दिलीप वळसे पाटील, धनंजय मुंडे, सुनील तटकरे, श्रीनिवास पाटील, सुभाष देसाई, छगन भुजबळ, प्रफुल पटेल, अजित पवार, रामराजे नाईक निंबाळकर, फौजिया खान, हसन मुश्रीफ व इतर मान्यवर.**

चौकशी केली, महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यातील कार्यकर्त्यांनी हा धनादेश उभा केला. प्रफुल्लभाईंनी त्यात आणखी भर घातली. आता याचे काय करायचे, तर आपला राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने राष्ट्रवादी वेल्फेअर नावाचा एक ट्रस्ट आहे, ती रक्कम त्या ठिकाणी घातली जाईल, आणि ज्या कुटुंबातल्या कुटुंबप्रमुखाने नापिकीमुळे, दुष्काळामुळे, कर्जामुळे आत्महत्या केली, आणि ते कुटुंब उघडे पडले, त्या कुटुंबातील मुलांच्या शिक्षणासाठी ही भूमिका घेतली जाईल. त्यामुळे हा सगळा पैसा आपण ज्या बळीराजाचे स्मरण केले, तो उद्ध्वस्त झालेला बळीराजा, त्याची निदान पुढची पिढी सज्ञान व्हावी, आत्मविश्वासाने उभी राहावी आणि स्वतःची शेती, स्वतःचे कुटुंब सन्मानाने चालविण्यासाठी सुदृढ व्हावी, यासाठीच या कोषाचा वापर केला जाईल. यासाठी आपण सर्वांनी हातभार लावला, त्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करतो.

◆

# पवारसाहेबांच्या दूरदृष्टी व अनुभवाची देशाला, महाराष्ट्राला गरज...

## प्रफुल पटेल यांचे उद्‌गार



पवारसाहेब आणि आम्ही काल राज्यसभेत होतो. आपल्या सगळ्यांना माहिती आहे की, नागरिकता संशोधन विधेयकासंबंधी अत्यंत महत्वपूर्व चर्चा होती आणि मतदान झाले. सलग साडेनऊ तास राज्यसभेचे कामकाज चालले. पवारसाहेब बारा वाजल्यापासून साडेनऊ वाजेपर्यत पार्लमेंटमध्ये होते. त्यानंतर रात्री बारा वाजता मला विमानतळाच्या लाऊन्जमध्ये पवारसाहेब दिसले. ते जे फ्लाईट घेणार होते, ती उशीरा झाली. जवळपास तीन सव्वातीन वाजता लँड झाले असेल. चार वाजता पहाटे घरी पोहचले असतील. आणि आता पहा त्यांचा चेहरा. काही दिसतंय का त्यांच्या चेहऱ्यावर. कुठे थकल्यासारखे वाटतात का. माझं आणि तुमचेही निरीक्षण असेल की, साहेब तुम्ही 70 वर्षांचे असताना तुमचे जेवढे वजन आणि तब्येत होती, तेवढीच आजही आहे. उलट तेव्हापेक्षा जास्त उस्फूर्त झालात. आणि म्हणून कोणी काळजी करू नका. कारण, जेव्हा आपण नव्वदी साजरी करू, त्यावेळी याच्यापेक्षा जास्त जवान असणार.

सगळ्यांना माहिती आहे की, 10- 15 वर्षांपूर्वी आजारपणाचा ज्या पद्धतीने साहेबांनी मुकाबला केला. 2004 साली दिल्लीचे सरकार स्थापन झाले, त्यावेळी आम्ही लोकसभेत होतो. त्याच्या चार- सहा महिने आधी साहेबांना जो त्रास होता, त्याचे निदान झाले. आणि त्या आजारपणात साहेबांनी सर्जरी झालेली असताना, एक नाही तर दोन सर्जरी झाल्या होत्या. पण तरीही त्यांनी निवडणुकीमध्ये प्रचाराची धुरा सांभाळली होती. आम्हाला आश्चर्य वाटायचे. नंतर कृषी मंत्री झाले. लोकसभेचे सुरवातीचे सेशन होते. साहेबांचे रेडिएशन चालू होते. तुम्हाला सगळ्यांना रेडिएशनचा परिणाम माहिती आहे. साहेब सकाळी नऊ वाजता एम्स हॉस्पिटलला जायचे. आणि एक तासानंतर ते पार्लमेंटमध्ये दिसायचे. दुसरा माणूस रेडिएशन झाल्यावर खाटेवर झोपल्याशिवाय तुम्हाला दिसणार नाही. पण शरद पवारसाहेब एक तासानंतर पार्लमेंटमध्ये दिसायचे. प्रश्नकाळात ते उत्तर द्यायचे. कधी कधी एका बाजूला रक्त सांडायचे, पण त्यांनी कधीही हिंमत कमी होऊ दिली नाही. आणि म्हणून हा आपला असा जाणता राजा नेता आहे.

तुम्ही संसदेच्या सेंट्रल हॉलचे दृश्य पहा, जिथे शरद पवारसाहेब बसलेले असतील तिथे, जसं चुंबक असते,



त्याच्याभोवती सगळे जमा होतात. तसं देशाचा मोठा नेता सेंट्रल हॉलमध्ये बसलले असतात, तसं शरद पवारसाहेब जिथे बसलेले असतात तिथे सगळे जमा होतात. पत्रकार असो, नेते असो, नमस्कार करण्याची सगळ्यांची इच्छा असते. हे असं का आहे. आपण खरं तर भाग्यवान आहोत. महाराष्ट्राची लोक तर भाग्यवान आहोत. राष्ट्रवादीची लोकंही भाग्यवान आहोत. पण आज देशामध्ये लोकं जेव्हा शरद पवारांचा उल्लेख करतात, ते म्हणतात आज एक माणूस असा आहे की, जो देशाला दिशा आणि नेतृत्व देऊ शकतो. जेव्हा अशी आम्हाला लोकांकडून रिॲक्शन मिळते, तेव्हा आम्हाला वाटते की, महाराष्ट्राने अजूनही पवारसाहेबांसोबत योग्य न्याय केलेला नाही.

आज आपण सगळे या विधानसभेच्या निवडणुकीची एवढी चर्चा करतो, स्तुती करतो. अतिशय चांगली बाब आहे, समाधान आहे. आपल्या पक्षातील अनेक ज्येष्ठ नेते इतर पक्षात गेले. त्यावेळी 370 कलम लागू झाले होते. या पार्श्वभूमीवर त्यावेळी महाराष्ट्राच्या विधानसभेची निवडणूक लागली. आणि आपल्या सगळ्यांमध्ये एक निराशेचे वातावरण होते आणि सगळे लोक हादरलेले होते. कसं जाणार आम्ही, काय म्हणणार. मत मिळणार की नाही. पण, आम्ही जेव्हा जेव्हा पवारसाहेबांशी बोलायचो, ते म्हणायचे, असो. आहे ते आहे, जी परिस्थिती आहे, तिचा मुकाबला तर करावा लागणार आहे. काही घरी बसून रडून काही आपल्याला चालणार नाही. आणि म्हणून त्यांनी मैदानात एक सुरुवात केली. त्यांनी महाराष्ट्र पिंजून काढला आणि त्यांनी एक हिंमत दाखवली. कुठलाही मुकाबला असो, ते त्यात कधी मागे गेले नाहीत. पाऊस असो, पक्षातील संकट होते. पैसे नव्हते. कार्यकर्ते खचले होते. ही सगळी हिंमत वाढविण्याचे काम आणि आपल्या सर्वांना दिशा देण्याचे काम पवारसाहेबांनी केले.

पण, मला आपल्या सर्वांना सांगायचे आहे की, आपल्याला जर पवारसाहेबांना खरा सन्मान द्यायची इच्छा असेल, आणि या महाराष्ट्रासाठी पवारसाहेबांनी काय कमी केले आहे का? एका दीड- दोन मिनीटाच्या फिल्ममध्ये त्यांची कारकीर्द आपण पाहू शकत नाही, एवढा त्यांचा व्याप आहे. आज या वयामध्ये असा कोण आहे का, एवढ्या क्षेत्रामध्ये इंटरेस्ट घेणारा. तुम्ही शरद पवारांशी बायो टेक्नॉलॉजीची चर्चा करा. त्यांच्याकडे उत्तर



**राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष खासदार शरद पवार यांचा ८० वा वाढदिवस १२ डिसेंबर २०१९ रोजी मुंबईतील यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानमध्ये साजरा करण्यात आला. याप्रसंगी पवारसाहेबांना कार्यकर्त्यांच्या वतीने चांदीची गदा भेट देण्यात आली.**

असेल. त्यांच्यासोबत आर्टीफिशअल इंटिलिजन्सची चर्चा करा. त्यांच्याकडे उत्तर असेल. त्यांचा नक्की अभ्यास असणार आहे. कोणतेही असो, व्यवसायिक असो, शेतीचा तर त्यांना आहेच. पण, तुम्हाला जर त्यांच्या कोणत्याही क्षेत्रातील अभ्यासाचा अंदाज लावायचा असेल, तर तुम्ही जरा त्यांच्याकडे जा आणि बसा, त्यांच्याशी दुसऱ्या कोणत्याही क्षेत्राशी चर्चा करा. मग तुम्हाला कळेल की, या व्यक्तीच्या मनामध्ये नवीन तंत्रज्ञान, नवीन ज्ञान प्राप्त करण्यासाठी त्यांच्या मनामध्ये किती इच्छा आणि तळमळ आहे.

मित्रांनो, अशा नेत्याबरोबर माझा 40 वर्षांचा प्रवास आहे. त्यामुळे साहेबांचे आम्हाला अपार ज्ञान, आशीर्वाद आणि चांगले काम कसे करायचे. मी केंद्रात त्यांच्या बरोबर 10 वर्षे  मंत्रीमंडळात होतो. सगळ्या पक्षाचे मंत्री आपल्या नेत्याकडे गेल्याशिवाय कुठलाही महत्वाचा निर्णय करत नव्हते. पण पवारसाहेबांनी नवीन फळीला जशी महाराष्ट्रात संधी दिली. दादा असो, जयंतराव असो, आर. आर. असो, दिलीपराव





महाराष्ट्राला, राष्ट्रवादी काँग्रेसला आणि आम्हाला वर्षानुवर्षे गरज आहे.

तुम्हाला माहिती आहे की, जेव्हा साहेबांची एकसष्ठी साजरी केली, त्यावेळी देशाचे पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी स्वतः आले होते मुंबईला. अनेक देशांचे मोठमोठे मान्यवर आले होते. साहेबांची पंच्याहत्तरी आम्ही दिल्लीत साजरी केली होती. तो अप्रतिम सोहळा होता. देशातील कोणत्याही राजकारण्याचा असा वाढदिवस साजरा झाला नसेल. देशाचे एकूण एक नेते हजर होते. पंतप्रधान, राष्ट्रपती आणि सर्व राजकीय पक्ष की, ज्यांची कधी सोबत बसायची तयारी नसायची. असे सर्व बडे नेते मंचावर एकत्र तुम्हाला दिसले. ते फक्त आणि फक्त पवारसाहेबांसाठी दिसले.

पवारसाहेब तुम्ही आशीर्वाद, स्नेह एक परिवारतील सदस्य म्हणून नेहमी दिलेले आहे. जे स्थान मला तुमच्या जीवनामध्ये आणि तुमच्या मनामध्ये मिळालेले आहे, ते माझ्यासाठी अतिशय मोलाचे आहे. मी त्याचे शब्दामध्ये वर्णन करू शकत नाही. पण, असेच तुमचे प्रेम आणि आशीर्वाद मला आणि सगळ्यांना, इथं बसलेले आणि बाहेर असलेल्या लाखो- करोडो तुमच्या चाहत्यांना प्रेम आणि स्नेह लाभो, तुम्हाला दीर्घायुष्य लाभो आणि तुमचा अनुभवाचा महाराष्ट्र आणि देशाला लाभ एक उद्याच्या चांगल्या भविष्यासाठी मिळत राहो, हीच ईश्वर चरणी प्रार्थना करतो.

◆

**राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष खासदार शरद पवार यांचा ८० वा वाढदिवस १२ डिसेंबर २०१९ रोजी मुंबईतील यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानमध्ये साजरा करण्यात आला. याप्रसंगी ना. दिलीप वळसे पाटील व त्यांच्या कन्या पूर्वा पाटील या साहेबांना पुष्पगुच्छ देताना.**





तुम्हा- आम्हा सर्वांसाठी 12 डिसेंबर हा नेहमीच वेगळा दिवस आहे. आजच्या 12 डिसेंबरला एक वेगळे महत्व निर्माण झालेले आहे, असं मला वाटतं. छत्रपती शिवाजी महाराजांच्या विचारांनी चालणारा आमचा हा महाराष्ट्र, छत्रपती शिवाजी महाराजांनी दिल्लीला स्वाभिमान काय असतो, हे या जगात पहिल्यांदा दाखवून दिले आणि त्यानंतर दिल्लीला महाराष्ट्राचा स्वाभिमान कसा असतो, हे दाखवून देण्याचे काम आदरणीय पवारसाहेबांच्या माध्यमातून घडलं. आणि म्हणून राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या महाराष्ट्रातील तमाम कार्यकर्त्यांच्या वतीने मी महाराष्ट्र प्रदेश राष्ट्रवादी काँग्रेसचा अध्यक्ष म्हणून पवारसाहेबांना मनःपूर्वक शुभेच्छा देतो.

आज पवारसाहेब 80व्या वर्षांत पदार्पण करत आहेत. या कालखंडाचे वर्णन करणे, तसं अवघड आहे. एखादी आकाशगंगा फिरत असते. तिचा तळ कधी सापडत नाही. तसं आदरणीय पवारसाहेबांच्या जीवनाचा तळ सापडणे अवघड आहे. एवढ्या विविध गोष्टी आणि कामे आणि महाराष्ट्र आणि भारत घडविण्याचे काम आदरणीय पवारसाहेबांच्या माध्यमातून घडले आहे. प्रत्येकाच्या दृष्टीने पवारसाहेब वेगळे दिसू शकतात आणि अधिक उंच दिसू शकतात आणि प्रत्येकाला त्यांचे वर्णन वेगवेगळ्या पद्धतीने करता येईल.

महाराष्ट्राच्या राजकारणामध्ये 1999 मध्ये बरीच स्थित्यंतरे घडली. माझ्यासारख्या युवकांनी पवारसाहेबांच्या मागे उभी राहण्याची भूमिका स्वीकारल्यानंतर तेव्हाच्या तरुण पिढीला संधी देण्याची भूमिका पवारसाहेबांनी स्वीकारली. 1999 साली आर. आर. आबा, ते आज आपल्यात नाहीत. आर. आर. आबा असतील, अजितदादा, दिलीपराव वळसे पाटील, अनिल देशमुख, तेव्हाच्या 35-40 च्या तरुणांना साहेबांनी महाराष्ट्राच्या मंत्रीमंडळात काम करण्याची संधी दिली. 1999 नंतर आता 20 वर्षांचा कालखंड उलटलेला आहे. 20 वर्षांपूर्वी साठीत असणारे पवारसाहेब आज 80व्या वर्षांत पदार्पण करत आहेत. त्यावेळी देखील नवीन पिढीला उभे करण्याचे काम ते आजही पवारसाहेब करत आहेत. मला वाटतंय की, आजही देशातील कुठल्याही नेत्याकडून नव्या पिढीला पुन्हा पुन्हा घडविण्याचे काम आपापल्या प्रदेशात दुसऱ्या कोणी केले असेल.

आज जो आधुनिक महाराष्ट्र उभा आहे. मागच्या 50- 55 वर्षांच्या कालखंडामध्ये पवारसाहेब महाराष्ट्राचे गृह राज्यमंत्री झाले. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री झाले. महाराष्ट्राच्या विधानसभेत, विधान परिषदेत आणि दिल्लीतही विरोधी पक्षनेता म्हणून आणि

# महाराष्ट्राचा स्वाभिमान दिल्लीला पवारसाहेबांनी दाखविला

## जयंत पाटील यांचे उद्गार

**महाराष्ट्रातील सर्वसामान्य कार्यकर्ता पवारसाहेबांच्या मागे उभा राहिला. शून्यातून जग कसे निर्माण करायचे असते. पवारसाहेब नेहमी सांगायचे, कितीही निघून गेले तरी मी विधानसभेचे तेवढेच सदस्य पुन्हा निवडून आणू शकतो. ते एकदा नाही, दोनदा नाही, तीनदा पवारसाहेबांनी महाराष्ट्रात करून दाखवले. असा हा अलौकिक नेता. जेव्हा 20-40 आमदार निवडून येतील, अशी हेटाळणा माध्यमांच्या माध्यमातून लोक करत होते, त्यावेळी बाहेर पडल्यानंतर दोन्ही काँग्रेसच्या 98 जागा निवडून आल्या. त्याचे सर्व श्रेय पवारसाहेबांनी घेतलेल्या परिश्रमाला जाते.**

मंत्री म्हणून साहेबांनी काम केले. वेगवेगळ्या ठिकाणी माणसाने काम कसं करायचं असतं. महाराष्ट्राच्या विधानसभेत आजही त्यांची आठवण काढली जाते. विधान परिषदेत त्यांनी विरोधी पक्षनेता म्हणून केलेले काम आजही आठवतं. दिल्लीमध्ये लोकसभेत विरोधी पक्षनेता म्हणून केलेले काम असेल, आणि या देशात कृषिमंत्री म्हणून केलेले काम असेल. या सगळ्यावेळी पवारसाहेबांनी आपला वेगळा ठसा उमटविण्याचे काम केले.

मराठवाडा विद्यापीठाचे नामांतर झाले, कदाचित काही लोकांना ते मान्य नव्हते. पण पवारसाहेबांनी रेटून तो निर्णय घेतला. तसेच, महिलांना संपत्तीत वाटा देण्याचा कायदा पवारसाहेबांनी केला. भारतात अन्नधान्याचे विक्रमी उत्पन्न करण्यासाठी अथक परिश्रम घेतले, पवारसाहेबांनी ज्यावेळी कृषिमंत्री पदाची शपथ घेतली, त्यावेळी भारतात अन्नधान्य आयात करावे लागेल, अशा स्वरूपाची फाईल त्यांच्याकडे आली. पण, 10 वर्षांच्या कालखंडामध्ये पवारसाहेबांनी भारताला अन्नधान्याबाबत स्वयंपूर्ण केले, शेजारपाजारच्या देशात अन्नधान्य निर्यात करणारा आपला देश ठरला. विक्रमी उत्पादन भारतातील शेतकऱ्यांनी पवारसाहेबांच्या धोरणामुळे केले. आजही देशामध्ये अनेक जण कर्जमाफीची भाषा करतात. पण, भारतातल्या सर्वसामान्य शेतकऱ्याला जर काही लक्षात राहिले असेल, तर या देशात पवारसाहेबांनी शेतकऱ्यांनी जी ऐतिहासिक कर्जमाफी दिली, त्या 71 हजार कोटींच्या कर्जमाफीबद्दल भारताच्या कानाकोपऱ्यात आजही पवारसाहेबांचे स्मरण केले जाते.

जेव्हा जेव्हा पवारसाहेबांनी काम केले, तेव्हा तेव्हा इतिहासाला कलाटणी देण्याचे काम केले. त्यामुळे आम्ही सर्व पवारसाहेबांना इतिहास पुरुष म्हणून सुद्धा ओळखतो. कारण, जेव्हा जेव्हा त्यांना संधी मिळाली, तेव्हा तेव्हा त्यांनी ऐतिहासिक काम केले आहे.

रामनाथ गोएंका हे देशातील सुप्रसिद्ध इंडियन एक्सप्रेस ग्रुपचे प्रमुख होते. त्यांनी तरुण असताना पवारसाहेबांना भेटल्यानंतर डायरीत लिहून ठेवले की, मला या तरुणाशी आयुष्यात कायम मैत्री ठेवण्याची इच्छा आहे. आयबीचे एक रिटायर्ड झालेले बी. रमन नावाचे एक संचालक होते. त्यांनी मुंबईत बॉम्बस्फोट झाल्यानंतर पवारसाहेबांनी किती तातडीने मुंबईतील व्यवस्था शांत केली आणि पुन्हा 24 तासांनंतर मुंबई कशी कामाला लावली, याचं चित्रण आपल्या आत्मचरित्रात केले आहे. बॉम्बस्फोट झाल्यानंतर पवारसाहेबांनी मुंबईची व्यवस्था ठिक केल्यामुळे मुंबईचे, महाराष्ट्राचे आणि देशाचे नाव



चांगले झाले.

जगाच्या पाठिवर अशा अनेक घटना आहेत. भारताच्या पाठिवर अशा अनेक घटना आहेत की ज्यामध्ये पवारसाहेबांनी सामान्य माणसाच्या जीवनामध्ये बदल करण्याचा यशस्वी प्रयत्न केला. म्हणून आम्ही सर्वांसाठी कर्तृत्व, दातृत्व आणि नेतृत्व म्हणजे शरद पवारसाहेब आहेत, असं आम्ही समजतो. अनेक पक्षातले कार्यकर्ते आम्हाला बऱ्याच वेळा विचारतात. मध्ये तर तुमच्या वीस जागा तरी येतील की नाही, अशी चर्चा होती. दोन्ही कॉंग्रेसच्या मिळून 40 तरी जागा येतील का, अशी शंका बाळगत होते. पण, जेव्हा पवारसाहेबांनी घोषणा केली की, मी आता सगळ्यांना निरोप देऊन घरातून बाहेर पडलेलो आहे. आणि ही कामगिरी फत्ते केल्याशिवाय परत येणार नाही, त्यावेळी महाराष्ट्रातील सर्वसामान्य कार्यकर्ता पवारसाहेबांच्या मागे उभा राहिला. शून्यातून जग कसे निर्माण करायचे असते. पवारसाहेब नेहमी सांगायचे, कितीही निघून गेले तरी मी विधानसभेचे तेवढेच सदस्य पुन्हा निवडून आणू शकतो. ते एकदा नाही, दोनदा नाही, तीनदा पवारसाहेबांनी महाराष्ट्रात करून दाखवले. असा हा अलौकिक नेता. जेव्हा 20-40 आमदार निवडून येतील, अशी हेटाळणा माध्यमांच्या माध्यमातून लोक करत होते, त्यावेळी बाहेर पडल्यानंतर दोन्ही कॉंग्रेसच्या 98 जागा निवडून आल्या. त्याचे सर्व श्रेय पवारसाहेबांनी घेतलेल्या परिश्रमाला जाते. दुसऱ्या कोणालाही जात नाही. म्हणून पवारसाहेबांना महाराष्ट्रात आणि देशात मान आहे, तो पवारसाहेब काहीही करू शकतात, कोणतीही परिस्थिती बदलू शकतात आणि कोणत्याही



परिस्थितीवर मात करण्याचा दुर्दम्य आत्मविश्वास या नेत्यामध्ये आहे. हाच आम्हा सर्वांसमोर आदर्श आहे.

मला काही वर्षांपूर्वी एकाने विचारले की, तुमची पुढची परिस्थिती अवघड आहे. कारण, भाजप सत्तेत होते. मी त्यांना सांगितले की, तुम्ही काही चिंता करू नका. आज काही लोकं कदाचित पक्ष सोडून जात असतील. पण, आमच्याकडे शरद पवार यांच्यासारखं एक विद्यापीठ आहे. त्यामुळे तुम्ही काही चिंता करू नका. आणि माझ्यासारख्या कार्यकर्त्याला हा मनापासून आनंद आहे. 1984 साली माझ्या वडिलांचे निधन झाल्यानंतर पाहत आलो. मला स्वतःला समाधान आहे. आज अनेक जण वेगवेगळ्या मोठ्या पक्षात असतील, पण मी अशा पक्षात आहे की, ज्या पक्षाचा नेता राजकारण कसं करावं, हे शिकवणारा एक विद्यापीठ आहे. त्या विद्यापीठात मी आहे, याचा मलाच नाही तर महाराष्ट्रातील तमाम लाखो कार्यकर्त्यांना आनंद आणि अभिमान असेल.

आज पवारसाहेबांचा 80 वा वाढदिवस आहे. आम्ही सर्वांना आग्रह केला. पण पवारसाहेबांनी सांगितले की, कोणत्याही प्रकारे वाढदिवस साजरा करायचा नाही. त्याचे



**राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष खासदार शरद पवार यांचा ८० वा वाढदिवस १२ डिसेंबर २०१९ रोजी मुंबईतील यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानमध्ये साजरा करण्यात आला. याप्रसंगी अंध मुलींनी पवारसाहेबांना औक्षण करून पुष्पगुच्छ भेट म्हणून दिला.**

वेगवेगळ्या कारणांनी मला पवारसाहेबांच्या जवळ जाण्याची संधी मिळाली. त्यांनी मला अत्यंत जिव्हाळ्यानी सांभाळले. पक्ष स्थापन झाल्यानंतर त्यांनी मला सांगितले की, तुझ्या वडिलांनी एकदा पक्ष बदलल्यानंतर आमच्या भागात काही प्रश्न तयार झालेले. त्यामुळे मी थोडासा हो नाही हो करत होतो. त्यावेळी पवारसाहेब म्हणाले, मी तुला मुलासारखा वागवेन, तु काही चिंता करू नकोस. हा दिलेला शब्द आणि माझ्या जीवनातील सगळे प्रश्न यामध्ये आम्ही त्यांच्याकडे नेहमी वडील म्हणून सगळ्यात मोठे कारण की, अवकाळी पावसामुळे महाराष्ट्रातील, विदर्भ असेल, मराठवाडा असेल, खानदेशात असेल, पश्चिम महाराष्ट्रात असेल, कोकणात असेल, या भागातील संकटात आलेला आमचा सामान्य शेतकरी. पुराचा तडाखा बसलेला सातारा, सांगली, कोल्हापूर भागातील शेतकरी. महाराष्ट्राच्या दुष्काळात अडकलेला तीन- तीन चार- चार वर्षे तोंड दिलेला शेतकरी. त्यांच्या समस्या सोडवायच्या आहेत. हे सगळे संकटात असताना मी वाढदिवस करणार नाही. अशी त्यांची भूमिका

होती. त्यामुळे आम्ही त्यांना सांगितले की, वाढदिवस करायचा नाही, तर काही हरकत नाही. पण, त्या बळीराजासाठी ज्याला उभा करण्यासाठी तुम्ही आयुष्यभर प्रयत्न केले. तो संकटात असताना त्याला मदत करण्याची योजना आम्ही पक्ष म्हणून काढतोय, आपण त्याला परवानगी द्या आणि मला आनंद आहे की, आदरणीय साहेबांनी त्याला होकार दिला. आणि आज आपण महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यातील कार्यकर्त्यांच्या वतीने हा बळीराजा कृतज्ञता दिन म्हणून साजरा करण्याचे ठरवले आहे. त्यामुळे आज बळीराजा कृतज्ञता दिनी बळीराजा कृतज्ञता निधी महाराष्ट्रातील सर्व लहान मोठ्या कार्यकर्त्यांनी, युवकांनी, महिलांनी पक्षाच्या सर्व संघटनांच्या कार्यकर्त्यांनी गोळा करण्याचा प्रयत्न केला. सात- आठ दिवसांपूर्वी आमचं टार्गेट ८० लाखांचे होते. मला अजितदादा म्हणाले की, हे ८० लाखाचे काही बरोबर नाही. हे वाढले पाहिजे. मी त्यांना सांगितले की, हे वाढत जाईल. पण, हे ८० लाखांचे टार्गेट आज सकाळी पूर्ण झाल्याचे सांगायला कशी करायची, याची चिंता पवारसाहेबांना सतत असते. हा निधी आज ८० लाखांपर्यंत पोचला आहे. आज साहेब ८० व्या वर्षात पदार्पण करत आहेत. म्हणून आम्ही त्याचे टार्गेट ८० लाख ठेवले होते. पण, अजूनही लोकं मदत करतायेत. त्याच्यात संख्या वाढेल. आकडा वाढेल. यात माझ्या मनात कोणतीही शंका नाही. हा अव्याहतपणे गोळा केलेला निधी महाराष्ट्रातील आत्महत्याग्रस्त कुटुंबातील विद्यार्थ्यांसाठी करायचा आहे. म्हणून आम्ही आज ८० लाख रुपये, प्रत्येक विद्यार्थी 50 हजार रुपये, जो त्या घरातील शिक्षण घेणारा विद्यार्थी आहे. त्याच्या नावाने फिक्स डिपॉझीट ठेवण्याचे काम आपण आतापासून करणार आहोत. जशी रक्कम वाढत जाईल, तशी ही संख्या वाढेल. यात माझ्या मनात शंका नाही. पण, आदरणीय पवारसाहेबांच्या माध्यमातून, पवारसाहेबांच्या वाढदिवशी बळीराजा कृतज्ञता निधी जो जमा झालेला आहे आणि जी सुरवात झालेली आहे, त्यात आपण महाराष्ट्रातील प्रत्येक कुटुंबात सगळीकडे आपण



मला मनापासून आनंद वाटत आहे.

महाराष्ट्रातील जो बळीराजा संकटात आहे. ज्याच्या घरात आत्महत्या झालेल्या आहेत. ज्या घरातील कर्त्या पुरुषाने आत्महत्या केल्यानंतर त्याच्या घरातील मुलांच्या शिक्षणाचे काय, ही आपल्या सर्वासमोर एक मोठी समस्या असते. आपण शेतकऱ्याच्या घरी आत्महत्या झाल्यानंतर दुःख व्यक्त करतो. पण पुन्हा त्या घरात येणाऱ्या प्रश्नांचे काय, त्याची सोडवणूक पोहोचू शकणार नाही. पण, जिथे शक्य आहे आणि ज्यांची अतिशय गंभीर अवस्था आहे, ज्या कुटुंबाला आधार देण्याची गरज आहे. अशा कुटुंबातील मुलांना शिक्षणासाठी हे 50 हजार रुपये फिक्स डिपॉझिट हजारो कुटुंबात ठेवण्याचे काम आपण हळूहळू करणार आहोत. त्याची सुरवात आज करत आहोत. यासाठी मी आदरणीय पवारसाहेबांचे मनःपूर्वक आभार मानतो.

# साहेबांमुळेच माझा राजकीय पुनर्जन्म



## छगन भुजबळ यांचे उद्गार

आपण चित्रफितीत पाहिले की, 79 वर्षांपूर्वी माता शारदाबाई आणि गोविंदराव पवार यांना पुत्ररत्नाचा लाभ झाला. संपूर्ण घरामध्ये महात्मा फुल्यांच्या सत्यशोधक समाजाच्या रितीने चालणारे होते. आई शारदामाता त्यावेळी लोकल बोर्डाच्या सदस्या होत्या. आणि अवघ्या तीन- चार दिवसांच्या बाळाला घेऊन त्या बोर्डाच्या मिटींगला हजर आणि त्या बाळाने तेव्हापासूनच सुरू केले की, लोकल बोर्ड काय असतं, समाजकारण काय असतं, राजकारण काय असतं, आणि तीन- चार दिवसांपासून शिक्षण मिळाले असेल तर आणखी काय पाहिजे. त्यांचे काम वाढत गेले. कॉलेज असेल, गोवा मुक्ती संग्राम असेल, अमुकतमुक असेल, मग त्याप्रमाणे शरद पवारसाहेब वेगवेगळ्या क्षेत्रात नाव कमावू लागले. अगदी आपल्या आजूबाजूच्या संस्था पाहिल्या तरी आपल्या लक्षात येईल की, त्यांचे कर्तृत्व काय आहे. येथून जवळच असलेल्या विधानसभेत तीन वेळा मुख्यमंत्री म्हणून शपथ घेऊन काम केले. यशवंतराव चव्हाणांनंतर उत्कृष्ट मुख्यमंत्री म्हणून कोणाचे नाव घेतले जाईल, तर ते पवारसाहेबांचे. आपण इथं बसलोय ते चव्हाण सेंटरचा पाया पवारसाहेबांनी घातला. आणि आज त्यातून अनेक सांस्कृतिक, सामाजिक कामे महाराष्ट्रात सुरू आहेत. पु. ल. देशपांडेपासून सर्वांचे वाङ्मयांचे सांभाळ करणे, महाराष्ट्रात त्याचा प्रचार करणे, केवढे मोठे काम करतायेत ते. म्हणजे तिथेही पवारसाहेब आहेत. जरा आणखी पुढे गेले की क्रिकेट सेंटर लागते. ते क्रिकेट सेंटरही पवारसाहेबांनी निर्माण केले. त्या क्षेत्रात ते गेले आणि जगातल्या क्रिकेटचे ते अध्यक्षच झाले. त्यावेळेच्या क्रिकेटपटूंना मिळणारे मानधन आणि आजचे क्रिकेटपटू आणि माजी क्रिकेटपटू यांचे जे जीवनमान सुधारले गेले आहे, ते पवारसाहेबांच्या कामामुळे झालेले आहे. आणखी पुढे गेले की, विज्ञानाला वाहिलेले नेहरू सेंटर. तिथेही पवारसाहेब प्रमुख स्थानी आणि लहान मुलांपासून मोठ्यांपर्यंत विज्ञानाची माहिती करून देणे, अशा अनेक अज्ञात गोष्टी आहेत की, पवारसाहेब जिथे काम करतात. आणखी पुढे माहीमला गेले की, यशवंत नाट्यगृह आहे. नाट्य क्षेत्रातही पवारसाहेब आहेत. या क्षेत्रातील लोकांना पुढे आणण्यामध्येही पवारसाहेबांचे कर्तृत्व आहे.

फक्त क्रिकेटचे नाही तर कुस्ती फेडरेशनचे अध्यक्ष. कबड्डी महाराष्ट्रात नाही, देशात, परदेशात बुवा साळवींच्या माध्यमातून नेण्याचे काम पवारसाहेबांनी केले आहे. हे आपण विसरता कामा नये. आज कबड्डीला चांगले दिवस आले आहेत. त्याची पायाभरणी पवारसाहेबांनी केली आहे. पुण्याला गेल्यावर वसंतदादा इन्स्टिट्यूट आहे. शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर मुळापासून अभ्यास करायचा आहे आणि ते सोडवायचे आहेत. तिथेसुद्धा पवारसाहेबांचे कर्तृत्व. शिक्षणामध्येही विद्या प्रतिष्ठानपासून महाराष्ट्रातील एक प्रमुख शिक्षण संस्था असलेल्या रयत शिक्षण



संस्थेच्या प्रमुखपदावर पवारसाहेब आहेत. तिथे आज कर्मवीर भाऊराव पाटलांसारखे गोरगरिबांना शिक्षण देण्याचे काम करत आहेत. एक नाही, दोन नाही सगळ्या ठिकाणी त्यांचा वावर आहे.

मला आठवतंय की, एक घाशिराम कोतवाल नावाचे नाटक आले होते. त्यावेळी मी शिवसेनेत होतो. त्या नाटकाला आमचा विरोध होता. त्या नाटकातील सर्व मंडळींना परदेशात जायचे होते. आणि आम्ही शिवसेनेने ठरवले की, यांना जाऊन द्यायचे नाही. ही मंडळी पुण्यावरून येणार होती. आम्ही मंडळी बोगद्यावर इकडे तिकडे उभे राहिलो. आता येतील मंडळी, मग येतील मंडळी, त्यांना आडवायचे, जाऊन द्यायचे नाही एअरपोर्टवर. जाऊन द्यायचे नाही यांना. पण आम्हाला कल्पनाच नाही. पवारसाहेबांनी तिकडेच पुण्यात त्या मंडळींना गोळा केले. खास विमान केले. मुंबईच्या विमानतळावर उतरवले. तिथे ते परदेशातल्या विमानात बसले आणि निघून गेले. आणि आम्ही तिकडे उन्हातान्हात बसलो. आता येतील, मग येतील आणि ते गेले तिकडे निघून.

काय काय सांगायचे. यांची मित्रमंडळी तरी काय. अगदी गोरगरिबांपासून अमेरिकेचे अध्यक्ष क्लिंटनही यांच्या घरी येणार.

**अगोदर ट्रक ड्रायव्हर असलेल्या आणि नंतर आपल्या कल्पकतेने व कर्तृत्वाने ट्रकची चासी, मग इंजिन आणि नंतर संपूर्ण ट्रक व त्यानंतर जहाज आणि कार बनविणाऱ्या दक्षिण कोरियातील हुंडाई कंपनीचे चेअरमन चाँग-से-यंग यांच्या हुंडाई मोटर्स या कंपनीला शरद पवार यांनी भेट दिली. पुण्याला येऊन श्री. यंग यांनी बजाज, टेल्को व वालचंदनगर या कारखान्यांनाही श्री. पवार यांच्या समवेत भेट दिली होती. बजाज आणि टेल्को या दोन्ही कंपन्या पाहिल्यानंतर त्यांनी जगातल्या कुठल्याही स्पर्धेत या कंपन्या टिकतील, असा आशावाद व्यक्त केला होता.**



मी एकले की, ती हुंडाई गाडी आहे, पवारसाहेब गेले होते. त्या कंपनीचा मालक एका गाडीवर ड्रायव्हर होता. ते आता मालक झाले आहेत. आता त्यांच्या प्रत्येक नवीन प्रॉडक्टचे पवारसाहेबांच्या हस्ते उद्घाटन होते. कोरियामध्ये. सगळ्या बाबतीमध्ये यांचा वावर आहे. साहित्य असेल, वाङ्मय असेल, सगळ्या बाबतीमध्ये पवारसाहेब आहेत.

उद्योगपती. त्यांच्याशीही यांचे चांगले संबंध. कशासाठी, तर त्यांनी या महाराष्ट्रामध्ये, देशामध्ये उद्योग काढावेत म्हणून. या महाराष्ट्रात आणि देशात जे 80 टक्के मोटार कारखाने आहेत, ते जर महाराष्ट्रात कोणी आणले असतील, तर ते पवारसाहेबांनीच आणले. हे तुम्हाला विसरता येणार नाही.

शेतकरी प्रश्नांवर तर त्यांचा लहानलहान गोष्टींवर अभ्यास असतो. बाकीच्या तर आपल्याला कल्पना आहेत. काही वर्षांपूर्वी तो गॅट करार आला. आम्हाला तर कळत नव्हता की, हा गॅट करार काय आहे. पवारसाहेबांनी त्याच्यावर तज्ज्ञ मंडळींची एक कमिटी नेमली. ती समजून घेतली आणि त्यानुसार त्यावर आपली मते मांडली. आणि त्या प्रस्तावावर ते चालत गेले आणि शेतकऱ्याला त्याच्या शेतीमालाबाबत कसं पुढं जाता येईल, याची संपूर्ण माहिती या गॅट कराराच्या माध्यमातून जाणून घेतली. असे अनेक प्रश्न आहेत की, आपल्याला वाटते की, जाऊदे आपल्याला न समजणारा प्रश्न आहे. त्यावेळी पवारसाहेबांना तो प्रश्न समजलेला असतो. त्याच्यावर ते इलाज करत असतात.

लातूरच्या भुकूंपाबद्दल मी काय सांगावे. आपल्या सगळ्यांना त्याची कल्पना आहे. डिझॉस्टर मॅनेजमेंटचे गुरुच त्यांना म्हटले पाहिजे. भूजला भुकंप झाला, त्यावेळी पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांनी कोणाची आठवण काढली असेल तर ती पवारसाहेबांची. आणि डिझॉस्टर मॅनेजमेंटचे काम त्यांच्यावर सोपावले. मुंबईत बॉम्बस्फोट झाले, त्यावेळी मी त्यांच्या मंत्रीमंडळात होतो. त्या बांबस्फोटात शेकडो लोकांचे प्राण गेले. पण, त्यानंतर हिंदू मुस्लीम दंगल उसळली पाहिजे, हा त्या मागचा उद्देश होता. मी पवारसाहेबांबरोबर होतो. पाहिले की, आता हे कसं व्हायचं. पवारसाहेबांनी त्यावेळी फार चॅनेल नव्हते, पण टीव्हीवाल्यांना बोलावले. मुख्यमंत्र्यांच्या कार्यालयात त्यांनी पत्रकार परिषद घेतली. आणि त्यांनी ज्या नऊ- दहा ठिकाणी बॉम्बस्फोट झाले, त्याच बरोबर ज्या ठिकाणी मुस्लीम वस्ती जास्त आहे, ते ठिकाणही सांगितले. तिथे बॉम्बस्फोट झालेले नव्हते. आता हे कशासाठी. तर पवारसाहेबांनी हे सांगितले की, हा देशावर परदेशाने केलेला हल्ला आहे. त्यामुळे आज हिंदू भाग असेल किंवा मुस्लीम भाग असेल, सगळीकडे बॉम्बस्फोट होत आहेत. दंगल तर झाली नाहीच, पण 48 तासांत तर हे दलाल



स्ट्रीटवरचे शेअर मार्केटपासून सगळ्या गोष्टी उभ्या राहिल्या. त्याचे कौतुक झाले. अमेरिकेत जेव्हा अशा घटना झाल्या, त्यावेळी महिने महिने शेअर मार्केट सुरू झाले नाही. पण, इथे 48 तासांत पवारसाहेबांनी ते सुरू केले.

संरक्षण खातंही त्यांनी सांभाळले. एकदा पाहिले की दोन जहाजं जात आहेत, आणि पवारसाहेब मध्ये धरून चालले आहेत. आपल्या जर सांगितले असते तर हृदयाचे ठोके वाढले असते. सटकंल बिटकलं तर. पण पवारसाहेब चालत होते. हा जो धीरोदत्तपणा आहे, तो पवारसाहेबांमध्ये आहे, तो विसरता येणार नाही. एकसष्ठी आपण साजरी केली, त्यावेळी पंतप्रधान असलेले अटलबिहारी वाजपेयी सहज म्हणून गेले, पवारजी आप इतने उंचाईपर गए हो, इसका कारण प्रतिभा आपके साथ है. आम्हाला आधी कळालेच नाही. नंतर कळाले की, वहिनींचे

सामाजिक न्यायाच्या बाबतीत मंडल कमिशन साहेबांनीच दिले. मराठवाडा विद्यापीठाला राज्य गेले तरी चालेल, पण डॉ. बाबासाहेबांचे नाव दिलेच पाहिजे, हा हट्ट त्यांनी पूर्ण केला.

आता या आजरपणाची गोष्ट काय सांगावी. 2004 ची गोष्ट मला आठवते. ॲडमिरल भागवत होते. अनेक प्रेस कॉन्फरन्स घ्यायचे. साहेब हॉस्पीटलमध्ये असायचे. आणि साहेब आले आणि प्रेस कॉन्फरन्सला सुरवात झाली. आणि अक्षरशः रक्ताचे ओघळ चाललेले होते. मला आठवतंय दोन- तीन दिवस झालेले असतील आणि त्यांनी ती पूर्ण प्रेस कॉन्फरन्स घेतली. आणि त्यानंतर त्यांनी तर कमाल केली. लोकसभेच्या प्रचारासाठी ते उन्हातान्हात फिरले. एवढं आजारपण असताना एवढं काम करणारा माणूस तुम्हाला राज्यात, देशात आणि जगात सापडणार नाही.


अरुणाचल प्रदेशातील हिमालयाच्या भागात सीमेवर कार्यरत असणाऱ्या जवानांशी संवाद साधताना संरक्षणमंत्री शरद पवार.

नाव प्रतिभा. म्हणजे वाजपेयीसाहेबांनीही तो शब्द अशा पद्धतीने वापरला की साहेबांची उन्नती आणि त्यांची साथ या दोन्ही गोष्टींचा वाजपेयीसाहेबांनी मेळ घातला.

पवारसाहेबांनी नेहमीच आपल्या सहकाऱ्यांना मदतीचा हात दिला. माझ्यावर ज्यावेळी हल्ला झाला, त्यावेळी विरोधी पक्षनेत्याचा बंगला साफ झाला. साहेब बेंगलोरला होते. खास विमान घेतले आणि इथं आले. हाताला धरून उठवले आणि म्हणाले, भुजबळ आपल्याला लढायचे आहे, घाबरायचे नाही. आता पण मी राजकारणातून उठतो की काय, अशी परिस्थिती असताना पवारसाहेबांनी परत एकदा राजकीय पुनर्जन्म छगन भुजबळचा घडवून आणला. आणखी काय पाहिजे.

आजही महाराष्ट्रात विकास आघाडीचे सरकार इथं स्थापन झाले आहे. अनेक प्रश्न आज विकास आघाडीसमोर आहेत. परंतु हे प्रश्न सोडविताना आम्हाला एकच आधार असतो, हे प्रश्न सोडविताना पवारसाहेबांचे मार्गदर्शन लाभणार आणि हे प्रश्न सोडविताना आम्हाला निश्चतपणाने यश मिळणार, हा आत्मविश्वास आमच्यामध्ये आहे.

हे असं व्यक्तीमत्व होणे, फार अवघड आहे. त्यांना परमेश्वराने शतायुषी करावं आणि त्या कार्यक्रमाला आम्ही पण यावं, आणि तुम्ही पण यावं, अशा शुभेच्छा त्यांना देऊयात. आणि त्यांची कार्य प्रतिभा अशीच वाढत जाऊदे, अशा शुभेच्छा देतो.



# साहेबांना कार्यकर्त्यांची पारख

## नवाब मलिक यांचे गौरवोद्गार

सुरवातीला मी आदरणीय पवारसाहेबांना जन्मदिवसाच्या हृदयापासून शुभेच्छा देतो आणि अशी भावना व्यक्त करतो की, आपली साथ पुढील काही दशके आमच्यासोबत राहो. मित्रांनो, जरी आपण पवारसाहेबांचा 80 वाढदिवस साजरा करत असलो तरी 80व्या वर्षात आपले नेते ज्या पद्धतीने उभे आहेत, ते देशातील सर्व नेते आणि कार्यकर्त्यांसाठी एक आदर्श आहेत. आपण त्यांचा वाढदिवस अशा वेळी साजरा करतोय की, ज्यावेळी देशात एक वेगळा संघर्ष उभा आहे. धर्माच्या नावावर, जातीच्या नावावर फूट पाडण्याचे एक मोठे षडयंत्र चालले आहे. खासकरून या देशातील जो अल्पसंख्याक आहे, त्याच्या मनात एक भीती आहे. मित्रांनो, मी तुम्हाला सांगू इच्छितो की, त्यांची भीती घालविण्याची जर ताकद कोणात आहे, तर ती आपले नेते आदरणीय शरद पवारसाहेबांमध्ये आहे.

पवारसाहेबांना एक घटना मी आठवण करून देतो की, 2002 मध्ये ईदचा दिवस होता आणि मला एक फोन आला की, पवारसाहेब तुमच्याशी बोलू इच्छितात. पवारसाहेब म्हणाले की, आज ईद आहे, ती तुम्ही साजरी करा, पण उद्या गुजरातच्या बडोद्याला या. साहेबांच्या आदेशानुसार मी बडोद्याला पोचलो. प्रफुलभाई तेथे होते. सनद मेहता होते. त्यांनी सांगितले की, गुजरातमध्ये निवडणुका होत आहेत. आणि तुम्हाला संपूर्ण गुजरातमध्ये प्रचारसभा घ्याव्या लागणार आहेत. पहिली सभा तुमची गोध्रामध्ये होईल. मला म्हणाले की, आम्हाला माहिती आहे की, आपण निवडणूक जिंकणार नाही. पण साहेब म्हणाले की, 2002 मध्ये गुजरातमध्ये मुस्लिम समाजाची जी अवस्था होती, त्यामुळे तुम्ही मुस्लिम समाजामध्ये जावा. निवडणुकीमध्ये कोणताही पक्ष मुस्लिम नेत्याला प्रचारासाठी बोलावत नाही. त्यामुळे आपली जबाबदारी आहे की तुम्ही त्या समाजात जाऊन प्रचार करा. त्यातून त्या समाजामध्ये असलेली एक भीती निघून जाईल. त्यानुसार साहेबांनी ती जबाबदारी माझ्यावर दिली. साहेबांच्या ह्दयात जी सल आहे की, जो दुःखी वर्ग आहे, जो उपेक्षित वर्ग त्याला आधार देण्याचे काम पवारसाहेबांच्या माध्यमातून आहे.

आज संपूर्ण देश पवारसाहेबांकडे आशेनेपाहत आहे. गेल्या सहा वर्षांपासून देशात ज्या पद्धतीचे राजकारण चालले आहे, त्यातून देशाची वाटणी केली जात आहे. गोळवलकरांची विचारधारा आपल्यावर मारली जात आहे. अशावेळी ज्या लोकांच्या मनात भीती आहे, ती दूर करण्याची जबाबदारी शाहू-फुले- आंबेडकरांच्या विचारधारेतून पवारसाहेबांनी घेतली आहे. ती जबाबदारी पूर्ण करण्याचे काम आम्ही येणाऱ्या दिवसात पूर्ण करणार आहोत.

पवारसाहेबांचे व्यक्तिमत्व बहुआयामी आहे. ते शेतकरी नेते आहेत. विकास त्यांना निश्चितपणाने करायचा आहे. कार्यकर्त्यांना जबाबदारी द्यायची, हा पवारसाहेबांचा गुण आहे. मी 75-76 मध्ये राजकारणात आलो. 78 मध्ये पवारसाहेब

राज्याचे मुख्यमंत्री होते. मी सर्व कार्यकर्त्यांना सांगू इच्छितो की, मी आयुष्यात पहिल्यांदा मंत्रालयात गेलो, त्यावेळी मुंबई युवक काँग्रेसचा सेक्रेटरी म्हणून काम पाहत होतो. मला जबाबदारी दिली गेली की, गरवारे क्लबमध्ये युवक काँग्रेसची मिटींग आहे, तिथे पवारसाहेबांना घेऊन यायचे. सहाव्या मजल्यावर मी पहिल्यांदा गेलो. साहेबांच्या कार्यालयात मी उभा होतो. साहेब निघाले. त्यांनी विचारले की, कोण आलंय युवक काँग्रेसकडून. मी म्हणालो, मी आलोय. त्यानंतर ते माझा हात पकडून मला लिफ्टमध्ये घेऊन गेले. तिथून गाडीत बसून आम्ही गरवारे क्लबला गेलो. तेव्हा माझ्या आत्मविश्वासात वाढ झाली. 96मध्ये मी आमदार झालो. 99मध्ये दुसऱ्यांदा झालो. पण, पक्ष वेगळा होता. पण, आघाडीमुळे पहिल्यांदा मंत्री करण्याचे काम पवारसाहेबांनी केले. कधी मंत्रीपदावरूनही हटवले. मला वाटले की आपल्यावर अन्याय होतोय, पण त्यानंतर ज्या पद्धताने माझ्यावर जबाबदारी सोपविण्यात आली, आज मी साहेबांचा सर्वात जास्त ऋणी आहे. त्यांनी मला प्रवक्तेपद देऊन माझी ओळख मुंबई, महाराष्ट्र आणि देशातच नाही तर संपूर्ण जगात नवाब मलिक कोण आहे, ही ओळख साहेबांनी करून दिली.




एक कार्यकर्ता म्हणून आमची जबाबदारी आहे की, एक जबाबदारीने आपण काम केले पाहिजे. कारण, आपल्या नेत्याची नजर आहे की, कोण कशासाठी लायक आहे. निश्चितपणे कार्यकर्त्यांची पारख करणारा कोण नेता असेल तर ते पवारसाहेब आहे. त्यामुळे आपली जबाबदारी आहे की, आपण इमानदारीने काम करावे.

आज साहेबांचा 80वा वाढदिवस आहे आणि शुभेच्छा देताना आशा करतो की, पूर्ण देशाचे राजकारण बदलत आहे. पूर्ण देशातील राजकीय नेते पवारसाहेबांकडे आशेने पाहत आहेत की, या देशात कोणी बदल करू शकत असतील तर आपले नेते पवारसाहेब आहेत. हे आपल्याला समजले पाहिजे. मी सर्व कार्यकर्त्यांच्या वतीने भावना व्यक्त करतो की, आपल्या जीवनातील हे आनंदाचे क्षण असेच वाढत राहो. आपण आम्हाला मार्गदर्शन करत राहो. जगात अनेक लोक आहेत की, जीवनात यशस्वी होतात. पण, त्यानंतर जुने दुःख उगळत बसतात. पण, पवारसाहेबांच्या जीवनात कोणतेही ध्येय नाही. त्यांचे ध्येय नेहमीच पुढे पुढे आहे. पवारसाहेब ज्या पद्धतीने काम करतात की, ते शेरमधून सांगतो,



**सन इन अंग्रेजोंकी चुभन का एहसास मुझे कहा. में तो मंजिलोकी मंजरपर निघाहे रखता हूँ ।**

◆

## शरद पवार यांच्या वाढदिवसानिमित्त नवी योजना

# आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबातल्या मुलामुलींसाठी शारदाबाई शैक्षणिक प्रोत्साहन शिष्यवृत्ती



गुरुवार, दि. १२ डिसेंबर, २०१९, साहेबांचे ८० व्या वर्षात पदार्पण... केवळ महाराष्ट्राचाच नव्हे तर देशाच्या राजकीय नकाशावर आपलं अस्तित्व अधोरेखीत ठेवणारं नेतृत्व. शेवटच्या माणसापर्यंत विकासाची पूर्तता करताना उभे आयुष्य परिवर्तनात, संघर्षात आणि अधून मधून आलेल्या सत्तेचं साधन म्हणून निष्ठेने स्वतःला पूर्णपणे समर्पित करुन केलेला आजपर्यंतचा जीवन प्रवास.हे सगळं करताना आंतरीक ओढ मात्र मातीची आणि अविरत कष्ट करणाऱ्या बळीराजाची. खरे तर साहेबांच्या वाढदिवसासाठी खूप मोठया भेटवस्तू, टोलेजंग समारंभ वगैरे करणे शक्य होते पण त्यांनी घडविलेल्या राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या कार्यकर्त्यांनी ठरवलं की यंदा आपण साहेबांना बळीराजाला मदत करण्यासाठी सगळेजणं आपआपल्या परिने सहभागी होऊन एक मोठा निधी संकलीत करु या. त्यामुळे ८० व्या वाढदिवशी साहेबांना कार्यकर्त्यांनी जमविलेले, कार्यकर्त्यांचे स्वतःचे असे ८० लाख रुपये दि. १२ डिसेंबरला साहेबांच्या हाती आपण दिले. हा संकल्प प्रत्यक्षात येण्याकरिता महाराष्ट्रातील कानाकोपऱ्यातील राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या कार्यकर्त्यांनी त्यांच्यावर दिलेली जबाबदारी समर्थपणे पार पाडली. दि. १२ डिसेंबरला जरी उद्दीष्ट पार केले तरीसुद्धा कार्यकर्त्यांकडून येणारा निधीचा ओघ अव्याहतपणे सुरुच राहिला आणि मग बघता बघता एक मोठा निधी एकत्रित झाला. हा निधी कायम ठेव स्वरुपात बँकेमध्ये राखून त्यावर मिळणाऱ्या व्याजातून राज्यातल्या आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबातल्या मुलामुलींसाठी वार्षिक शिष्यवृत्ती योजना शारदाबाई शैक्षणिक प्रोत्साहन शिष्यवृत्ती नावाने देण्यात येणार आहे. शेतीवर आलेल्या संकटामुळे नैराश्यापोटी ज्या कर्त्या शेतकऱ्यांनी आपले जीवन संपविले त्याच्या कुटुंबाला विशेषतः त्या कुटुंबातील मुलांच्या शिक्षणासाठी कृषी कृतज्ञता कोषाची निरंतर मदत सुरु राहणार आहे. प्रत्यक्ष १२ डिसेंबरला महाराष्ट्रातल्या तमाम कार्यकर्त्यांच्यावतीने हा निधी साहेबांकडे सुपूर्द करताना प्रत्येक कार्यकर्त्याच्या चेहऱ्यावर एक अनोखं समाधान होतं आणि त्यांच्या हदयात आपल्या जाणत्या राजाबद्दलंच अत्यंत आदरांच असं स्थान निर्माण झालं. कोणत्याही उत्सवी कार्यक्रमापेक्षा जे व्रत आदरणीय पवार साहेबांनी आयुष्यभर अंगिकारले त्याच मार्गावरून पुढे जाण्यासाठी आम्हा सर्व कार्यकर्त्यांसाठी हा १२ डिसेंबर प्रेरणादायी ठरला. ◆

# पवारसाहेबांच्या वाढदिवसानिमित्त उदगीर येथे आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन



राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष माजी कृषिमंत्री मा.शरदचंद्रजी पवार साहेब यांच्या ८०व्या वाढदिवसानिमित्य महाविकासघाडी व उदयगिरी लायन्स नेत्र रुग्णालय यांच्या संयुक्त विद्यमानाने अपंग व अंध विद्यार्थी यांच्या हाताने केक कापून वाढदिवस साजरा करण्यात आला. यावेळी या कार्यक्रमाचे अध्यक्षपदी मा.भरतभाऊ चामले, व या कार्यक्रमाचे उद्धघाटक मा.भगवानसिंह बायस साहेब या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून माजी नगराध्यक्ष मा.राजेश्वरजी निटूरे साहेब,डॉ.आर.एन. लखोटीया,व्यंकटराव पाटील, प्रा.नाना पाटील,बाबासाहेब काळे पाटील,उदगीर सोसायटीचे चेअरमन बसवराज पाटील मलकापूरकर, काँग्रेस नेते लक्ष्मण सोनवळे व शिवसेनेचे नेते कैलासजी पाटील,शिवसेना तालुका प्रमुख चंद्रकांत टेंगेटोल उपस्थित होते. यावेळी अध्यक्षीय भाषणात भरत चामले यांनी हॉस्पिटलमध्ये येणाऱ्या रुग्णांना निवाऱ्याची व्यवस्था व्हावी म्हणून शरदचंद्रजी पवार साहेब यांच्या नावे रुग्णांसाठी धर्मशाळेची मंजुरी देण्यासाठी वरिष्ठ नेत्यांकडे पाठपुरावा करण्याचे आश्वासन दिले.या शिबिरात ग्रामीण भागातील रूग्ण शेकडोच्या संख्येने उपस्थित होते. या शिबिरात एकूण ५०० रुग्णांची तपासणी करण्यात आली.त्यापैकी ८२ रूग्ण हे मोतीबिंदू असलेले निघाले.त्यांची शस्त्रक्रिया ही या शिबिरा-अंतर्गत होणार आहे. या कार्यक्रमासाठी उदयगीरी लॉयन्स रूग्णालयाचे डॉ.इम्रान जमादार,डॉ.पंकज दरक,डॉ.सुप्रिया पाटील, डॉ.स्वप्निल शिंदे,रूग्णालयाचे अधिकारी तानाजी हजारे,रवी जवळे यांचे मोलाचे सहकार्य लाभले.हा कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पाडण्यासाठी बबलू घोणसीकर, शेकापूरचे चेअरमन बाळासाहेब नवाडे, राष्ट्रवादी ओबीसी जिल्हा उपाध्यक्ष बालाजी परगे,राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेसचे तालुका कार्याध्यक्ष युवराज कांडगिरे, ता.सरचिटणीस शुभम जगताप,विजयकुमार येडले,राजू पाचंगे,मारोती बिरादार,कल्पेश नवाडे,भूषण कानवटे आदींनी परिश्रम घेतले.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन धनराज बिरादार यांनी केले तर आभार बाळासाहेब नवाडे यांनी मानले.





# राष्ट्रवादी युवकांची भाजप कार्यालयासमोर निदर्शने...

# जेएनयू विद्यार्थ्यांवरील भ्याड हल्ल्याचा निषेध

मुंबई दि. ६ जानेवारी – JNU मध्ये विद्यार्थ्यांवर करण्यात आलेल्या भ्याड हल्ल्याच्या निषेधार्थ राष्ट्रवादी युवक काँग्रेसच्या वतीने भाजपाच्या कार्यालयासमोर निदर्शने करण्यात आली.

शनिवारी रात्री JNU मधील विद्यार्थ्यांवर भ्याड हल्ला करण्यात आला. त्यामध्ये अनेक विद्यार्थी जखमी झाले आहेत.

हा हल्ला पुर्वनियोजित होता हे लक्षात येत असून त्याचा निषेध म्हणून राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष मेहबूब शेख यांच्या नेतृत्वाखाली कार्यकर्त्यांनी आज दुपारी मुंबईतील भाजप कार्यालयासमोर निदर्शने केली.

यावेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि गृहमंत्री अमित शहा यांच्याविरोधात राष्ट्रवादीच्या युवकांनी जोरदार घोषणाबाजी केलीच शिवाय फलक दाखवत निषेध व्यक्त केला.



## एनआरसीबाबत भाजपाच्या दुटप्पी भूमिकेवर शरद पवारांनी डागली तोफ

# तुमचं आंदोलन शांततेत करा... देशाच्या संपत्तीचे नुकसान करु नका- शरद पवार



मुंबई -एनआरसी बाबत असलेली नाराजी मी समजू शकतो परंतु तुमचं आंदोलन शांततेत करा... देशाच्या संपत्तीचे नुकसान करु नका आणि कायदा हातात घेऊ नका असे आवाहन राष्ट्रवादी कॉंग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार यांनी देशातील जनतेला आज पत्रकार परिषदेतून केले.

सिल्व्हर ओक या त्यांच्या निवासस्थानी आज पत्रकार परिषद घेऊन एनआरसी बाबत भाजपाची नेमकी दुटप्पी भूमिका कशी जाहीर होत आहे हे स्पष्ट केले पंतप्रधान यांनी दिल्लीतील एका सभेत मंत्रिमंडळ व संसदेत एनआरसीबाबत विरोध झाला नाही असे सांगितले हे चुकीचे आहे. संसदेत मी आणि आमचे खासदार प्रफुल्ल पटेल यांनी एनआरसीबाबतचे दुष्परिणाम सांगितले होते. शिवाय राष्ट्रपती महोदयांनी दोन्ही सभागृहात अभिभाषणाच्यावेळी एनआरसी विषय सांगितला होता. राष्ट्रपती बोलतात ती सरकारची पॉलिसी ठरलेली असते तेच बोललं जातं. देशाचे गृहमंत्री एनआरसीचा निर्णय देशासाठी घेतल्याचे सभागृहात सांगतात आणि दुसरीकडे पंतप्रधान वेगळे बोलतात यावर शरद पवार यांनी नाराजी व्यक्त केली. सत्तेत बसलेल्या लोकांनी शांततेने पाऊले टाकायची असतात परंतु सध्याचे सरकार ज्यापध्दतीने धार्मिक अंतर ठेवण्याचा आणि एकतेला ठेच पोचेल अशी पाऊले टाकताना दिसत आहे असा आरोपही शरद पवार यांनी केला. एनआरसी विरोधात देशातील एक मोठा हिस्सा रस्त्यावर उतरून आपली नाराजी व्यक्त करत आहे. परंतु हे आंदोलन शांततेत करा असे आवाहन शरद पवार यांनी केले. दरम्यान येत्या दोन वर्षांत भाजपाला उतरती कळा लागली असून ती थांबण्यातील दिसत नाही अशी टीकाही शरद पवार यांनी केली. दरम्यान सर्वपक्षीय बैठका घेत राष्ट्रीय विषयांवर यापूर्वी चर्चा होत होती आता ते होत नाही याबद्दल शरद पवार यांनी नाराजी व्यक्त केली. यावेळी पत्रकारांनी एनआरसी, झारखंड निकाल आणि राज्यातील मंत्रीमंडळ स्थापनेबाबत शरद पवार यांना प्रश्न केले. ◆

Best

Compliments

# हरयाणा, महाराष्ट्र, झारखंड....

# दिल्ली व बिहार!

# होणार काय?

आलोक



**भाजपच्या घसरत्या प्रादेशिक जनाधाराची बाब चिंतेची आहे. 2022 मध्ये राष्ट्रपति निवडणूक आहे. त्या दृष्टीने भाजपला राज्यामागून राज्य गमावणे परवडणारे नसेल. त्याचप्रमाणे यापुढील काळात संसदेत कायदे करणे तसेच घटनादुरुस्त्यांसारख्या महत्वपूर्ण विषयांवर राज्यांची साथ असणे आवश्यक असेल.ते न झाल्यास कायदे प्रक्रियेत देखील भाजपला अडचणींशी सामना करावा लागेल. राष्ट्रपतिपदी आपला उमेदवार निवडण्यासाठी भाजपला पन्नास टक्क्यांहून अधिक राज्यांमध्ये आपली सत्ता असणे आवश्यक असेल. थोडक्यात राज्यांमधला घसरता आलेख ही भाजपची डोकेदुखी ठरु पहात आहे. या परिस्थितीचा लाभ विरोधी पक्ष कसे घेतात यावरच पुढील राजकारणाची दिशा अवलंबुन राहील!**



लोकसभेच्या 2019 मध्ये झालेल्या निवडणुकीत भाजपला दणदणीत यश मिळाले. 2014पेक्षा अधिक जागा मिळाल्या. 303ची संख्या पक्षाने गाठून निर्विवाद बहुमत मिळविले. सर्वत्र वाह वा वाह वाचे नारे लागणे स्वाभाविक होते. विरोधी पक्ष गलितगात्र, हतोत्साहित झालेले होते. आता यानंतर येणाऱ्या विधानसभा निवडणुका म्हणजे केवळ उपचार आहे. मोदी-शहा जोडगोळी अभेद्य असल्याचे नगारे सर्वत्र दुमदुमू लागलेले होते. अशा या पार्श्वभूमीवर हरयाना आणि महाराष्ट्राच्या विधानसभा निवडणुका जाहीर झाल्या. महाराष्ट्रात काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेसला गळती लागलेली होती. स्थिती अशी होती की महाराष्ट्रात विरोधी पक्ष निवडणूक लढविण्यासाठी तरी शिल्लक राहतो की नाही अशी शंका यावी. हरयानातही चित्र फारसे वेगळे नव्हते. परंतु हीच वेळ निर्णायक व नाजुक असते. विजयाबाबत बेफिकीर आणि बालंबाल खात्री असलेले लोक फाजील उत्साहात चुका करुन बसतात आणि पाहतापाहता चित्र पालटते. महाराष्ट्रात तेच घडले. भाजपला अहंकार नडला. अस्वस्थ आणि संतप्त मतदारांनी विरोधी पक्षांना चैतन्य तर दिलेच पण मतांचे पाठबळही दिले. ही लढाई मतदार विरुध्द अहंकारी भाजप राज्यकर्ते यांच्यातली होती आणि मतदारांनी या अहंकाराचा नक्षा पूर्ण उतरवला. महाराष्ट्रात नंतरच्या राजकारणाचे फासे असे काही पडले की भाजपला सर्वाधिक जागा मिळूनही सत्ता प्राप्त होऊ शकली नाही. हरयानात 2014च्या निवडणुकीत विधानसभेच्या 47 जागा जिंकणाऱ्या भाजपला जेमतेम 31 जागांवर समाधान मानावे लागले. परंतु पैशाच्या व आमिषाच्या बळावर त्यांनी चौटाला कुटुंबातील बंडखोर नेते दुष्यंत यांच्या बाल्यावस्थेतील पक्षाबरोबर आघाडी करुन सरकार स्थापन केले. हरयानात भाजपचा निर्णायक पराभव झाला होता. पण त्रिशंकू विधानसभेमुळे व साधनसंपत्तीच्या आधारे भाजपने सरकार स्थापन करुन आबरू वाचवली. महाराष्ट्रात भाजप-शिवसेना युतीला स्पष्ट बहुमत मिळाले. परंतु पुन्हा भाजपला अहंकार नडला आणि शिवसेनेने मानहानिकारक अटींवर सत्तेत भागीदारी घेण्याऐवजी राष्ट्रवादी काँग्रेस व काँग्रेसबरोबर आघाडी स्थापन करुन सरकार व मुख्यमंत्रीपद मिळवले.

महाराष्ट्रात प्रथमच भाजपचा सर्वात जुना मित्र पक्ष त्यांच्यापासून तुटला. हे काहीसे अनपेक्षित होते. पण ही बाब तेवढ्यावर थांबली नाही. शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस आणि काँग्रेस असा नवा राजकीय प्रयोग महाराष्ट्रात सुरु झाला आणि त्याचे राष्ट्रीय पडसाद उमटण्यास सुरुवात झाली. मरगळलेल्या विरोधी पक्षांमध्ये चैतन्य निर्माण करणारा हा प्रयोग ठरला. या प्रयोगाचे निर्माते व दिग्दर्शक व राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांच्याकडे त्याचे श्रेय जाते. या पार्श्वभूमीवरच झारखंडमधील विधानसभा निवडणूक जाहीर झाली. या निवडणुकीच्या वेळीही



विरोधी पक्षांपेक्षा सर्वांचे लक्ष भाजपकडे होते. कारण झारखंडमध्ये भाजप व अखिल झारखंड विद्यार्थी संघटना(एजेएसयू) यांचे संयुक्त सरकार होते. परंतु निवडणुकीपूर्वी या दोन्ही पक्षात फाटाफूट झाली. भाजपला पुन्हा येथे फाजील आत्मविश्वास नडला. स्वबळावर निवडणूक लढविण्याचा निर्णय भाजपला महागात पडला. खुद्द भाजपला अंतःस्थ बंडखोरीचे ग्रहण लागलेले होते. मुख्यमंत्री रघुवर दास यांच्या विरोधात त्यांच्याच मंत्रिमंडळातले एक मंत्री व भाजप नेते सरजू राय यांनी बंडखोरी करुन निवडणूक लढवली आणि त्यांना चक्क हरवले. या एका घटनेवरुन रघुवर दास यांच्या विरोधातील असंतोषाच्या तीव्रतेची कल्पना यावी. परंतु रघुवर दास यांना नरेंद्र मोदी यांनी झारखंडवर लादले होते. मतदार आणि खुद्द








भाजपमधीलच असंतुष्टांनी त्यांना झिडकारले. झारखंड हे आदिवासी बहुसंख्यक राज्य असताना तेथे बिगर आदिवासी आणि ओबीसी नेत्याला लादणे हा मोदींच्या एककल्ली व एकाधिकारशाही प्रवृत्तीचा नमूना होता. (हरयानात देखील प्रमुख जाट समुदायाला डावलून त्यांनी पंजाबी मूळ असलेल्या मनोहरलाल खट्टर यांना लादले. त्याची परिणिती पराभवात झाली. परंतु जाट भाजपपासून दुरावले आणि तरीही कसेबसे सरकार स्थापन करण्यात यश मिळविण्यात आले आहे.) झारखंडमधील मतदारांनी भाजपला धडा शिकवला यात वादच नाही. परंतु झारखंड विद्यार्थी संघटनेबरोबर युति तोडण्याची शिक्षाही भाजपला मिळाली. 2014 मध्ये दोन्ही पक्षांनी एकत्रित निवडणुका लढविल्या होत्या व त्यांना 35 टक्के मते(31 टक्के भाजप व झारखंड विद्यार्थी संघटना 4 टक्के) मिळाली. आश्चर्याची बाब म्हणजे यावेळी भाजप व झारखंड विद्यार्थी संघटना या दोघांच्या मतांच्या टक्केवारीत वाढ झालेली आढळते. भाजपला 34 टक्के मते मिळाली तर विद्यार्थी संघटनेला 9 टक्के मते मिळाली. अर्थात दोघांनी स्वतंत्रपणे निवडणूक लढविली असल्याने तेवढा फरक किंवा वाढ ही स्वाभाविक आहे.



काँग्रेसने झारखंड मुक्ति मोर्च्याशी आघाडी कायम ठेवली. त्याचबरोबर प्रादेशिक पक्षाला जागांमध्ये झुकते माप दिले. मोर्च्याचे प्रमुख हेमंत सोरेन यांनी गेल्या पाच वर्षात संघचनात्मक पातळीवर बदल व सुधारणा करतानाच लोकांच्या व स्थानिक प्रश्नांवर भर दिलेला होता. त्यामुळे स्थानिक पातळीवर उपलब्ध असलेला नेता अशी प्रतिमा उभारण्यात त्यांना यश मिळाले. त्याचा फायदा तसेच भाजप विरोधातील असंतोष या दोन कारणांच्या बेरजेतून त्यांच्या आघाडीला सहज बहुमत प्राप्त झाले.

इजा बिजा तिजा! हरयाना, महाराष्ट्र आणि आता झारखंड या तीन राज्यात भाजपला पराभवाचा सामना करावा लागला. हरयानात दुष्यंत चौटाला यांच्यामुळे सरकार स्थापन करणे शक्य झाले एवढीच जमेची बाजू! अन्यथा मोदी-शहा जोडगोळी या तीन राज्यात असफल ठरली असेच म्हणावे लागेल. 2017 पर्यंत देशातल्या सत्तर टक्के राज्यांमध्ये भाजपची सत्ता होती. झारखंडमधील पराभवानंतर ती निम्म्याने कमी होऊन पस्तीस टक्क्यांवर घसरली आहे. आज भाजपची सत्ता असलेल्या राज्यांमध्ये उत्तर प्रदेश, उत्तराखंड, हिमाचल प्रदेश, गुजरात व कर्नाटक, आसाम व त्रिपुरा या राज्यांचा समावेश होतो. ईशान्येकडील अन्य राज्यात भाजपने स्थानिक पक्षांना मदत करुन तेथे सरकार स्थापनेत वाटा मिळवलेला आहे. बिहारमध्ये नीतीशकुमार यांच्या बरोबर ते सत्तेत भागीदार आहेत. थोडक्यात भाजप ही घसरण थांबविण्यासाठी काय करणार या प्रश्नाची चर्चा सुरु झालेली आहे.







या पार्श्वभूमीवर आता दिल्ली विधानसभेची निवडणूक होत आहे. त्यानंतर या वर्षाच्या अखेरीला बिहारमधील निवडणूक










असेल व त्यानंतर पश्चिम बंगाल आणि तमीळनाडू येथील निवडणुका होणार आहेत. ही घसरण थांबविण्यासाठी भाजप कोणते राजकीय पवित्रे घेणार आणि कोणत्या राजकीय युक्त्या व चलाख्या करणार याचे उत्तर अध्याप भाजपचे नेतृत्व देताना आढळत नाही. दिल्लीत फेब्रुवारीच्या पहिल्या आठवड्यात विधानसभा निवडणूक अपेक्षित आहे. या निवडणुकीसाठी भाजपने तयारी सुरु केलेली आहे. खरी लढत 'आम आदमी पार्टी' म्हणजेच 'आप' आणि 'भाजप' यांच्यातच असेल. काँग्रेस स्वबळावर निवडणूक लढविणार असल्याने ही त्रिकोणी किंवा तिरंगी निवडणूक राहील. यात कमजोर व दुर्बळ बाजू काँग्रेसचीच आहे. तसेच काँग्रेस स्वतः काही जागा जिंकेल अशी चिन्हे तूर्तास तरी दिसत नाहीत.

परंतु ते आप किंवा भाजप यांची ठिकठिकाणी मते खाण्याचे काम करणार आहेत. त्यामुळे काँग्रेसच्या लढण्यामुळे होणाऱ्या नफा-नुकसानीच्या अंदाजावरही सर्वांचे लक्ष आहे. 'आप'ला प्रामुख्याने झोपडपट्टीवासीय, गरीब वर्गातील लोक, कनिष्ठ आर्थिक वर्गातले लोक आणि अल्पसंख्यक यांचा पाठिंबा आहे. त्यांनी पाणी व वीजपुरवठ्याच्या प्रकरणावर केजरीवाल यांना साथ दिलेली आहे. त्याचबरोबर सर्वासाधारण मध्यमवर्गीय अंशतः त्यांच्या बाजुने आहेत. एकंदरीत प्राथमिक दृष्ट्या केजरीवाल यांचे पारडे तूर्तास तरी जड दिसते. गेल्या पाच वर्षात केजरीवाल यांनी मोफत वीज व पाणी दिले आहे. वैद्यकीय सेवांमध्ये विलक्षण सुधारणा करुन सामान्यांसाठी त्यांची उपलब्धता वाढविलेली आहे. शिक्षण व विशेषतः शाळांचे वर्ग वाढवून, सरकारी शाळांमधील सुखसोयी वाढवून त्यांनी सामान्य मतदारांची मने जिंकलेली आहेत आणि त्यांना त्यांच्याकडून मते जिंकायची आहेत. केजरीवाल यांनी गेल्या काही वर्षात केंद्र सरकार व नरेंद्र मोदी यांच्याशी संघर्षाचा मार्ग सोडून दिला असून त्यांनी केवळ दिल्लीच्या विकासावर लक्ष केंद्रित केलेले आहे. ती बाब लोकांना पटू लागल्याचे चित्र आहे व ती केजरीवाल यांची मोठी जमेची बाजू मानली जाते.

प्रमुख प्रतिस्पर्धी पक्ष भाजपकडे साधनसंपत्तीची अमाप

ताकद आहे. त्यांनी गेल्या पाच वर्षात केजरीवाल यांना सरळपणे राज्यकारभार करु न देण्यासाठी केलेल्या कारवायांची बाब दिल्लीकरांच्या मनात आहे. भाजपने केजरीवाल यांच्या विरोधात असंख्य मुद्दे उपस्थित केलेले आहेत. अगदी केजरीवाल सरकारने त्यांच्या कामगिरीच्या केलेल्या जाहिराती व त्यावरील खर्च यावरही भाजपने टीका केलेली आहे. भाजपने आतापर्यंत केजरीवाल यांना निर्णायक शह व मात दिलेली नाही. त्याबाबतीत केजरीवाल अजुनही वरचढ ठरत आहेत. भाजपची प्रमुख अडचण म्हणजे त्यांच्याकडे अजुनही मुख्यमंत्रीपदासाठी केजरीवाल यांच्या तोलामोलाचा चेहरा नाही. सध्याचे दिल्ली भाजप अध्यक्ष मनोज तिवारी हे भोजपुरी गायक व अभिनेते आहेत आणि दिल्लीत पूर्व उत्तर प्रदेशातील लोकांची बहुसंख्या असलेल्या मतदारसंघातून निवडून आलेले आहेत. परंतु ते स्थानिक नसल्याने त्यांना उमेदवार करणे कितपत योग्य व उचित ठरेल याबाबत शंका आहेत.

विजय गोयल हे गेली अनेक वर्षे मुख्यमंत्रीपदासाठी आसुसलेल्या अवस्थेत आहेत परंतु त्यांना कुणी फारसे गांभीर्याने घेत नसल्याने त्यांची वर्णी यावेळी लागणार काय याच्या प्रतीक्षेत त्यांचे समर्थक आहेत. विजय गोयल हे गेल्या(मोदी-01) मंत्रिमंडळात राज्यमंत्री होते. दिल्लीच्या प्रत्येक कार्यक्रमात ते आघाडीवर असतात. चांदणी चौकाचे प्रतिनिधित्व त्यांनी केले होते. सध्या ते राज्यसभेत आहेत. दिल्लीच्या राजकारणात अरुण जेटली यांचा शब्द निर्णायक असे पण आज जेटली हयात नाहीत. त्यामुळे चलाख विजय गोयल बाजी मारतील काय याकडे सर्वांचे लक्ष आहे. मात्र दिल्लीतील लढत ही प्रेक्षणीय ठरणार आहे. भाजपचा प्रचाराचा भर राष्ट्रीय मुद्यांवर आणि मोदी-शहा जोडगोळीच्या प्रभावावरच असेल. पण तो जसा फायद्याचा भाग असतो तसेच स्थानिक मुद्यांच्या तुलनेत त्याचा तोटाही होतो. हरयाना, महाराष्ट्र व झारखंड या निवडणुकांनी ते दाखवून दिले आहे. त्यामुळे दिल्लीत काय होणार याची उत्कंठा आहे.

या वर्षाच्या अखेरीला बिहारमध्ये निवडणूक होईल व त्यानंतर पश्चिम बंगाल व तमीळनाडू यांचा नंबर लागेल. पश्चिम बंगालवर कब्जा करण्यासाठी भाजपने जिवापाड धडपड चालविलेली आहे पण खेळ त्यांच्या हातातून निसटताना दिसू लागला आहे. तमीळनाडूत भाजपला अण्णा द्रमुकबरोबर दुय्यम भागीदार म्हणूनच रहावे लागणार आहे. बिहारमध्ये नीतीशकुमार यांचे नेतृत्व मान्य करुन भाजपने तूर्तास बचावाचा पवित्रा घेतला आहे.

भाजपच्या घसरत्या प्रादेशिक जनाधाराची बाब चिंतेची आहे. 2022 मध्ये राष्ट्रपति निवडणूक आहे. त्या दृष्टीने भाजपला राज्यामागून राज्य गमावणे परवडणारे नसेल. त्याचप्रमाणे यापुढील काळात संसदेत कायदे करणे तसेच घटनादुरुस्त्यांसारख्या महत्वपूर्ण विषयांवर राज्यांची साथ असणे आवश्यक असेल.ते न झाल्यास कायदे प्रक्रियेत देखील भाजपला अडचणींशी सामना करावा लागेल. राष्ट्रपतिपदी आपला उमेदवार निवडण्यासाठी भाजपला



पन्नास टक्क्यांहून अधिक राज्यांमध्ये आपली सत्ता असणे आवश्यक असेल. थोडक्यात राज्यांमधला घसरता आलेख ही भाजपची डोकेदुखी ठरु पहात आहे. या परिस्थितीचा लाभ विरोधी पक्ष कसे घेतात यावरच पुढील राजकारणाची दिशा अवलंबुन राहील! ही संधी विरोधी पक्षांनी गमावल्यास मोदी-शहा जोडगोळीस ते थांबवून शकणार नाहीत आणि आताच देशातील लोकशाही संस्थांची मोडतोड सुरु झालेली असताना ती थांबविण्यास असमर्थ ठरणारे विरोधी पक्ष यापुढील काळात अधिक दुर्बल व कमजोर होतील. त्यामुळे या राजकीय परिस्थितीचा लाभ घेण्याची संधी विरोधी पक्षांना प्राप्त झालेली आहे. ते तो लाभ कसा घेतात याकडे लोकांचे लक्ष असेल कारण मतदारांनी त्यांना बदल हवा असल्याचे संकेत या निकालांनी दिलेले आहेत. आता त्यांची प्रस्थापित राजवटीविरुध्दची नाराजी योग्य मार्गाने प्रवाहित करण्याची आवश्यकता आहे आणि त्यासाठी विरोधी पक्षांना परिपक्व व अनुभवी नेतृत्वाची आवश्यकता भासणार आहे. तो प्रश्न सोडविणे निर्णायक राहील कारण लोकांपुढे एक पर्यायी व विश्वासार्ह नेतृत्व उभे राहिल्यास उर्वरित प्रक्रिया आपोआप घडू लागतात.

तात्पर्य? विरोधकांसाठी सुवर्णसंधी आहे, हीच वेळ आहे!

◆








# राष्ट्रवादीचा महाराष्ट्र मंत्रिमंडळातला सहभाग



अजित पवार यांनी उपमुख्यमंत्री पदाची शपथ घेतल्यानंतर उपस्थितांना नमस्कार करून अभिवादन केले, शेजारी मुख्यमंत्री उद्धवजी ठाकरे



जयंत पाटील, जलसंपदा मंत्री



छगन भुजबळ, अन्न व नागरी पुरवठा मंत्री



दिलीप वळसे पाटील, कामगार व उत्पादन शुल्कमंत्री



अनिल देशमुख, गृहमंत्री



हसन मुश्रीफ, ग्रामीण विकास मंत्री



नवाब मलिक, मंत्री अल्पसंख्यांक विभाग



डॉ. जितेंद्र आव्हाड, गृहनिर्माण मंत्री



धनंजय मुंडे, समाजकल्याण मंत्री



डॉ. राजेंद्र शिंगणे, अन्न व औषध प्रशासन



राजेश टोपे, आरोग्य मंत्री



बाळासाहेब पाटील, सहकार मंत्री



कु. आदिती तटकरे, उद्योग राज्यमंत्री



संजय बनसोडे, राज्यमंत्री पर्यावरण



प्राजक्त तनपुरे, राज्यमंत्री नगरविकास



दत्तात्रय भरणे, राज्यमंत्री जलसंधारण




# अहो भाई, का ही भीती?


कै.शंकरराव चव्हाण गृहमंत्री होते. ते 2 कृष्ण मेनन मार्ग येथे रहात असत.

त्यांना ब्लॅक कॅट कमांडोंची सुरक्षा होती. त्यांच्या बरोबर समोर 3 कृष्ण मेनन मार्ग येथे लढवय्ये कामगारनेते जॉर्ज फर्नांडिस रहायचे.

एकदा शंकरराव बाहेर निघायला आणि फर्नांडिसही बाहेर पडण्याची एकच वेळ आली.

केंद्रीय गृहमंत्री म्हणून शंकररावांना प्राधान्य मिळणे अपेक्षितच होते. तेही फर्नांडिस यांना मान्य होते. पण त्यासाठी समोर राहणाऱ्या संसदसदस्यांच्या





बंगल्याचे(फर्नांडिसांच्या) फाटक बाहेरुन बंद करणे हा सुरक्षेचा अतिरेक होता. लढाऊ फर्नांडिस संतापणे स्वाभाविक होते. सर्वप्रथम त्यांनी त्यांचे फाटकच उखडून टाकले की जेणेकरुन ते बंद करण्याची वेळच येणार नाही.

नंतर त्यांनी लोकसभेत हा मुद्दा उपस्थित केला आणि ज्या नेत्यांना स्वतःच्या जिवाची एवढी भीती वाटते त्यांच्यासाठी या देशात एकच जागा आहे आणि ती म्हणजे 'तिहार तुरुंग'! तेथे हे सर्व नेते पहाऱ्यात व सुरक्षित राहतील अशी बोचरी शेरेबाजी त्यांनी केली. स्वतः फर्नांडिस यांनी अनेक महत्वाची मंत्रीपदे भूषवूनही ते कधीही सुरक्षा घेत नसत.

ही आठवण येण्याचे कारण काय?

सध्याही देशाचे गृहमंत्री 6-अ, कृष्ण मेनन मार्ग येथे राहतात.

सध्याचे गृहमंत्री पोलादी म्हणून ओळखले जातात. त्यांनी गृहमंत्री झाल्याझाल्या 370 कलम रद्द करणे, जम्मू-काश्मीरचे तुकडे करणे आणि आता नागरिकत्व दुरुस्ती कायदा करुन ते किती धाडसी व आक्रमक आहेत हे दाखवून दिले. एवढेच नव्हे तर या विरुध्द आंदोलन करणाऱ्यांना त्यांनी 'टुकडे टुकडे गँग' ठरवून त्यांना धडा शिकवण्याचा जाहीर निर्धारही त्यांनी व्यक्त केला.

पण असे सर्वशक्तिमान गृहमंत्री असूनही त्यांना कसलीतरी धास्ती वाटत असावी.

विशेषतः नागरिकत्व दुरुस्ती कायद्यानंतर दिल्लीत जो असंतोष व्यक्त झाला आणि जी विद्यार्थी आंदोलने सुरु झाली त्याने बहुधा 'श्री. सर्वशक्तिमान' धास्तावलेले असावेत.

कारण या आंदोलनाची पहिल्या दिवशी चुणूक पाहिल्यानंतर पोलिसांनी तत्काळ त्यांच्या कृष्ण मेनन मार्गवरील



बंगल्याची चहू बाजुंनी नाकेबंदी केली.

या रस्त्यावरुन होणारी वाहतूक बंद करण्यात आली. ज्या बसगाड्या या मार्गाने जायच्या त्यांचे मार्ग बदलण्यात आले.


यामध्ये सामान्य लोकांची किती गैरसोय होणार आहे याची तमा बाळगण्यात आलेली नाही.

स्वतःला सर्वशक्तिमान मानणारे या आंदोलनांचा एवढा धसका घेतील असे स्वप्नातही वाटले नव्हते!

काळाचा महिमा!!!

## कर्नाटकातील न संपणारे नाटक?

कर्नाटकचे मुख्यमंत्री बुक्कनकेरे सिद्दलिंगप्पा येद्युरप्पा (बीएस येद्युरप्पा) विलक्षण नाराज आहेत.



कर्नाटकच्या मुख्यमंत्रीपदाचा हट्ट त्यांनी पुरवून घेतला खरा पण भाजपचे 'हायकमांड' त्यांना मुक्तपणे आणि मनासारखे काम करु देत नसल्याची स्थिती आहे.

नागरिकत्व दुरुस्ती कायदा संमत झाल्यानंतर बंगलुरु, मंगलोर या भागात जोरदार आंदोलने झाली. पण मोजक्या ठिकाणी आंदोलने होऊनही संपूर्ण राज्यभर जमावबंदी (144 कलम) लागू करण्यात आली होती.

असे सांगतात की हा निर्णय मुख्यमंत्र्यांचा नव्हता. तर, त्यांना भाजपच्या 'दिल्लीपतीं'चा तसा आदेश आला होता.

कर्नाटकचे मुख्यमंत्री आपण आहोत आणि कुठं गडबड झाली तर कोणते उपाय करायचे हा आपला अधिकार असताना हे 'दिल्लीपति' कोण अशी त्यांची भावना होणे स्वाभाविक आहे.

त्यामुळेच थेट दिल्लीहून आलेल्या या राज्यव्यापी जमाबंदीच्या आदेशावर येद्युरप्पा तोंड आंबट, कडवट, वाकडे व लांब करुन बसले.

मंगलोरमध्ये आंदोलनकर्त्यांवर पोलिस गोळीबार झाला व लाठीमारही झाला. त्यावर त्यांनी ज्या पध्दतीने दुःख व खेद प्रकट केला त्यावरुनच हा जमावबंदीचा आदेश त्यांचा नव्हता हे स्पष्ट झाल्याचे निरीक्षकांचे म्हणणे आहे. गोळीबारात दोनजण मृत्युमुखी पडले होते.

तुम्ही विचाराल 'दिल्लीपति' कोण?

केंद्रीय गृहमंत्री 'दिल्लीपति' आहेत, दुसरे कोण?

तसेही येद्युरप्पा आणि 'दिल्लीपति' यांच्यात फारसे चांगले संबंध नाहीत.

मुळात येद्युरप्पा यांना फारकाळ मुख्यमंत्रीपदी राहू द्यायचे नाही असे दिल्लीपतींचे मनसुबे असल्याचे ऐकिवात आहे.


येद्युरप्पांना त्याची कल्पना आहे.

एवढेच नव्हे तर अलीकडेच पोटनिवडणुकांमध्ये जे तेरा बंडखोर भाजपच्या तिकिटावर निवडून आले त्यांना येद्युरप्पांनी मंत्रीपदांचे आश्वासन दिलेले होते. पण 'दिल्लीपति' त्यांना मंत्रिमंडळ विस्तारासाठी परवानगीच देत नसल्याने ते मनातल्या मनात भडकले आहेत.

पण सध्या दिल्लीपति देखील फारशा चांगल्या अऽस्थेत नाहीत.

कर्नाटकात त्यांनी येद्युरप्पांना दुखावले तर त्याचे परिणाम चांगले होणार नाहीत याची त्यांना खात्री आहे. कारण येद्युरप्पांचे पूर्वीचे बंड त्यांच्या आठवणीत ताजे आहे. त्यामुळेच त्यांची अशी 'गोची' करण्याचा पवित्रा 'दिल्लीपतीं'नी घेतला असावा.

चला मजा आहे.....!!



## टाळी एका हाताने वाजत नाही योगीजी

उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांना मुस्लिमांना त्रास देण्याचा एक नवा उपाय सापडला आहे.

नागरिकत्व कायद्याच्या विरोधात उत्तर प्रदेशात आंदोलने झाली. उत्तर प्रदेश पोलिसांनी परिस्थिती समयसूचकतेने हाताळण्याऐवजी पोलिसी बळाचा अतिरेकी वापर करुन ती हाताळली.


परिणामी हिंसा झाली. जीवित हानि झाली आणि सरकारी मालमत्तेचे नुकसानही झाले.


योगी आदित्यनाथ यांच्यात क्षात्रतेज जागू लागले. त्यांनी दंगलखोरांकडून नुकसान झालेल्या सरकारी मालमत्तेचे पैसे वसूल करण्यास सुरुवात केली. त्यानुसार एका शहरात मुस्लिमांकडून सहा लाख रुपयांची रक्कम घेण्यात आली.

अल्पसंख्यक समाजाला छळण्याचा हा नवा विकृत प्रकार!

पण टाळी एका हाताने वाजत नाही.



उत्तर प्रदेशापासून दूर दक्षिणेतील केरळमध्ये याची वेगळी प्रतिक्रिया उमटली.

सबरीमला देवस्थानात महिलांना प्रवेश देण्याच्या प्रकरणात तेथील संघ परिवार आणि भाजपने अत्यंत उग्र व हिंसक आंदोलन केले होते.

यामध्ये शेकडो वाहने जाळण्यात आली होती.

सरकारी मालमत्तेचीही भरपूर नासधूस करण्यात आली होती.

या सर्व नुकसानीचा आकडा काढल्यास तो अवाढव्य होतो.

उत्तर प्रदेशाच्या धर्तीवरच केरळमधील संघ परिवार व भाजपला दंड आकारुन नुकसानभरपाई वसूल करावी अशी मागणी काहीजण करु लागले आहेत.


अद्याप राज्य सरकारने याबद्दल निर्णय केलेला नाही. पण खरोखर दंड आकारायचे ठरविल्यास तेथील संघ व भाजप कफल्लक होतील इतके नुकसान त्यांनी केले आहे अशीही चर्चा ऐकू येते.

पण एकदा जशास तसे करावे असा आग्रह होताना ऐकू येतो!

बघू या केरळ सरकार काय करते ते!

## पाणी कुठंतरी मुरायला लागलंय खरं?

सध्या सर्वत्र 'सीएए'(नागरिकत्व दुरुस्ती कायदा), 'एनआरसी' (नॅशनल रजिस्टर ऑफ सिटिझन्स) आणि 'एनपीआर' (नॅशनल पीपल्स रजिस्टर) या विविध सरकारी कायद्यांच्या लघुरुपांची(शॉर्टफॉर्म) चर्चा ऐकू येते.










नागरिकत्व दुरुती कायद्याच्या विरोधात सर्वसामान्य भारतीय माणूस रस्त्यावर उतरला आहे. हे मोदी-शहा जोडगोळीला अनपेक्षित होते.

परंतु दोघेही सहजासहजी हार मानणारे नाहीत. त्यामुळे आता त्यांनी भाजप-संघ परिवाराशी निगडित सोशल मीडिया टोळ्यांना आक्रमणाचा आदेश दिला आहे. आता या टोळ्यांनी या कायद्यांना विरोध करणाऱ्यांच्या विरोधात मोहिम सुरु केली आहे खरी पण त्यांना देखील प्रखर प्रतिकाराला सामना करावा लागत आहे.




एवढेच नव्हे तर भाजप सरकार पुरस्कृत व उपकृत वृत्तवाहिन्यांना देखील य कामाला जुंपण्यात आल्याची माहिती कानावर आली आहे.

एका अतिजलद वाहिनीने म्हणे वीस लाख निरोप पाठवून नागरिकत्व कायदा कसा चांगला आहे आणि सरकारने कसे योग्य पाऊल उचलले आहे अशा आशयाचा प्रश्न विचारला.

पण प्रत्यक्षात 18 लाख लोकांनी सरकार चूक आहे आणि हा कायदा मागे घेतला पाहिजे असे उत्तर दिल्याने हा जनमत संग्रह तत्काळ गुंडाळण्यात आला.

दुसऱ्याही एका वृत्तवाहिनीला असाच अनुभव आला.

पण चूक मान्य केली तर काय?

भाजपच्या आयटी सेलचे अमित मालवीय यांनी राजदीप सरदेसाई या प्रसिध्द पत्रकाराच्या पत्रकारितेवर एक जनमत चाचणी घेतली. त्यातही ते तोंडावर आपटले.

आणखी काही संघपरिवार मंडळींनी राजदीप हे दाऊदचे हस्तक असल्याचे सांगून जनमताची चाचणी करण्याचा प्रयत्नही असाच फोल ठरला.

एवढे दात पडूनही भाजपला उपरती झालेली नाही.

ब्रह्मांडनायक उर्फ पंतप्रधानांनी एक कुणी अध्यात्मिक बाबा सद्गुरु यांचा दाखला देऊन नागरिकत्व कायद्याला पाठिंबा देण्याचे आवाहन लोकांना केले आहे. परंतु हे जे सद्गुरु आहेत त्यांच्याविरुध्द त्यांच्यावर त्यांच्या पत्नीच्या हत्येचा संशय आहे. ते प्रकरण अद्याप अनिर्णितच आहे.

भारताच्या पंतप्रधानांना दुसरे कुणी सापडले नाही!

आता सर्व केंद्रीय मंत्र्यांना राज्याराज्यात पाठवून पत्रकार परिषदा घ्यायला लावून या कायद्याची पाठराखण करण्यास सांगण्यात आले आहे व आता हे मंत्री चौफेर राज्यांमध्ये रवाना करण्यात आले आहेत.

असे असले तरी ब्रह्मांड नायक एक चूक करुन बसले आहेत.

बोलण्याच्या भरात त्यांनी 'एनआरसी' बद्दल अजुन सरकारमध्ये चर्चाच नाही असे जाहीर वक्तव्य केले.

पण त्यांचे सहनायक गृहमंत्री अमितभाई शहा यांनी राज्यसभेत देशभरात एनआरसी लागू करण्याचे वक्तव्य केले होते.


आता त्याच्यावर सारवासारव करण्यासाठी 'एनपीआर' म्हणजेच 'नॅशनल पीपल्स रजिस्टर' वर चर्चा केली जात असल्याचे सांगण्यात आले.

पण सध्या सरकार लोकविरोधामुळे काहीसे धास्तावले आहे हे नक्की!

गृहमंत्रालयाच्या वर्षअखेरीच्या आढाव्यात नागरिकत्व दुरुस्ती कायद्याचा नुसता ओझरता उल्लेख आहे. एनआरसीचा उल्लेखही नाही.

कानोकानी मिळालेल्या खबरीनुसार हा सर्व विचका गृहमंत्र्यांच्या अतिउत्साहीपणाने झाल्याचे मत व्यक्त होत आहे.

सध्याच्या परिस्थितीत इतर म्हणजेच आर्थिक मुद्दे प्राधान्याचे असताना हा नसता वाद उत्पन्न करण्याचे कारण नव्हते असे एकीकडे मानले जात असतानाच यामुळे लोकांचे आर्थिक प्रश्नांकडे दुर्लक्ष झाले तर बरेच! अशी भावनाही व्यक्त होत आहे.



परंतु 370 कलम, आणि नागरिकत्व दुरुस्ती कायदा या दोन्हीमुळे आंतरराष्ट्रीय पातळीवर भारताच्या उदार लोकशाहीवादी देशाच्या प्रतिमेला तडा गेला आहे. ती बाब ब्रह्मांडनायकांना खुपू लागली आहे.

अन्यथा त्यांना नोबेल पारितोषकाचे स्वप्न पडू लागले होते.

पण त्यांच्याच सहकाऱ्याच्या लागोपाठच्या दोन कायद्यांमुळे त्यांच्या प्रयत्नांवर पाणी पडल्यात जमा आहे.

म्हणजेच कुठेतरी पाणी मुरत आहे .............???

## निवडणुका आणि तीर्थयात्रा

छे! छे! तुम्हाला वाटतंय तसं काही नाही!

तुम्हाला वाटलं असेल की निवडणुका जवळ येताच राजकीय नेते तीर्थयात्रा करुन देवाला सांकडं घालून निवडणुकीतील विजयाची प्रार्थना करीत असतील, देवाला नवस करत असतील!

पण, तसं काही नाही!

निवडणुकीत कोणत्याही नेत्याला देवापेक्षा महत्वाचा असतो तो मतदार! किंवा मतदारच त्यांचा देव होतो! त्यामुळे

त्याला संतुष्ट राखणे हे नेत्यांचे प्रथम कर्तव्य असणार यात शंका ती काय?

दिल्लीत विधानसभा निवडणुका होणार आहेत. त्याची घोषणा येत्या काही दिवसातच अपेक्षित आहे.



त्यामुळे घोषणेपूर्वी मतदारांना संतुष्ट करण्यासाठी प्रमुख दावेदार पक्षांची चढाओढ, स्पर्धा सुरु झाली आहे.

काँग्रेस पक्ष सध्या कफल्लक असल्याने ते मतदारांना नुसत्या आश्वासनाखेरीज बाकी काही देऊ शकत नसल्याची स्थिती आहे.

भाजपने अनधिकृत घरे व वसाहती नियमित करण्याचे आश्वासन देऊन पाहणी करणे व माहिती गोळा करण्याचे काम सुरु केले आहे.

'आम आदमी पार्टी' देखील या स्पर्धेत मागे नाही. या पक्षानेही राजकारणातल्या चलाख्या व युक्त्या शिकलेल्या आहेत.

दिल्लीतल्या वयोवृध्द व ज्येष्ठ नागरिक असलेल्या मतदारांना मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांच्यातर्फे तीर्थयात्रा घडविण्याची मोहिम काही महिन्यांपासून सुरु आहे आणि सध्या तिला वेग देण्यात आलेला आहे.

'आम आदमी पार्टी' – 'आप' चे आमदार यासाठी संपर्क किंवा दुवा म्हणून काम करीत आहे. त्यांच्या मतदारसंघातील वयोवृध्द व ज्येष्ठ नागरिकांचे समूह किंवा गट करुन त्यांच्या धार्मिक यात्रांच्या आयोजनाची जबाबदारी त्यांच्यावर टाकण्यात आली आहे.

यात्रेकरुंची नियोजित संख्या किंवा समूह तयार झाला की त्यांना वातानुकूलित डब्यातून तीर्थयात्रेच्या स्थानी नेणे–आणणे, तेथील निवास, भोजन याची सोय 'आप'तर्फे करण्यात येत आहे. एवढेच नव्हे तर ज्येष्ठ नागरिकांच्या मदतीसाठी सहाय्यक तसेच मार्गदर्शक देखील बरोबर देण्यात येत आहेत.

तर मंडळी, कशी आहे ही आयडिया?

दिल्लीतली वयोवृध्द मतदारमंडळी सध्या तीर्थयात्रा करीत आहेत.

यापूर्वी प्रयाग येथे झालेल्या अर्ध कुंभ मेळ्यासाठी देखील 'आप' तर्फे विशेष रेल्वेगाड्या भाड्याने घेऊन दिल्लीकरांना कुंभमेळ्याची यात्रा घडविण्यात आली होती.

ती मोहिम यशस्वी झाल्यानंतरच आता ही तीर्थयात्रा मोहिम सुरु करण्यात







आली आहे. यामध्ये जगन्नाथपुरी, रामेश्वरम यासारख्या दूरच्या तीर्थस्थानांचा देखील समावेश आहे. शिर्डी हे देखील एक प्रमुख तीर्थस्थान आहे.

अर्थात मतदारांना तीर्थयात्रा घडविण्याचा हा प्रकार नवा नाही.

अनेक राजकीय पक्षांमधले खासदार किंवा आमदार देखील हा उद्योग गेली अनेक वर्षे करताना आढळतात.

महाराष्ट्रातले काही खासदार त्यांच्या मतदारांना दिल्लीसह हरिद्वार्‌-ऋषिकेशचे तीर्थाटन घडवीत असतात.

काहीजण अमरनाथ यात्रा किंवा काहीजण काशीयात्रा देखील घडवत असतात.

दिल्लीतील कनिष्ठ मध्यमवर्गीय तसेच गरीब वर्गातील मतदार हे आधीच 'आप'शी जोडले गेले आहेत.

सोसायट्या व फ्लॅटमध्ये राहणारे वरिष्ठ आर्थिक वर्गातील लोक काहीसे भाजपकडे झुकलेले आढळतात.

परंतु त्यांच्या घरातील वयोवृध्द व ज्येष्ठांना आपल्याकडे वळविण्यासाठी 'आप'ने हा चलाखी केलेली आहे.

या तीर्थयात्रा त्यांना किती मदत करतात पाहूच या!

## मिनिमम मंत्री ........ मॅक्झिमम पीएमओ?

ब्रह्मांडनायकांच्या सरकारची तऱ्हा काही औरच आहे!

त्यांच्या मंत्रिमंडळातील मंत्र्यांना त्यांच्या खात्याच्या कामापेक्षा इतर कामेच जास्त करावी लागत असल्याचे चित्र आहे.

त्यामुळे अनेक प्रमुख मंत्री हे त्यांच्या मंत्रालयांपेक्षा पक्षाचे कामकाज अधिक करताना आढळतात.

भाजपचे वर्तमान कार्यकारी अध्यक्ष जगतप्रकाश नड्डा हे 'मोदी-01' मध्ये आरोग्यमंत्री होते. परंतु त्यांच्यावर काही

राज्यांच्या जबाबदाऱ्यांबरोबरच इतरही अनेक पक्षीय किंवा पक्षसंघटनात्मक जबाबदाऱ्या देण्यात आल्या होत्या व त्यामुळे ते या विभागाचे काम कसेबसे चालवत होते. ते पक्षाध्यक्ष अमितभाईंचे विशेष विश्वासू मानले जातात.

त्यामुळेच सध्या ते कार्यकारी अध्यक्ष म्हणून अमितभाईंना मदत करीत आहेत. मंत्रीपद त्यांना देण्यात आलेले नाही.

पण नड्डा यांच्याप्रमाणेच अमितभाईंचे आणखी एक विश्वासू मंत्री आहेत कृषिमंत्री नरेंद्रसिंग तोमर! त्यांच्याकडे






ग्रामीण विकास हेही खाते आहे. ही दोन्ही खाती अतिशय मोठी व व्यापक तसेच महत्वाची आहेत. त्यामुळे संबंधित मंत्र्यांना तर विशेष कटाक्षाने काम करणे आवश्यक असते. पण तोमर काही त्यांच्या मंत्रालयांना न्याय देऊ शकत नसल्याचे चित्र आहे.

तोमर हे आठवड्यातले एक-दोन दिवसच मंत्रालयात येतात असे सांगण्यात येते.

आता नागरिकत्व दुरुस्ती कायद्याच्या बाजुने देशभर रान उठविण्याची मोहिम सुरु करण्यात येत असून त्यामध्ये फक्त केंद्रीय मंत्र्यांचा समावेश करण्यात आलेला आहे. त्यांना राज्ये वाटून देण्यात आली आहेत.

आता प्रश्न आहे की, मग, मंत्रालयांचा कारभार चालवतो कोण?

त्याचे उत्तर एका शब्दात ......... 'पीएमओ'!

'पीएमओ' कळले नाही? 'प्राईम मिनिस्टर्स ऑफिस' --- --- पंतप्रधान कार्यालय!

नव्या प्रशासकीय रचनेत पंतप्रधान कार्यालयात सर्व अधिकार एकवटण्यात आले आहेत. कोणत्याही मंत्रालयास स्वतंत्रपणे निर्णय करता येत नाही. त्यांना 'पीएमओ'ची परवानगी घ्यावी लागते.

आता कळलं ना?

या देशात सर्वशक्तिमान, सामर्थ्यशाली, ब्रह्मांडनायक कोण आहे ते?

## राजधानीची फेररचना!

संसदेची नवी वास्तू ..... त्रिकोणी आकाराची!

सध्या संसदेची वास्तू पूर्ण गोलाकार आहे.

पण ब्रह्मांडनायकांना लहर आली की ते सत्तेत आहेत तोपर्यंत जुने जे काही आहे ते मोडून तोडून टाकायचे आणि स्वतःच्या कल्पनेतली राजधानी उभारायची!

याला 'विकृतीकडे झुकलेली अतिवादी महत्वाकांक्षा' म्हणतात!

हे वर्णन एका राजकीय पंडिताचे आहे.

संसदेच्या अधिकारी वर्तुळात या निर्णयाबद्दल तीव्र नाराजी व नापसंती आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार एवढा अवाढव्य खर्च करण्याची काही आवश्यकता नाही. सध्याची वास्तू अत्याधुनिक तंत्रज्ञानाने अद्ययावत करणे शक्य आहे.

परंतु ब्रह्मांडनायकांचा हट्ट म्हणजे 'राजहट्ट'च ना! त्याच्यापुढे कुणाचे काय चालणार?

सध्याची संसदेची वास्तू, साऊथ ब्लॉक व नॉर्थ ब्लॉक या इमारतींचे म्युझियम म्हणजेच संग्रहालयांमध्ये रुपांतर करणे, राष्ट्रपतिभवनाशेजारीच उपराष्ट्रपति आणि पंतप्रधान निवास करणे असे या योजनेचे स्वरुप आहे. याच्या रचनेचे काम अर्थातच गुजरातमधील वास्तुतज्ञ व नगररचनाकारांकडे देण्यात आले आहे.

दिल्लीचे रुपांतर 'सबकुछ गुजरात' मध्ये करण्याचा हा डाव आहे. याचा अतिरेक राष्ट्रीय राजधानी दिल्लीहून गुजरातमध्ये हलविण्यात तर होणार नाही???

हल्ली काहीच सांगता येत नाही बुवा!

काहीही होऊ शकते!

लहरी राजा....प्रजा आंधळी ..... अधांतरी दरबार????

◆




# शेवटचे पान



# शिल्पकार नव्या परिवर्तनाचे

**हिरक महोत्सवी वर्षात चव्हाण साहेबांचे वारसदार माननीय शरदचंद्र पवार साहेब आणि ज्यांच्यावर मराठी माणसांनी मनापासून प्रेम केले ते स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे ह्यांचे सुपूत्र, अशी ही नवीन आघाडी भविष्यातला महाराष्ट्र खऱ्या अर्थाने 'मंगल देशा पवित्र देशा.' छत्रपती शिवरायांच्या ह्या मुलखाला छत्रपती शाहू महाराज, महात्मा ज्योतिबा फुले, सावित्रीबाई फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर ह्यांची समृध्द परंपरा आहे. आजच्या घडीला हा वारसा समर्थपणे पेलून नवा इतिहास घडविणाऱ्या पवार साहेबांना उज्वल यश मिळणार ही तर काळ्या दगडावरची रेष.**



१ जानेवारीला आपण नवीन वर्षात पदार्पण केले. दोन हजार वीस हे वर्ष उगवलेच परिवर्तनाची नांदी घेऊन. मागल्या वर्षाअखेरीला एक नवीन राजकीय समीकरण तयार होऊन अशक्य वाटणारे तीन पक्षांचे सरकार सत्तेवर आले. देशभरात असलेली अस्वस्थता, केंद्रस्थानी असलेल्यांची हुकुमशाही मगरुरीची सत्ता, सामाजिक संतुलन बिघडविणारे अनावश्यक कायदे, ढासळती अर्थव्यवस्था, वाढती जीवघेणी महागाई, उद्योग क्षेत्रातील मंदी, प्रचंड बेरोजगारीमुळे अस्वस्थ तरुणपिढी, बळीराजाच्या समोरील भयानक आव्हाने ह्या सारख्या अनेक गोष्टींवर काहीतरी परिवर्तन आवश्यक होते, हे महत्वाचे बदल घडवून आणले आहेत आदरणीय पवार साहेबांनी. साहेबांचे स्वर्गीय बाळासाहेब ठाकरेंशी मैत्रीचे स्नेहबंध. राजकीय विरोधी भूमिका आयुष्यभर राहिलेल्या पण जेंव्हा देशहिताचा आणि महाराष्ट्राच्या भविष्याचा विषय येतो तेंव्हा मात्र दोघांचे पूर्णपणे मतैक्य, ह्या दिर्घ अनुभवातून महाराष्ट्राला श्री.



उद्धव ठाकरेंच्या रुपाने पहिला शिवसैनिक मुख्यमंत्री पदावर विराजमान झाला. हे वर्ष महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेचे हिरक महोत्सवी वर्ष. साठ वर्षांपूर्वी म्हणजे १ मे १९६० रोजी स्वर्गीय यशवंतराव चव्हाण साहेबांनी महाराष्ट्राचा मंगलकलश आणला. हिरक महोत्सवी वर्षात चव्हाण साहेबांचे वारसदार माननीय शरदचंद्र पवार साहेब आणि ज्यांच्यावर मराठी माणसांनी मनापासून प्रेम केले ते स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे ह्यांचे सुपूत्र, अशी ही नवीन आघाडी भविष्यातला महाराष्ट्र खऱ्या अर्थाने '**मंगल देशा पवित्र देशा.**' महाराष्ट्राला अभिमानाचं, गौरवाचं स्थान प्राप्त करुन देतील. छत्रपती शिवरायांच्या ह्या मुलखाला छत्रपती शाहू महाराज, महात्मा ज्योतिबा फुले, सावित्रीबाई फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर ह्यांची समृध्द परंपरा आहे. आजच्या घडीला हा वारसा समर्थपणे पेलून नवा इतिहास घडविणाऱ्या पवार साहेबांना उज्वल यश मिळणार ही तर काळ्या दगडावरची रेष.

◆



जेएनयूमधील विद्यार्थी हल्लेखोरांचा निषेध करताना.